## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. वऱ्हाडट्रेडिंग कंपनीच्या व्यवस्थापक मंडळी पैकीं मी एक आहे त्या व्यवस्थे संबंधानें ता. १ जूनच्या वैदर्भांत जो लेख आला आहे त्यांत कित्येक गोष्टींचा जबाब देणें मजला अवश्य वाटून मी त्या पत्रकर्त्यांस एक पत्र लिहिलें व छापण्या विषयीं विनंती केली असतां त्यांनीं त्यावर दोन अंक काढिले तरी माझें पत्र छापण्याची कृपा केली नाहीं. ता. १५ जूनच्या अंकीं ते म्हणतात कीं आह्मास उत्तरा दाखल एक पत्र आलें आहे त्याचा लवकरच सवडीनें आह्मी विचार करूं. सदहू पत्रकार उत्तराचा विचार सवडीनें पाहिजे तेव्हां करोत त्यांनीं पत्र छापण्यास अवकाश नसण्याचें कारण नव्हतें. जें पत्र मी लिहिलें तें म्हणजे केवळ त्यांच्या लेखास उत्तर म्हणूनच लिहिलें नव्हतें त्यांच्या लेखावरून लोकांत गैरसमज न व्हावा म्हणून खरा प्रकार प्रसिद्ध करावा हा मुख्य उद्देश होता असो. त्यांना माझें पत्र घेण्यास सवड झाली नाहीं म्हणून मी तें आपणा कडेस धाडिलें आहे, आपण तरी कृपा करून छापावें. ता. १ जूनचें पत्र त्यांच्या तारीख ८ जूनच्या अंकांत आलें नाहीं, तेव्हांच मी दुसऱ्या पत्रांत द्यावयाचें; परंतु त्यांना पत्र पोंचून काय तो एकच दिवस त्यांचें पत्र निघण्याचा बाकी राहिला होता म्हणून मी आणखी एक आठवडा वाट पाहिली. ता. १५ जूनचा वैदर्भ निघून त्यांत जेव्हां माझें पत्र आलें नाहीं तेव्हां मजला तें दुसरीकडे देणें जरूर झालें, याबद्दल मी दिलगीर आहे.

रा. रा. वैदर्भकर्ते यांसः—

वि. वि. वऱ्हाड ट्रेडिंग कंपनी संबंधानें आपण आपल्या गेल्या अंकीं जो लेख लिहिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. ज्या उद्देशानें ही कंपनी स्थापन झाली तो उद्देश आपण पूर्णपणें जाणतां यांत संशय नाहीं. परंतु या कंपनीच्या व्यवस्थे संबंधानें आपण जें लिहिलें आहे त्यांत कित्येक गोष्टी बद्दल मी काहीच न बोललों तर लोकांत गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून तितक्याच पुरती माहिती आपल्यास द्यावी इतकाच माझा हेतु आहे. व मी आशा करितों कीं, सदरील मजकूर आपण कृपा करून आपल्या पत्रीं जागा द्याल.

कंपनी स्थापन झाल्यावर एक दोन वर्षे तिचें काम फार उत्तम रीतीनें चाललें होतें. नाहीं. कंपनी स्थापन करण्यांत सचोटीनें व्यापार करण्याचा किता घालून द्यावा इतकाच जर मुख्य उद्देश होता तर तो या कंपनीनें पूर्णपणें सिद्धीस नेला. आपल्यास खरोखर समाधान वाटेल कीं, वऱ्हाड ट्रेडिंग कंपनीची सचोटी आज मितीस पूर्ववत् बहाल आहे. या कंपनींतून जो माल विकला जाता त्यांत कोणाची फसवणूक झाल्याचें ईश्वर कृपेकरून अझून कोणाच्या तोंडचें ऐकण्यांत आलें नाहीं. आज पुन्हां व्यापार जारीनें चालू करा, त्या दुकानांत गिऱ्हाईकांस कमी पडावयाची नाहीं, अशी माझी समजूत आहे. परंतु दुःखाची गोष्ट ही आहे कीं, दुकान चालविण्यास असावा तसा मनुष्य मिळत नाहीं. व भागीदार लोकांस जितका असावा तितका उत्साह दिसत नाहीं, त्यामुळें व्यापार कमी करणें व्यवस्थापकांस भाग पडलें. आपल्यास चमत्कार वाटेल; परंतु शब्दशः खरी गोष्ट ही आहे कीं, केवळ मनुष्याच्या दुर्मिळतेमुळें व भागीदारांच्या निरुत्साहामुळें कांहीं दिवस दुकानचा व्यापार बंद ठेवणें व्यवस्थापकांस जरूर पडून सांप्रत दुकान बंद ठेविलें गेलें आहे. आपण म्हणतां "कंपनीच्या दुकानांत एकदम विक्री बंद होण्याचा प्रसंग आला आहे" हें आपलें म्हणणें थोडें वस्तुस्थितीशीं सोडून आहे दुकानची नापत होऊन किंवा दुकानांत घोटाळा होऊन दुकानांत विक्री बंद होण्याचा प्रसंग आला नाहीं. सर्व भागीदारांच्या हितासाठीं व्यवस्थापकांनीं आपण होऊन ती बंद केली आहे. व त्या वांचून गत्यंतरच नव्हतें.

नोकरांच्या दुर्मिळते विषयीं आपल्यास संक्रांतीच्या म्हणण्याचें "शुद्ध हंसू येतें" "व नोकरांची कमी नाहीं" असें आपण म्हणतां, कदाचित तसें असेल; परंतु मी आपल्यास विनंती करितों कीं दुकानची व्यवस्था पाहण्या लायक एखादा मनुष्य आपण मिळवून दिल्यास व्यवस्थापक मंडळी आपले आभार मानील इतकेंच नव्हे आपण जरूर करावाच, कारण व्यवस्थापक मंडळी कडून या कामीं शिकस्त झाली मनुष्य काम करण्यास तयारी दाखवितो, पगार कबूल करिता, जामीन देण्यास तयार होतो व व्यवस्थापक मंडळी ठराव करिते आणि नंतर तो मनुष्य कांहीं वेळ टिकत नाहीं म्हणतो. असे एक दोन, तीन, चार, पांच वेळ घडून आलें. नोकरांच्या "झुंडी" तून एखादा लायक नोकर आपण या दुकानाला मिळवून दिला तर अझूनही व्यवस्थापक मंडळी त्यास कामावर ठेवण्यास इनकार करावयाची नाहीं. वर्तमानपत्रांतून नोटीस कित्येक आठवडे प-

च्या उत्पन्नाचे आणि नोकरांच्या खर्चाचे आकडे दिले आहेत त्यांजवरून आपण व आपले मार्मिक वाचक पाहून घेतील कीं, नोकरांच्या संबंधानें फाजील काटकसर या कंपनीच्या व्यवस्थापकाकडून कधीं तरी झाली आहे कीं काय?

| साल | उत्पन्न | नोकरांचा खर्च |
| --- | --- | --- |
| १९३८ | १९६५॥= | ३०७। |
| १९३९ | ३४१४।-॥। | ५१२।- |
| १९४० | ३०७९॥=। | ५०८८-। |
| १९४१ | २५९८॥--। | ९८८।≡ |
| १९४२ | ३६०५८=। | ९२०।=। |
| १९४३ | ११६८८= | ५९६॥-।॥ |
| १९४४ | १७८६॥=॥। | ५१२।=-। |
| १९४५ | ४६७॥-॥ | ३४४८=॥ |

हे शेवटील ओळींतील आंकडे चालूं सालचे ७ महिन्याचे आहेत.

परमेश्वर इच्छेनें असे कित्येक कारखाने असतील कीं ज्यांस बहुतेक काटकसरीनें कारणच पडूं नये, तशा ठिकाणीं औदार्य दाखविण्यास अडचण पडत नाहीं; परंतु हा नियम सर्वत्र लागूं पडेल असें नाहीं. सचोटीनें व्यापार करावयाचा म्हणजे उधळपट्टीचा खर्च करावयाचा हें तत्व या कंपनीच्या व्यवस्थापकांस तरी निदान उमगलें नव्हतें. व नाहीं उमगलें ही माझ्या बुद्धीनें आनंदाची गोष्ट आहे. कंपनीच्या ऐपती प्रमाणें खर्च असावा किती याची चाणाक्ष व व्यवहार निपुण असे आपले वाचक आणि आपण सहज कल्पना कराल, अशी मी आशा करितों.

नोकर लोकांवर नजर कडक राखणें, त्यांच्या अपराधाबद्दल त्यांना शिक्षा देण्याचा विचार करणें हें जर आपल्या दृष्टीनें गैर असेल तर माझें त्याबद्दल कांहीं म्हणणें नाहीं. मजला या दुकानच्या व्यवस्थेचा जो कांहीं थोडाबहूत अनुभव आहे त्याजवरून मी म्हणतो नोकर लोकांवर जितकी म्हणून दया आज पावेतों करण्यांत आली तितकी फार थोड्या लोकांकडून करण्यांत आली असेल निदान इतरांनीं जितकी दया करावयाची त्या पेक्षां या कंपनीच्या व्यवस्थापकांनीं कमी दया केली नाहीं. मात्र नोकरांची लबाडी दिसून आल्यास तर लबाडीवर झांकण घालून भागीदारांशीं प्रतारणा केली नाहीं. व हा जर आपल्या दृष्टीनें अपराध असेल तर गोष्ट निराळी.

हल्लींच्या नोकरास ३० रु. कां आणि पूर्वी ठेवावयाचा त्यास १५ कां, असा आपण प्रश्न केला; त्यास हल्लींचा ३० रुपये दरमहाचा नोकर खरोखर रीतीनें दुकानच्या ऐपती बाहेर समजण्याचा आहे; परंतु मोठ्या

नाहीं तेव्हां मुनिमास १५ किंवा २० रुपयां पेक्षां अधिक पगार कसा दिला जाणार?

भागीदारांच्या निरुत्साहा संबंधानें:—गेल्या वर्षी शिलकी मालाची तपासणी अधिक कसोशीनें घेण्यांत कांहीं माल कामी आला—त्यांतून कांहीं नोकर लोकांच्या अंगीं लागला व कांहींचा पत्ता नाहीं. आपण म्हणतां त्याच प्रमाणें व्यवस्थापकांचे ही मत आहे कीं, ज्या दुकानांत ८-९ वर्षांत लक्षावधि रुपयांच्या किल्हर मालाची घडामोड झाली त्या दुकानांत हजार बाराशें रुपयांचा माल कमी भरला असतां कांहीं नवल नाहीं परंतु ही समजूत सर्व भागीदारांची व्हावयास पाहिजे. भागीदार लोकांत या संबंधानें निरनिराळे तर्क निघूं लागले तेव्हां व्यवस्थापक मंडळी कडून जाहीर सभेंत अशीही सूचना झाली कीं, पाहिजे तर आलेली तूट आम्ही भरून देतों; परंतु भागीदारांनीं दुकान चालविण्याची व्यवस्था लावावी. भागीदारांचे म्हणणें कीं तूट आली कशी हें कागद पत्रावरून पाहून नंतर काय तो निकाल करावा. तात्विक रीतीनें कारकाईनें पहाण्या सारखें यांत कांहीं नव्हतें. सर्व साधारण व्यापाऱ्याच्या पद्धतीनें रकम खर्ची लिहून काम चालेल असें वाटलें; परंतु बहुमतानें वर प्रमाणें ठरलें. नवीन व्यवस्थापक मंडळी नेमण्याची सूचना झाली तीही याच कारणानें मान्य झाली नाहीं. हल्लींचे व्यवस्थापक तूट आलेली रकम कागदी पत्रावरून खात्री होई पर्यंत अनामत ठेवण्यास तयार झाले तरी त्यांची सटका भागीदारांनीं केली नाहीं. कागदपत्र पहाण्या साठीं एक मंडळी नेमली गेली त्या मंडळीस मुदत दिली गेली, कागदपत्राची तयारी ठेविली गेली; परंतु त्या मंडळीनें कांहीं पाहिलें नाहीं पुन्हा जाहीर सभा भरविली, भागीदार सभेस आले नाहींत. कायद्या प्रमाणें पुन्हां मुदत दिली गेली. दुसऱ्यानें जाहीर सभा भरविण्याचा उद्योग केला परंतु पुन्हां भागीदार आले नाहींत. कायद्या प्रमाणें ६ महिन्यांत सभा न भरविली तर दंड आहे. सभा भागीदारांवाचून भरत नाहीं, अशा अनेक अडचणी येऊन पडल्या म्हणून सांगतो; खर्च बहाल ठेवून व्यापार न करितां दुकान चालू ठेवणें प्रशस्त वाटलें नाहीं आणि व्यापार करण्यास तर मार्गच नाहीं, कारण हल्लींचा नोकर नोकरी करूं इच्छित नाहीं, जामीन देत नाहीं व त्याचा पगारही अधिक.

ज्या ज्या गोष्टीं संबंधानें मजला उत्तर देणें जरूर होतें तितकें मी दिलें आहे. याशिवाय आपल्या लेखांत ज्या गोष्टी आपण लिहिल्या, हल्लींच्या व्यवस्थापकांची व त्यां-

करा व ज्या ज्या गोष्टी तुमच्या दृष्टोत्पत्तीस येतील त्या नीट मांडून ठेवून फुरसतीच्या वेळीं त्यांचें मनन करा. शहरांतील बाहेरील केवळ भपक्याला भुलूं नका. शहर सोडून २-४ कोस आंत खेड्यापाड्याकडे वळाल तर लोकांची दुरवस्था दाखविणारीं चिन्हें कितीशीं तुह्माला दिसतील? कौलारू किंवा धाब्यांची गोष्ट एकीकडेच राहूंद्या नीट नेटकी छपरी खोपटीं तरी गांवांत १०-५ आणि खरी गोष्ट आहे. पुष्कळ ठिकाणीं अशा गोष्टी घडून आलेल्या आपल्या पाहण्यांत येतात कीं बाहेर पोटास मिळत नाहीं म्हणून लोक चोरी मारी करितात व महिना दोन महिने तुरुंगांत जाऊन स्वस्त बसतात. मित्रहो या प्रमाणें तुमचीं धर्मबंधनें, नीतिबंधनें ढिलीं होत चाललीं, गरीबगुरिबांचें लक्ष्य कुमार्गा कडे जाऊं लागलें, सामाजीक स्थितीमध्यें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत रा- उचलण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं नाहीं मग त्यांचें नियमन करण्याला एवढा मोठा अवाढव्य कारखाना हवा कशाला. अर्थात या प्रीत्यर्थ होणारा खर्च कांहीं विलायतेहून येत नाहीं. तो आमचा आह्माला येथेंच भागवावा लागतो. आह्माला पोटभर खावयाला मिळण्याची पंचाईत झाली आहे, मग या मोठमोठ्या रकमा आह्मी आणाव्यात कोठून? एखाद्या थोड्याशा महिनेच्या महिने उपाशीं ठेवून खर्चात काटकसर करण्याचा विचार करितां एक कमिशन नेमलें होतें त्या कमिशनें आपली कातर चांगल्या रीतीनें चालविली असती तर या खर्चांपैकीं बराच कमी झाला असता; परंतु ही कांहीं विलक्षण आहे कीं युरोपियन पगार त्यांच्या चैनीच्या बाबी (गिरणी वगैरे) यांपुढें तिची धार अगदीं बोथट होऊन जाते.

(पुढें चालू)

किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Per annum ...
Single copy...
Advertise...
Below 10 li...
per line over...
Repetition p...

# वऱ्हाडसमाचार.

पुरवणी—अकोला वऱ्हाडसमाचार ताशखा माहे जूल सन १८८९

मुक्काम रिसोड ता. १९।६।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० पाऊस चांगला पडूं लागला. पेरणीचीं कामें सुरूं झालीं. हवा बरी आहे. रोगराई नाहीं मध्यें येथें गोरक्षक सभेबद्दल लोकांच्या मध्यें फार कळकळ उत्पन्न झाली होती असें दिसत होते परंतु आरंभशूर असेंच झालें असेंच म्हणावें लागतें. अलीकडे या बद्दल कांहींच लोकांत खटपट दिसत नसून सर्व शून्य दिसतें एकूण आमचे लोकांची धन्य आहे! या गांवीं सावकार लोक फार आहेत. त्या सर्वांत मुकुटमणी शिवलाल लखमीचंद वगैरे आहेत. हे मारवाडी आहेत. तरी उदार अंतःकरणाचे असून कामकाज चोख. यांची कुळें यांना हमेष खूष असतात.

येथील मराठी शाळा सुधारत नाहीं. मास्तर फार हुशार असून सभ्य आहेत. ती सुधारण्या करितां ते खटपट करितात. परंतु लोकांना विद्येची गरज नसल्या मुळें उद्योग सिद्धी नेहमीं दूर असते. चांगले शिकलेले मास्तर अशा ठिकाणीं येऊन त्यांचे विद्येचें मोतेरें करण्यापेक्षां नुसते मराठी शिकलेले मास्तर जर मराठी शाळेंतून बोलाविले तर किती बरें उत्तम होईल!! परंतु अशा गोष्टी कडे योग्याधिकाऱ्याचें लक्ष्य जाईल तेव्हां खरें. येथें चवथ्या इयत्ते पर्ली कडे लोकांना विद्या नको आहे. मग सरकारचा तरी आग्रह कां? ज्यांना जास्त विद्या पाहिजे तो चवथी झाल्यावर बाहेर जाऊन विद्या शिकेल.

येथील पोस्टआफिस सब-पोस्ट होते. तें मि. लाल काका यांचे प्रसादानें ब्रँच होणार असें ऐकतों!! एकूण नेटिव कामगार असले म्हणजे अशी त्यांची बारीक दृष्टी असतेना! बा नेटिव कामगारांनो! तुमचेवरतांच कां अशा कांटकसरीनें वागण्याचा प्रसंग येतो. साहेबां प्रमाणें तुमचें मन मोठें असूंद्या. मोठ्या मनानें वागल्यास तुमचे गांठोडें जातें काय? कांटकसरीनें तुम्हास इंद्रपद मिळणार काय? ही विनंती.

आपला रिसोडस्थ
"स"

## गरमीचे रोगावर औषध.

शरिरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते.

## अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेप पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

CALCUTTA ART STUDIO

185 *BOWBAZAR STREET.*

**PICTURES PICTURES PICTURES**

PUBLISHED FROM THE FAMOUS
CALCUTTA ART STUDIO.

About 200 soits of beautifully colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festiva.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy and Lady Lansdowne.

Every facility would be afforded to motussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a mere nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO | N. BISWAS.
185 Bowbazar Street. | Manager
CALCUTTA.

"TO THE DEAF."

*K. B. Rele and co.s' most efficacious.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतींध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व पकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व पकारच्या जखमांवर मल्म

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतों, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, ढांग्या खशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्ण ज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागतें अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार, संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यात हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणाराप चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरीं इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबु, पोल्हाश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
काबसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

बहिऱ्यांस.

बहिरेपणा आणि २३ चा कर्णनाद यांस गुण आणणारें सोपें औषध

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.

सन १८७२ चा ९ वा

ज्यव्यव...
चार

बिन्ह कितीशा तुह्माला दिसताल? कालारू किंवा धाड्यांची गोष्ट एकीकडेच राहूंद्या नोट नेटकी छपरी खोपटीं तरी गांवांत १०-५

ढोलो होत चालली, गरीबगुरिबांचें लक्ष्य कुमार्गी कडे जाऊं लागलें, सामाजीक स्थितीमध्यें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत रा-

ण्याची पंचाईत झाली आहे, मग या मोठमोठाल्या रकमा आह्मी आणाव्यात कोठून? एखाद्या थोड्याशा महिनेच्या महिने उपाशीं ठेवून

पगार त्याच्या चैनीच्या बाबी ( गिन्या वगैरे ) यांपुढें तिची धार अगदीं जाते.

( पुढें चा...

किरकोळ अंकास..............................०४

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०१०६

दुसरे खेपेस .........०१

Single copy.................................

Advertisements

Below 10 lines...2

per line over10... 4

Repetition per line 3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 1 JULY 1889 | NO. 2

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख १ माहे जूलै सन १८८९ इ० | अंक २


## गृहिणी.

( कुलवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचें आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांचीं चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवणकाम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईंत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल हं. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,

## हिंदुस्थानचें दारिद्य.

[ लिहून आलेला मजकूर. ]

प्रस्तुत विषय आपल्या वाचकांपैकीं पुष्कळांना अगदीं शिळा व कंटाळवाणा वाटेल व तेंच तेंच रडगाणें मी गात आहे असें ही पुष्कळ ह्मणतील. परंतु आपल्या सांप्रतच्या स्थितीकडे पाहतां या विषयाकडे आपल्या लोकांचें लक्ष जाणें किती अवश्य आहे बरें! रडगाणें तर खरेंच परंतु असलें रडगाणें वारंवार कानीं आल्याशिवाय लोकांचें लक्ष असल्या महत्वाच्या विषयाकडे जाणार नाहीं. स्वानुभवानें ही गोष्ट आपण ही कबूल कराल.

प्रियवाचकहो! सध्यां आपली स्थिति कशी झाली आहे याचा विचार मनापासून एकदृष्टीनें तुम्ही कधीं तरी केला आहे काय? सर्व हिंदुस्थानभर फिरण्याची तसदी मी तुम्हास देत नाहीं; परंतु ज्या प्रांतांत किंवा निदान ज्या जिल्ह्यांत तुम्ही रहातां त्या मधून एकदां तरी डोळे उघडून सफर करा व ज्या ज्या गोष्टी तुमच्या दृष्टोत्पत्तीस येतील त्या नीट मांडून ठेवून फुरसतीच्या वेळीं त्यांचें मनन करा. शहरांतील बाहेरील पोकळ भपक्याला भुलूं नका. शहर सोडून २–४ कोस आंत खेड्यापाड्याकडे वळाल तर लोकांचीं सुखवस्तुपणा दाखविणारीं चिन्हें कितीशीं तुह्माला दिसतील? कौलारूं किंवा धाब्यांची गोष्ट एकीकडेच राहूंद्या नीट नेटकीं छपरी खोपटीं तरी गांवांत १०-५ दृष्टीस पडतील कीं नाहीं कोण जाणें. रस्त्यानें जातां येतां गांवकरी लोक तुह्मी पहाल. बिचाऱ्यांच्या तोंडावर तेज ह्मणून मुळींच नाहीं. नुसते अस्थिचर्माचे सांपळे प्रेतांत व त्यांत फरक एवढाच कीं हे बोलत चालत असतात. व खावयाला पोटभर अन्न नाहीं व लज्जा संरक्षण करण्याला अंगभर वस्त्र नाहीं. बरें एखाद्या खोपटांत शिरून पहा. आंत तुह्माला काय दिसेल? महिन्या-आठवड्याची निदान त्या दिवसाची तरी अन्न सामुग्री असेल कीं नाहीं हा संशयच. अस्थिचर्म मात्र राहिलेली लहान लहान पोरें भुकेनें व्याकूळ होऊन नुसत्या भुईवरच किंवा फार झालें तर एखाद्या फाटक्या तुटक्या रकट्यावर लोळत आहेत; चुलीमध्यें एखादा कुत्रा किंवा मांजर उबदार जागा पाहून खुशाल घोरत पडलें आहे. असा देखावा तुमच्या दृष्टीस पडेल. वाचक हो! ह्या चुली पेटणार केव्हां तुम्हाला माहीत आहे काय? संध्याकाळीं घरांतील वाडवडील माणसें सर्व दिवस काबाड कष्ट करून दोन पैसे मिळवून आणितील तेव्हां हो. एखादे दिवशीं कांहीं मिळालें नाहीं ह्मणजे रात्रभर ह्या चुली कुत्र्यांचीं व मांजरांचीं वरेंच रहाणार बरें कां! ही अवस्था ज्यानां तुह्मी भिकारी अशी संज्ञा देतां त्यांच्याच संबधांची मी सांगतों आहे असें समजूं नका. शेतकरी, साळी, कोष्टी, तेली तांबोळी मोलमजूर, व्यापारी कसबी चट सारे झाडून हळू हळूं या पंथाला येत चालले आहेत. प्रिय वाचकहो! ही अशी अवस्था कां याचा विचार तुह्मी कधीं केला आहे कां? तुमच्या देशाचें सर्व वैभव नष्ट झालें; संपत्ती रसातळास गेली; तुमचे कारखाने, धंदे कसब कवडीमोल होऊन कारागीर व कसबी लोक अन्न अन्न करीत दारोदार लागले हें सर्व कां हें तुह्मी कधीं मनांत आणिलें आहे कां? तुमचा देश सामाजिक राजकीय व नैतिक या तिन्ही गोष्टीमध्यें अगदीं निकृष्टावस्थेला आला आहे अशी ओरड परदेशीय लोक करितात. तुमच्या देशांत दिवसेंदिवस अपराध्यांची संख्या वाढून तुरुंगाची भरती अधिकाधिक होत चालली आहे. एखाद्या तुरुंगांत जाऊन बंदींत असलेल्या एखाद्या कैद्याला तूं येथें कां आलास असें विचारलें तर ते साफ सांगतो कीं बाहेर पोट भरत नाहीं. येथें बसल्या जागीं फुकट खावयास मिळतें ह्मणून आलों. आणि खरी गोष्ट आहे. पुष्कळ ठिकाणीं अशा गोष्टी घडून आलेल्या आपल्या पाहण्यांत येतात कीं बाहेर पोटास मिळत नाहीं ह्मणून लोक चोरी मारी करितात व महिना दोन महिने तुरुंगांत जाऊन स्वस्त बसतात. मित्रहो या प्रमाणें तुमचीं धर्मबंधनें, नीतिबंधनें ढीलीं होत चाललीं, गरिबगुरिबांचें लक्ष कुमार्गा कडे जाऊं लागलें, सामाजीक स्थितीमध्यें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिनासा झाला, गांवोगांव चोऱ्या मारामारी खून, लबाड्या इत्यादि अपराध वारंवार घडून येऊं लागले हें सर्व कशा मुळें! या सर्वांचें कारण दुसरें कांहीं नाहीं लोकांत अठरा विश्वे दारिद्य होय. या एका दारिद्यानें एकसमया वरच्छेदें करून इतक्या गोष्टी आपल्या लोकांत घडवून आणिल्या आहेत. हा दारिद्यरूपीं राक्षस दिवसेंदिवस आपल्या लोकांस अधीक अधीक गिळीत चालला आहे व याचा प्रातिकार वेळेवर झाला नाहीं तर खरोखर हा आपल्याला समूळ ग्रासून टाकून आपण या जगांत होतों कीं नाहीं असें करून टाकील.

वरील दिग्दर्शन वरून आपल्या सांप्रतच्या दारिद्याच्या स्वरूपाची कांहीं कल्पना वाचकांच्या मनांत येईल. ही अवस्था आपल्यास प्राप्त होण्यास माझ्या मतें अनेक कारणें झालीं आहेत. त्यां पैकीं मुख्य हीं आहेतः— ( १ ) राज्य व्यवस्थेप्रीत्यर्थ होणारा अतोनात खर्च व अधिकार दानाच्या कामीं सरकारची असम दृष्टी, ( २ ) नवीन सुधारणेशीं टक्कर देण्याच्या कामीं आमच्या इकडील कारागीर कसबी वगैरे लोकांची असमर्थता, ( ३ ) करांचें ओझें ( ४ ) आपसांतील भांडणें व वाद, ( ५ ) आपली दानधर्म पद्धति, ( ६ ) भिकार व भिक्षुक, ( ७ ) कुटुंबाची एकत्र संस्था. या पैकीं, प्रत्येकाचा आपण पृथक् पृथक् विचार करूं.

प्रथमतः राज्य व्यवस्थेसाठीं होणारा अतोनात खर्च. सांप्रतची आपल्या देशाची राज्यव्यवस्था बरी आहे कीं वाईट आहे हें सांगत बसण्याचें माझें काम नाहीं. मला फक्त इतकेंच सांगणें आहे कीं आपल्या सध्यांच्या गरिबीच्या स्थितीला ती अगदीं अयोग्य आहे. या कामीं जी उधळपट्टी होत आहे ती पुष्कळ कमी करितां येईल. अवाढव्य पगार देऊन ठेविलेले मोठे मोठे अधिकारी व ते जेथें एक लागणार तेथें पांच; त्यांच्या कचेऱ्यांचा तो दरबारीथाट; त्यांच्या चैनी साठीं सरकारी तिजोरींतून दरसाल होणारा विशाल खर्च; न्याय दंडनाची लांबचलांब व मोठ्या खर्चाची पद्धती; इत्यादि अनेक गोष्टी सध्यांच्या सरकारच्या राज्यव्यवस्थेचा खर्च अतोनात वाढविण्यास कारणीभूत झाल्या आहेत. असली राज्य पद्धती कांहीं काळा पूर्वी अवश्य होती खरी परंतु ती केवळ शोभे करितां किंवा भपक्या करितां आहे. अहो लोकांत दम बिलकूल राहिला नाहीं, वर डोकें उचलण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं नाहीं मग त्यांचें नियमन करण्याला एवढा मोठा अवाढव्य कारखाना हवा कशाला. अर्थात या प्रीत्यर्थ होणारा खर्च कांहीं विलायतेहून येत नाहीं. तो आमचा आह्मांला येथेंच भागवावा लागतो. आह्माला पोटभर खावयाला मिळण्याची पंचाईत झाली आहे, मग या मोठमोठल्या रकमा आह्मी आणाव्यात कोठून? एखाद्या घोड्याला महिनेंच्या महिने उपाशीं ठेवून तो अगदीं रोड झाला ह्मणजे मग त्यावर स्वारी करण्याकरितां किनखापी जीन, चांदीचा मोठा मौल्यवान व जड सरंजाम इत्यादिकांचें ओझें लादण्या सारखें हें आहे. बिचाऱ्याला स्वतःचा जीव संभाळण्याची पंचाईत. एक पाऊल देखील पुढें पडत नाहीं त्याला एवढें ओझें कशाला. तोंडांत एखादी दोरी घालून किंवा तसेंच पाहिजे तेथें नेतां येईल. तशीच गोष्ट आमची आहे. आमचा जीवच संभाळावयाची आह्माला पंचाईत पडली आहे व असें असून आमचें नियमन करण्या करितां सरकारनें जी व्यवस्था केली आहे ती आमच्या शक्तीबाहेर—बरें इतकेंही असून या व्यवस्थे प्रित्यर्थ जो पैसा खर्च होणार तो आमच्या देशांतल्या देशांतच जर राहता तर वाईट वाटण्याचें विशेष कारण नव्हतें. परतु हा सर्व पैसा खर्च होणार गोऱ्या लोकांसाठीं. मोठमोठाल्या अधिकारांच्या जागीं फक्त गोरे लोकच येणार. आमच्या लोकांच्या वांट्यास लहान लहान अधिकार आले तर आले नाहीं तर नुसते खर्डे घांसण्याचें काम. येथें ही एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे कीं आपल्या कृपाळू राणी सरकार व इकडे येणारे त्यांचे प्रतिनिधी आपल्या सर्व प्रजेला सारख्या प्रेमानें व समदृष्टीनें वागविण्याची वचनें वेळोवेळीं देत असतात परंतु त्या वचनाप्रमाणें कृति करण्याचा प्रसंग आला ह्मणजे त्यांची केव्हांच विस्मृती होऊन जाते. आम्ही मोठमोठाल्या अधिकारांच्या जागा करण्यास योग्य नाहीं असें ह्मणून आम्हाला नेहमीं खालच्या पायरींतच ठेविलें तर मोठ्या अधिकारांची योग्यता आमच्या आंगीं यावी तरी केव्हां? हीच असमता सर्व ठिकाणीं दृष्टीस पडते. आह्मास पेनशनचा दर कमी व तो येथें आमच्या रुप्याच्या नाण्यानें मिळावयाचा व विलायती लोकांना पेनशनची इयत्ता मोठी व शिवाय ते त्यांच्या देशांत त्यांच्याच सोन्याच्या नाण्यानें द्यावयाचें. मग त्यासाठीं एका रुपयाच्या जागीं १० रुपये खर्च झाले तरी हरकत नाहीं. या रीतीनें प्रतिवर्षीं पैशाच्या पैशाच्या थैल्या विलायतेंत जाणार व त्या आमचे गरीब गुरीब शेतकरी, उद्मी, व्यापारी यांनीं गळच्या घामानें मिळविलेल्या पैशानें भरून जाणार मग आम्हाला दारिद्य कसें नयावें?

थोड्या दिवसांपूर्वी राज्यव्यवस्थेच्या खर्चांत काटकसर करण्याचा विचार करण्याकरिता एक कमिशन बसलें होतें त्या कमिशनानें आपली कातर चांगल्या रीतीनें चालविली असती तर या खर्चांपैकीं बराच खर्च कमी झाला असता, परंतु ही कातर अशी कांहीं विलक्षण आहे कीं युरोपियन लोकांचे पगार त्यांच्या चैनीच्या बाबी ( गिर्यारोहण वगैरे ) यांपुढें तिची धार अगदीं बुजून जाते. (पुढें चालू.)

वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ शुद्ध ३ शके १८११

ज्युडिशियल स्कीम आजपासून अमलांत येणार. नवीन व्यवस्थेंत ज्या घडामोडी होणार त्यांकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. वरील अधिकाऱ्यांपैकीं जो तो आपल्याला कांहीं तरी नवीन अधिकार या घडामोडींत मिळेल ह्मणून टपून बसले आहेत. कित्येकांना तर अगोदरच मिळाले आहेत. लहान सहान मंडळी ही चातकाप्रमाणें आपल्याला क्लार्क ऑफ कोर्टची जागा मिळते कीं हेडक्लार्कची मिळते कीं रीडरची मिळते, किंवा नुसते खर्डे घासण्यावरच रहावें लागते याबद्दल विचार करीत बसली आहे. एकंदरींत चालूं महिना आमच्या प्रांतांत मोठा चळवळीचा होईल खरा. कोणाचें नशीब कसें उघडतें पहावें.

नवीन कायद्याच्यायोगानें अपिलाच्या संबंधानें ज्या गैरसोई होणार आहेत त्या दूर होण्याकरितां लाट साहेबांकडे अर्जांवर अर्ज जात आहेत. आमच्या अकोल्या जिल्ह्यांतून व खामगांव, अकोट, जळगांव वगैरे मोठमोठ्या ठिकाणाहून अर्ज गेल्याचें समजतें. सार्वजनिक सभेनें तर अगोदरपासूनच खटपट चालविली आहे. या सर्व चळवळीला काय श्रेय मिळतें कोण जाणें नाहींतर इंग्रजींतील ह्मणीप्रमाणें आपण भाकर मागत होतों तों सरकारनें आपल्याला दगड दिले असें तर झालेंच आहे.

याच संबंधानें दुसरी एक गोष्ट सरकारच्या ध्यानांत आणणें रास्त आहे. ती कोणती तर हायकोर्टाच्या स्थला संबंधांची सरकारनें मेहर करून आपल्याला प्रांतातल्या प्रांतांत हायकोर्ट तर दिलेंच आहे परंतु हीच मेहर जरा अधीक करून तें हायकोर्ट आकोल्यास ठेविलें तर लोकांस किती सुखावह होईल हें सांगणें नकोच. आकोलें हें शहर प्रांताच्या मध्यभागीं अमरावती पेक्षां अधीक येतें या मुळें चोहींकडील लोकांस लांबलांबून येण्यास विशेष सोयकर होईल. शिवाय हें रेलवेच्या मुख्य लाइनीवर असल्या कारणानें पुढें मागें उमरावती पेक्षां ही अधीक महत्वाचें होणार आहे. कलकत्या कडे जाणारी मेल आपल्या लाइनीनें जाऊं लागली म्हणजे अकोला स्टेशनला किती महत्व येईल हें सांगणें नकोच. शिवाय पैशा संबंधानेंही सरकारचा फायदा होईल. अमरावतीस हायकोर्टा करितां नवीन इमारत बांधावी लागेल. अकोल्यास तसें नाहीं. येथें इमारत आयती तयार आहे. या सर्व गोष्टींचा सरकारनें विचार करावा अशी आमची त्यास सूचना आहे. आमच्या अकोलेकर मंडळीनें ही या संबंधानें खटपट केली पाहिजे.

## ज्युडिशियल स्कीम.

ता. १८ जून सन १८८९ रोजीं निघालेल्या जादा रेसिडेन्सी ऑर्डरमध्यें ता. १ जुलै पासून अंमलांत येणाऱ्या ज्युडिशियल स्कीम प्रमाणें खालील असिस्टंट कमिशनर व तहशीलदार यांना मुलूख अमानी हैदराबाद प्रांतांत अधिकार दिले आहेत ते येणेंप्रमाणें —कोर्ट. पहिला वर्ग अ० क० (५००० रुपये पर्यंत.) अ० क० कर्नल एच. डीइपी. रेनीक; मि. आर. आनंड बी. ए. सी. एस. क्याप्टन् वॉरन हेस्टिंग्ज, मि. ए. इलियट, मि. सी. ए. डब्ल्यू डेव्हिस क्याप्टन् जे. जी. मॉरिस, मि. यासीनखान मि. एदुलजी बयमनजी, क्याप्टन् आर. व्हीग्यारेट, मि. सुरज नारायण, (ऑफिसिएटिंग.) कुमार श्री हरबानजी ए. अ. क. रावबहादूर पुरुषोत्तमराव; मेसर्स श्रीकृष्ण नरहर, देवराव जयकृष्ण, विश्वनाथ नारायण दांडेकर, माणिकशा रतनजी, गणेश श्रीकृष्ण खापर्डे; आरदेसर दिनशाजी, वामन नारायण बापट, आर. म्याकूगील, केशव जयकृष्ण व अंबादास संतो.

कोर्ट. दुसरा वर्ग अ० क० (१००० रुपये पर्यंत.)

क्याप्टन् आर. डी. सी. डेव्हिस. अ. क. व ए. अ. क. मेसर्स अयोध्या प्रसाद, व एच सी. प्राईस.

कोर्ट. अ० क० तिसरा वर्ग (५०० रुपये पर्यंत]

ए. अ. क. मेसर्स. आत्माराम भिकाजी इ. मार्शल. आणि विश्वनंदम्.

कोर्ट. पहिला वर्ग तहशीलदार (३०० रुपये पर्यंत.)

आक्ष्याची मि. हैदर अली व हशमत अली तहशीलदार मेसर्स. गोविंदराव यशवंतराव, गोविंदराज, नारायण पांडुरंग जोशी, सादत मीरखान, मुबारक अली, गीरराव रामचंद्र, सफदर अलीबेग, गणेश बापूजी, कृष्णाजी हरी, एकनाथ मेरिश्वर, गणेश गोविंद, शापूरजी वीरजी, सदाशीव भास्कर, वामन गणेश, बाळकृष्ण काशिनाथ, कृष्णाजी अंनत, अहमदअली, यशवंत महादेव, बळवंत बापूजी, व ऑनररी आक्ष्याची मि. रुस्तुमजी फरिदुनजी (इकडे आहेत तों पर्यंत.)

कोर्ट. दुसरा वर्ग तहशीलदार

मेसर्स शाबासखान, सी. शेषाचिलम्, जी. सुबराव.

स्मालकाज कोर्ट अधिकार.

सन १८८९ सालच्या स्मालकाज कोर्टांतील कलम १० प्रमाणें पहिला वर्ग अ क. कोर्टाचा अधिकार ज्या ऑफिसरांना वर दिला आहे ह्मणून लिहिलें आहे त्या सर्वांना ५०० रुपये पर्यंत स्मालकाज कोर्टचा अधिकार दिले आहेत व क्यापटन् आर. डी. सी. डेव्हास व मि. प्राईस यांना १०० रुपयांचा स्मा. का. कोर्टाचा अधिकार दिला आहे.

नायब तहशिलदार.

चांदुर, मूर्तिजापूर, जळगांव, आकोट, बाळापुर, दारव्हा, वणी, आणि मंगरूळ येथील तहशिलींत असणाऱ्या नायब तहशिलदारांनां आपआपल्या तहशिलीच्या हद्दींतील. ५० रुपया पर्यंतचे स्मा. का. कोर्टांत चालतील असे दावे चालविण्याचा अधिकार दिला आहे.

आकोला व खामगांव येथील स्मा. का. कोर्टांना नवीन कायद्यान्वयें १००० रुपये पर्यंतचे दावे चालविण्याचा अधिकार दिला आहे. व त्या कोर्टांच्या हद्दी पूर्वींच्या आहेत त्याच कायम ठेविल्या आहेत.

सेशन जज्जाला उमरावती, अकोला, इलिचपूर, बुलढाणा, वाशीम आणि वणी या सर्व जिल्ह्यांतील डेप्युटी कमिशनरच्या कोर्टाचे अधिकार दिले आहेत. व शिवाय उमरावती, अकोला व इलिचपूर जिल्ह्यांतील डे. क. च्या हाताखालील कोर्टांनीं केलेल्या ५०० रुपये पर्यंतच्या हुकूमनाम्या वरील अपील घेण्याचाही अधिकार दिला आहे. व हे सेशन जज्जाचें कोर्ट दिवाणी कोर्ट असें समजावें व हें फक्त ज्युडिशियल क. च्या हाताखालीं व देखरेखेखालीं राहील.

इतर जिल्ह्या प्रमाणें उमरावती जिल्ह्याच्या डे. क. चे अधिकार मि. ऐदुलजी बहिमनजी यांस दिले आहेत.

---

## नेटीव संस्थानें.

पदभ्रष्ट गाईकवाड महाराज मल्हारराव यांच्या प्राणावर बेतलेल्या तोहमती संबंधानें बोलतांना विलायतेहून आलेले बॅरिस्टर सारजंट बॅलंटाईन यांनीं जगांतील राजांविषयीं सर्व साधारण शेरा दिला आहे तो येउ पोक्त विचाराचा असून राजे लोकांच्या वर्तणुकीवर टीकाकरितांना नेहमीं लक्षांत वागविण्या सारखा आहे. राजेरजवाड्यांना आरोपाश्च पटलांनीं झांकून टाकितात, व कित्येक प्रसंगीं त्यांच्यावर आगपाखडण्यामही मागें पुढें पाहात नाहींत. अशा वेळीं राज्यकर्ते व धुरंधर मुत्सद्दी यांनीं कोणकोणते विचार खरोखर पक्षेपणीं मनांत बिंबवावेत अशा प्रकरणीं हक्क व न्याय कोणत्या धोरणानें अमलांत आणावा हें दाखवितांना बॅरिस्टर साहेब ह्मणाले कीं, 'ग्रंथ वाचनावरून प्रत्येक मनुष्याला अशा राजाविषयीं थोडी बहूत माहिती असतेच. त्याजवरून हे राजेलोक लहानांचे मोठे कसे होतात यांजला खरें स्वातंत्र्य किती असतें, यांचे विचार येडिनहुब तरी कसे दुसऱ्याच्या शिकवणुकीला अनुसरून असतात हे सर्वांस ठाऊकच आहे. कित्येक राजांच्या आयुष्य क्रमांत अशा कांहीं तरी दुर्दैवाच्या हकीगती बनून येत असतात कीं तेणें करून ते दुसऱ्याच्या स्वाधीन रहात जातात. व तेणेंकरून आपला आपण विचार करून वागण्याचे त्याजला फारच थोडे प्रसंग येतात. हिंदुस्थान देशालाच ही गोष्ट लागू आहे असें नाहीं परंतु सर्व पृथ्वीभर दिसून येत आहे कीं राजपुत्र व राजेलोक हे सदोदित कमजास्त प्रमाणानें नीच्याहून नीच अशा चाकरांनीं घेरलेले असतात. व हे चाकर लोक त्यांना लुटीत व फसवीत असतात व ठकवीत असतात तरी ही राजे लोक त्यांजवर विश्वास ठेवितात. 'हे वरील विचार सोप्या व साध्या शद्बांनीं दर्शविले आहेत तरी ते आजकालच्या हिंदुस्थानांतील नेटीव संस्थानच्या गैरव्यवस्थेसंबंधानें अक्षरशः लागूं पडतात हे प्रतिपादण्याचा आमचा उद्देश आहे.

नुकतेंच काश्मीर संस्थानांत मल्हारराव शाईचा छोटे खानी फार्स उडाला तो सर्वांस विदीतच आहे. प्रस्तुतचे तरूण व एककल्ली होळकर महाराज यांनीं आपल्या संस्थानांत किती बखेडा केला आहे त्याचा दाखला हिंदुस्थान सरकारापर्यंत अव्यवस्थेची ओरड पोंचल्यावर त्यांनीं कृपाळू होऊन होळकर कडे खासगी खलिता पाठविला आहे त्यांतील गुप्त मजकुराविषयीं लोकवार्ता कांनीं पडल्या ह्मणजे सहजीक कळून येण्या सारखा आहे. बडोदें संस्थानची हवाल सध्यांचे गाईकवाड सयाजीराव यांचे विलायतेचे प्रवास, डोंगरावरील थंडगार हवा खाण्याचा मोठा नाद व अर्थात त्यांचा सांगसांगीवरून चालणारा राज्यकारभार इत्यादि गोष्टी वरून धोरणी पुरुष सहजी लक्षांत घेतील. ग्वाल्हेरची गादी कोण चालवितात व राज्यकारभार रिजन्सी कौन्सीलनें कसा हकतात, कीड लागलेले तीन कोट रुपये मोठ्या युक्तीनें कसें चक्रवाढ व्याजानें व्याजीं सव्याजीं लाविले आहेत ह्या न ह्या सारख्या अनेक गोष्टी लोकांच्या दृष्टी समोर आहेत तेव्हां ग्वाल्हेर संस्थानची निराळी हकीकत देणें नलगे. निजाम हैद्राबाद हें हिंदुस्थानांतलें अग्राढव्य संस्थान आहे खरें परंतु त्यावर पूर्वीपार चालत आलेला मोंगलाई माणा बदलल्याचें कांहींएक चिन्ह दिसत नाहीं. कर्नल मार्शल साहेबांनीं आपलें निशाण कलकत्यापर्यंत फडकाविलें. साठ लक्षांची देणगी सरहद्दी प्रकरणांत सरकारांच्या पाया नवळ हजर केली, अबदुलहक सारख्या निजाम सरकारच्या इमानी व प्रामाणिक अमीर उमरावांनीं अधिकारी साहेबांच्या सल्लामसलतीनें आपआपल्या आयुर्मर्यादेपर्यंत निजाम सरकारच्या दौलतीवर स्वतांचे तळिराप गार करून टाकिले इत्यादि अनेक गोष्टी आज नव्यानें सांगणें नको. दक्षिण महाराष्ट्राचे माजी छत्रपती महाराज देशोधडीस लागले. अखेर वेडे ठरून चांदबीबीच्या प्रसिद्ध अहमदनगर शहरीं दांतीं तृण धरून आल्यावर यमसदनास गेले, रिजन्सीचा कुळवी गोळा राज्य कारभारांत भडिमार करूं लागला व सध्यां चांगली चांगली व्यवस्था म्हणून नवीन सुधारणा अमलांत येऊं लागल्या आहेत. ह्या व ह्या सारखीं पुष्कळ कारस्थानें लोक पहात आहेत, तेव्हां त्यांचे निराळ्या रीतीनें स्पष्टीकरण करण्याचें कांहीं एक प्रयोजन दिसत नाहीं. हिंदुस्थानच्या वैभवाचीं व उन्नतीचीं दर्शकें जीं नेटिवसंस्थानें त्यांतील कांहीं ठळक ठळक मासलेवाईक संस्थानांची हकीकत गोळाबेरजेनें आम्हीं वर दिली आहे त्यावरून नेटीव संस्थानांविषयीं अनुकूळ किंवा प्रातिकूळ अभिप्राय प्रदर्शीत करते वेळीं सरकारनें जुन्या मोडकळीस आलेल्या संस्थानांची तरफदारी हिंदुस्थानचें पुर्व वैभव राखण्या साठीं तरी निदान पत करावी, आणी लॉर्ड डल हौसी प्रमाणें तीं समूळ विलयास नेऊन खालसा करूं नयेत अशी आमची त्यांस सविनय प्रार्थना आहे.

पुढेंचालूं

The Berar Samachar

MONDAY JULY, 1, 1889.

## A PROPOSED EXTENSION OF THE JUDICIAL SCHEME.

A certain section of the Berar public grateful on account of the new judicial scheme are considering *seriously* whether they should not memorialize the government of India to extend to them the benifits of the new scheme to a further degree on much the same lines as the new scheme. The chief feature of the memorial is to be:-

The appointment of the revenue patel, patwari and the jaglias to do duties as Civil Courts.

Patels to have pecuniary jurisdiction in their villages to the extent of 25Rs, patwaris Rs 10 and Jaglias Rs five. In case of more Jagliss than one in a village, the whole lot to constitute a Bench presided over by the senior Patel. Appeals against these functionaries lie to Tahsildar. Second appeals being *quite unnecessary* in such cases and especially in Berar. The memoralists urge this on government only with a view to bring justice as they call it '*home to the people*, just in the fashion of the Naib Tahsildars who have been given 50 Rs *Small Cause* Court powers.

The memorialists are also going to urge that as in the recent special Residency Orders declaring the powers of several officers and Courts the fitness of particular individuals should have nothing whatever to do with the investment of office. As a rule the appointments are to be made first under a comprehensive rule, and capacity and fitness for work the memorialists say cannot but be found in the sections made by the benign *mabap* government.

---

The clerical appointments in the new scheme will be fat enough, we expect, to tempt some of the passed Higher Standard men to apply for some of the place. In the choice from out of the various applicants for the posts, it is to be hoped that patronage and recommendation may not find place. In the interests of the public service it is extremely desirable that good men should be got for the posts. Promotions in the public service if regulated by proved merit by passing prescribed examinations or otherwise, are sure to secure efficient men. In making the appointments therefore we hope that the claims of those who have passed the examinations by the higher standard, ought to be duly considered.

---

We congratulate Doctor Little upon the early publication of his report on the working of the Caritable Dispensaries during the year 1888, together with the Commissioner's and the Resident's reviews thereon. If annual reports and their reviews are of any use, they are so, if people get them on an early date in the year. But such never used to be the case hitherto with regard to these reports.

From the report we learn that the number of dispensaries during the year 1888 was the same as in 1887, viz 43. But these 43 dispensaries, it appears, are not properly distributed throughout the province with any reference to population. In the Elichpur District, for instance, there is a population of about 271,150 persons and there are 7 dispensaries. This gives one dispensary for every 38000 persons. On the other hand in the Akola District, with a population of 595,472 persons which is more than double that of the Elichpur District, the number of dispensaries is only 8. This gives one dispensary to about 74000 persons. We fail to find why this should be so. If as in the Elichpur District 38000 persons should have 1 dispensary for them, Akola District ought to have 14 dispensaries. Or if we accept the Akola District as the standard, then Elichpur District should not have more than 3 or at the utmost 4 dispensaries for it. It is however satisfactory to learn, that a proposal for establishing a dispensary at Patur in the Akola District is under contemplation of the authorities.

The old cry of the falling off in the number of major surgical operations has not yet ceased. The figures show that the number of major as well as minor surgical operations during the year under report, has decreased. There were only 8 operations of lithotomy, and strangely enough they were all performed at Amraoti 6 by the Civil Surgeon Doctor Roe and 2 by Hospital assistant Mr Punambulam of the Amraoti city Dispensary. "Mr Punambulam" says Doctor Little in his report, "is the only subordinate Medical officer in Berar with the nerve to undertake a major Surgical operation."

There is decidedly an increase in the number of operations of the eye. In the year 1888, there were 7 operations for cataract against 2 in the year 1887. Of these seven cases, 4 are said to be cured, 2 relieved, and one was "discharged otherwise" which means, we suppose, that in that case, there was no relief of any kind at all except that the patient did not die under the operation.

The Inspector General of Dispensaries remarks that the statement which shows the caste and sex of those that attended the dispensaries during the year calls for few remarks. Of the total number of patients treated 125,000 were males, 30,000 were females, and 92,000 were children which gives a relative proportion to attendance of 50, 16 and 34 percent respectively. But at the Mehekar dispensary the female attendance exceeded that of males in the ratio of 120 women to 100 men as compared with 32 to 100 for the province. The cause of this abnormal increase is not stated. The Inspector General of dispensaries merely remarks that the increase of female attendance is "worthy of note", a compliment in which the Commissioner and the Resident by their silence impliedly concur. That a dispensary like that of Mehekar in this province should be attended by a greater number of women than that of men, seems to us to be at least very strange if not suspicious. When out of every 100 persons attending the dispensaries in the province, the reports for the past 5 years show that only 16 are women, we fail to find how we should accept the figures given in the report which show that at one particular dispensary the attendance of females is greater than that of males. The figures surely require some explanation as *all* other dispensaries in the province show that the number of females attending them is much smaller than that of the males.

---

(Extra Residency Orders 26-6-89.)
No. 157

In exercise of the powers conferred by Sub-sections 1 and 2 of Section 4 of the Hyderabad Assigned Districts Small Cause Courts Law 1889, and with the previous sanction of the Governor-General in Council, the Resident is pleased to establish a Court of Small Causes at each of the places in the Hyderabad Assigned Districts named below and to define the local limits of the Jurisdiction of each Court to be as specified opposite each of them:—

Badnera—All places in the Murtizapur, Amraoti, and Chandur Taluks not included within the local limits of the jurisdiction of the Small cause Court at Amraoti.

Telhara— The Akot and Julgaon Taluks of the Akola District.

No. 158.

In exercise of the powers conferred on him by Section 10 (3), and subject to the provisions of Section 10 (1) and (2) the Resident is pleased to direct that all suits of a civil nature of which the value does not exceed one thousand rupees shall be cognizable by the Courts of Small Causes at Badnera in the Amraoti District and Telhara in the Akola District.

No. 159.

In exercise of the powers conferred by the proviso to Section 8, clause (2) of the Hyderabad Assigned Districts Courts Law 1889, and in continuation of Notification No. 140 dated the 18th June 1889, published in the Extraordinary issue of *Residency Orders* dated the 21st June 1889, the Resident is pleased to direct that Courts of Tahsildars in the Hyderabad Assigned Districts shall not be competent to try suits of the following classes:-

1. For immoveable property other than house property. 2. For specific performance of contract. 3. To declare and establish rights to real property including preemption, foreclosure, &c. 4. To declare and establish personal rights. 5. For an account. 6. Relating to religious endowments. 7. To set aside judgments, contracts, or obligations on the ground of fraud. 8. For dissolution of marriage. 9. For enforcement of matrimonial rights. 10. For partition. 11. Relating to religion and caste.

---

## CORRESPONDENCE.

To
The Editor Berar Samachar.

Dear sir

The Bank of Bombay located at this station is a great boon to the public.

It is a pity that it closes so soon on Saturdays. I am told, the rules do not a limit of it being opened longer than 1 P. M; but not-with-standing these strict injunctions I was surprised to find that the agent should have infringed them simply to oblige a fair skinned friend of his; while other poor natives, who presented their cheques a few minutes before, were told to come on Monday; why make fish of one and flesh of the other. The Head office should insist upon the agent obeying the orders given him.

A gentleman, if he can be called such that was hard pressed for cash persisted in cashing his cheque on a Saturday after one oclock but on his request being refused by the accountant, he referred the matter to the agent who thought it fit to do what he has done.

Oh by the by, I believe the accountant of the P. W. D. has applied for a transfer to another province at his own expense, I wonder why he has done so; some occasion, I dare say must have been given him. I trust indeed that this will at least induce the higher authorities to make a searching enquiry into the matter and punish those in fault.

23 nd Jnne 1889.

Nero.

---

The services of Colonel F. W. Grant, Deputy Commissioner of the 3rd class in the Hyderabad Assigned Districts, are replaced at the disposal of the Military Department, with effect from the 6t July, 1889.

---

Mr. T. H. S. Biddulph, Comptroller, Hyderabad, is granted privilege leave for two months and twenty eight days from the 31rst July 1889.

---

Mr. H. S. Groves, Assistant Accountant General, Bombay, is appointed to officiate as comptroller, Hyderabad, during Mr. Biddulph's absence on privilege leave

---

We acknowledge with thanks the receipt of the following:—

Report on Civil justice in the H. A. D. for 1888. Reports on Jails in the H. A. D. for 1888.

---

## वऱ्हाड.

मि. म्यागिल ए. अ. क. यांची येथें बदली झाली. त्यांना स्मालकाज कोर्ट जज्ज नेमले असें म्हणतात.

मि. हनमंतराव येथील माजी खजीनदार यांस जागा देण्याबद्दल मे. रेसिडेंट सा. नीं ठरावेलें आहे.

गेल्याचे मागील शनिवारीं वऱ्हाड सार्वजानिक सभेची सभा होऊन रेव्हिन्यु कोड संबंधानें सरकाराकडे सभेचा अभिप्राय पाठवावयाचा आहे त्याचा मसुदा तयार करण्या करितां एक पोट कमिटी नेमण्यांत आली आहे.

मि० यासिनखान साहेब अ. क. यांस वाशमास ऑफिशिएटींग डे० कमिशनर नेमले आहे.

रा० रा० वामनराव नापट यांची रजा मंजूर झाली असें ह्मणतात.

खामगांव येथें व्यापारी मंडळीनीं एकत्र मिळून सट्टयाचे भाव तोडले ते येणें प्रमाणें:- जवारी ५३।, रुई ओझे ६७, गहू ७३ व आळशी ९१ रुपये.

रा. रा. चिंतामणराव आपटे इ. आ. र. यांनीं रजेवरून परत येऊन आपले कामाचा चार्ज घेतला व रा. रा. त्र्यंबकटरावजी यांनीं उमरावतीचे सर्व रजिस्टरचे कामाचा चार्ज घेतला.

कर्नेल ग्र्यांट सा. यांची तारीख ६ जुलईपासून लष्करी खात्यांत बदली झाली व तिकडून ते पेनशन घेणार.

मि. प्लौडन सा. येत्या आगष्ट महिन्यांत रजा घेऊन विलायतेस जाणार आहेत.

मि. हावेल साहेब हैद्राबादचे रेसिडेंट यांनीं राजीनामा दिला व सरकारनें तो मंजूर केला.

सेशनजज्जाचे क्ला. ऑ. कोर्टाची १५० रु. ची जागा रा. रा. त्र्यंबक गणेश परांजपे क्ला. ऑ. को. इलिचपूर यांस व हे क्ला. ची १०० ची जागा रा. रा. विठ्ठलराव क्ला. कमिशनर ऑफीस यांस मिळणार असें कळतें.

कप्तान मारिस सा. येथें डे. कमिशनरचे कामावर येतील व मि. ड्रेअर सा. वाशिमास डे क चे कामावर जातील असें समजतें.

---

## वर्तमानसार.

सिंगापुरच्या खाडींत तीन चिनी लोक जाळें टाकून मासे धरीत होते. जाळें जडसें भासूं लागल्या वरून आपल्यास आज मोठा मासा मिळतो असें त्यांस वाटून फार आनंद झाला. पहातात तों माशाच्या ऐवजीं लढाऊ गलबत वर आलें. हें गलबत गतवर्षी नाहींसें झालें होतें. मासा मिळण्याच्या बदल गलबत जरी लागलें तरी मासा मिळून जो त्यांस फायदा झाला असतां त्याच्या चौपट या गलबतापासून झाला.

शेंपूट असलेलीं मनुष्यें आफ्रिकेंत नागोजाग प्रवाशी लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु नुकेंच एक ११ वर्षांचें पोर शेगान फ्रेंच चायना येथें सांपडलें. त्याला १० इंच लांब शेंपूट आहे. तें अगदीं मवाळें असून त्यांत हाडबीड कांहीं नाहीं.

राष्ट्रीयसभेच्या विरुद्ध जाण्याचें मुंबईच्या कित्येक पारशांनीं मनांत आणलें आहे. आह्मी हिंदुस्थानचे राहिवाशी नाहीं असें ते समजतात. बरें आहे, चलावें इराणास!

आमच्या देशांतील वकील किंवा ब्यारिस्टर यांचे ठायीं नीतिधर्म नांदतो कीं नाहीं हें सांगण्यास अडचण वाटते.—कारवार-समाचार.

कोळशाच्या ऐवजीं दगडी तेलाचा उपयोग करूं लागले आहेत व त्यामुळें गाडीच्या वेगांत ही बराच फरक पडूं लागला आहे.

परवां इंग्लंडांत रेल्वेवर मोठा अपघात झाला. त्यामुळें ७० मुलें मेलीं व ३० जखमी झालीं.

गरीब आरोपी असला तर त्याचें काम फुकट करीन असें प्रत्येक वकिला पासून त्यांस सनद देतेवेळीं कबूल करून घेण्याची चाल फ्रान्सांत आहे. तशीच मध्यप्रांतांत सुरूं करण्याची वाटाघाट चालूं आहे. आमच्या पुण्यास ही खटपट झाली; पण सिद्धीस गेली नाहीं.

जर्मनींत एक मनुष्य आहे. तो १२ वर्षांचा होता तेव्हां त्यास दाढी येऊं लागली, ती १४ वे वर्षी त्याचे छातीवर पडत असे. हल्लीं त्याच्या ६२वें वर्ष त्या दाढीची लांबी बरोबर ७॥ फूट आहे.

इंडिया कौन्सिलचे सभासदांची संख्या १० करणार.

सदरे, जाकिटें, खमीज वगैरे कपडे गळ्यापाशीं अडस व घट्ट बसतील असें करूं नये त कारण घट्ट गळपट्ट्यानें डोळे खराब होतात, दृष्टीस मांद्य येतें असें प्रोफेसर डा० फोर्स्टर नेत्ररोगशाळेंतील वैद्य यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

किडा, मुंगी वगैरे लहान जीव पुष्कळ दिवस वांचतात. मात्र त्यांस कोणी इजा देऊं नये ह्मणजे झालें. मुंग्या १३ वर्षे वांचतात असें प्रमाणसिद्ध ठरलें आहे.

युरोपांत सर्वांत जुनें स्वतंत्र प्रजासत्तात्मक राज्य म्हटलें ह्मणजे "स्यानमारिनो" हें आहे. या ठिकाणीं प्रजासत्तात्मक राज्य स्थापन होऊन आज १५०० वर्षे झालीं.

के०

बंद झाली—मुंबई येथील देवजी भानजी आणि कंपनीचें गेल्या शनिवारीं चार लाखांचें दिवाळें निघून कंपनी बंद झाली.

कलकत्ता एथें प्रत्येक छत्रीवर अर्धा आणा या प्रमाणें कर बसविण्याचा विचार चालला आहे!

श्रीगोंद्यास महमद नांवाचा मठ आहे. त्यांतील वंशज मुसलमान असतांना मांसाला स्पर्श देखील करीत नाहींत व हिंदु प्रमाणें गंध लावून, शेंडी राखून विठ्ठलाचे अर्चनेंत मग्न असतात!

कृत्रिम फुफ्फुस एका अमेरिकन प्रोफेसरानें एक फुफ्फुस बनविलें आहे. साधारणपणें पाण्यांत बुडून गत प्राण झालेले प्राणी या फुफ्फुसानें पुनः जिवंत करतां येतात. ह्याचा प्रयोग अद्यापि मनुष्यांवर करून पाहणें आहे. परंतु सदर प्रोफेसरानीं आपल्या लाडक्या सशास अकरावेळा जळसमाध देऊन व कोळशांच्या धुरानें गुदमरून मारलें व पुनः सजीव केलें.

क० त०

युरोपांतील मोठमोठ्या राष्ट्रांनीं गेल्या सालीं ९६ लढाऊ जहाजें तयार केलीं व हल्लीं ९६ तयार होत आहेत.

कातडी कमविण्याच्या कामीं विजेचा उपयोग करतां येतो.

सुकलेल्या गवता पासून बंदुकीची दारू तयार करण्याची एक युक्ति निघाली आहे.

लंडन टाइम्स मध्यें हैदराबाद डेक्कन मायनिंग खटल्या संबंधानें सर्व पत्रव्यवहार छापून प्रसिद्ध केल्या मुळें फार त्रास झाला असें विलायत सरकार व मेसर्स फेरफिल्ड यांचें ह्मणणें आहे.

झार साहेबांच्या भाचाचें लग्न ग्रीसच्या राजाच्या मुलीशीं सेंटपीटर्सबर्ग येथें ता. १५ रोजीं मोठ्या थाटानें झालें.

इराणचे शहा आमस्टरडाम येथें ता. १६ रोजीं दाखल झाले.

काशीचे वयोवृद्ध महाराज मृत्यु पावले. महाराजांनीं गादीचा अनुभव १८३५ पासून आजपर्यंत घेतला हें महाराज फार विद्वान होते.

जर्मनीचे बादशहा व रशियाचे झार यांच्या भेटी पुनः कील येथें लवकरच पडतील असें समजतें.

सु० प०

रमाबाई ह्मणतात—अमेरिकेंत सध्यां अडीच कोटी शिवाजी आहेत अबब! लंकेंतले सारेच रावण हेंच खरें. प्रण येसू करो आणि तितके अवरंगजेब व संभाजी न निपजोत ह्मणज झालें.

पार्लमेंटच्या मेंबरांस पार्लमेंट सभेच्या पत्यावर जीं पत्रें येतात त्यांची सरासरी रोजची सात हजारा पासून दहा हजारा पर्यंत असते.

धा. व.

सरहद्दी वरील रेल्वे दुरुस्त करण्या करितां १७ लाखांची मंजुरी मिळाली आहे रशिया हिंदुस्थानाकडे येत नसला तर मग ही तयारी कशाला?

मुंबईस एका ब्राह्मणाणाच्या बाईचा नवरा दुखण्यानें मरणोन्मुख झाल्या वरून बाईनें विरहदुःखाचें ध्यान मनांत आणून अफू खाऊन प्राण दिला! बाईचें वय ४० वर्षांचें होतें. कायदा करा कीं पाहिजे तें करा ज्याच्या मनांत जी गोष्ट आहे ती तो केल्यावांचून रहावयाचा नाहीं.

पु० वै०

नोटिस.

रा. रा. जबरसिंग वल्लद भाऊ पाटील वस्ती मौजे ढोरानी तालुके खांडवा जिल्हा नेमाड यासी लिहून देणार बिंदेसरी रामधन परदेशी ब्राह्मण रहाणार अकोला याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे मार्फतीनें रघुनाथदास रामप्रताप याज कडून ९१ रुपये घेतले असून ते रुपये देण्याचा आठ दिवसांचा करार केला असून त्या रुपया ऐवजीं तुह्मी आमचीं लांकडें गहाण ठेविलें असून रुपये न देतां निघून गेले आणि आह्मास चार ४ रुपये माव्हार ठरविला होता. यास्तव वरील रुपयाचे व्याज रुपये वीस २० नोकरी बद्दल रुपये ४८, व कमेटीचे जाग्याचें भाडें रुपये १२, व आमचे पासून रोखनगदी घेतले ८ रुपये व दाळ आण्या बद्दल ५ रुपये एकूण १८४ रुपये तुमचे कडेस एकशे चौऱ्याऐंशी निघत आहेत. हे आठ दिवसाचे आत येऊन साहु मजकुराचे रुपये व याचा फेड द्यावे आणि आमचे महिन्या बद्दल, भाड्याबद्दल व रोखनगदी वगैरे रुपये देऊन आपला माल घेऊन जावें तसें तुमचे कडून वर्तन न झाल्यास अनामत गहान असलेला माल फरोक्त करून साहु याची रकम व्याजा सुद्धां फेड करून देऊं व बाकी जी जास्त राहील ती आपच्या रकमेंत जमा करून निपूर आल्यास रीती प्रमाणें तजवीज करून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च होईल व ह्या नोटिशीचा खर्च या सह सर्व घेतलें जाईल.

कळावें. तारीख २२ माहे जून सन १८८९

सही

बिंदेसरी रामधन दस्तूर खुद.

नोटिस.

रा० मारुती वल्लद विठोबा बाळापुरे व सुकदेव वल्लद मारुती बाळापुरे राहणार झाशपिळशी तालुके जळगाव यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, मी सुकदेवची लग्नाची बायको असून आज नऊ वर्षे झालीं तो आतां पर्यंत मला आपल्या घरीं नेत नाहीं व मज बरोबर संसार ही करीत नाहीं व त्याच प्रमाणें मला खाण्यापिण्याला व वस्त्रपावर्णाला वगैरे कांहींच देत नाहीं. त्या मुळें मी माझ्या आईचे घरीं राहत आहे व आई गरीब असल्या मुळें लोकांचें कर्ज काढून आपलें पोट भरीत आहे. आज पर्यंत सुमारें २५० रुपये कर्ज मला झालें आहे. व या पुढें मला कोणी कर्ज देत नाहींत. व माझी आई मला पोसूं शकत नाहीं. तर तुम्हास कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत मला आपले घरीं घेऊन जावें. व माझे कर्ज अदा करावें. अगर माझ्या अन्नवस्त्राची दुसरी कांहीं तजवीज करून द्यावी. त्या प्रमाणें मंजूर नसल्यास दुसऱ्या कोणाचा घरटाव करण्यास मला परवानगी द्यावी. नोटीशीचें उत्तर तुम्ही दिलें नाहींतर तुह्मीं मला दुसऱ्याशीं पाट लावण्यास परवानगी दिली असें समजेन कळावें तारीख २७ माहे जून सन १८८९ इ०

( सही. )

मुली मर्द सुकदेव निशाणी खुद हातची बांगडी असे,

# जाहिरात.

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं सन १८८६ च्या वऱ्हाड मुनसिपल कायद्याप्रमाणें अकोल्यास नवीन मुनसिपल कमिटी तारीख २१ मे पासून स्थापित झाली. तिची स्पेशल सभा तारीख १५ जून रोजीं भरली होती. तींत मुनसिपाल कमिटीचे हद्दींतील भागांत व त्यावरील कामदारांत थोडा फेरफार झाला आहे. पूर्वीचे कमेटीनें शहरचे ३ व पेठेचे ३ मिळून ६ डिव्हिजन (भाग) केले होते. हल्लीं त्यांपैकीं शहरांतील ३ व पेठेंतील २ डिव्हिजन पूर्वींचेंच कायम ठेवले आहेत, मात्र ताजनापेठेंत एक सदरस्टेशन डिव्हिजन जास्त केला आहे; आणि ब डिव्हिजन मोठा होता त्याचे ब आणि ग असे दोन भाग करून दोन डिव्हिजन केले आहेत. असे शहर व पेठ मिळून ८ डिव्हिजन केले आहेत. त्यांजवर डिव्हिजनल मेंबर ज्या ज्या गृहस्थांस नेमिले आहे त्याजबद्दलची माहिती खालीं दिली आहे.

## पेठ.

| डिव्हिजनचें नांव | मेंबरांचें नांव |
|---|---|
| १ सदरस्टेशन | मि. आर. एटकिन साहेब एजंट मुंबई ब्यांक |
| २ अ | मि० नामदेव राजन्ना |
| ३ ब | मि० सलिमखा दाउतखा साहू |
| ४ ग | मि० सोराबजी मंचरजी एजंट ब्रुएल कंपनी. |
| ५ क | मि० टिकमदास ताराचंद |

## शहर.

| | |
|---|---|
| ६ ड | मि० हरी रामचंद्र रोहणखेडकर |
| ७ इ | मि० मिरझा अब्बासबेग इनामदार |
| ८ क | मि० रामप्रताप रघुनाथदास |

पूर्वींच्या डिव्हिजनच्या हद्दी त्याच कायम ठेवल्या आहेत. ब डिव्हिजनचे २ भाग केले आहेत त्याच्या हद्दी येणेंप्रमाणें(ब)—पूर्वेस—रा. गोपाळ खुशाल यांचे घराचे ईशान्य कोपऱ्यापासून रामदीन पांडे ह्याचे घराचे कोपऱ्यापर्यंतची दक्षिणोत्तर सडक, पश्चिमेस—मे. सलिमखा साहेब यांचे घरा समोरील स्टेशनाकडे जाणारी सडक मासुमशाचे सडकेपर्यंत; दक्षिणेस— आठवडे बाजारचे दक्षणेकडील नाला, उत्तरेस—मासुमशावलीची पू० प० सडक (ग)— पूर्वेस—ब डिव्हिजनची प० हद्दीची सडक; पश्चिमेस—नदी. दक्षिणेस—डिस्पेन्सरीचे द० बाजूनें जाणारा नाला; उत्तरेस—मासूमशावलीकडे जाणारी पू० प० सडक.

ज्या लोकांस मुनसिपल कमिटीच्या कामासंबंधानें अर्ज वगैरे करणें असतील ते त्यांनीं आपापल्या डिव्हिजन मेंबराकडेस करीत जावें. ह्या संबंधीं विशेष माहिती लागल्यास मुनसिपल कमिटीचे ऑफिसांत मिळेल.

तारीख २१ माहे जून सन १८८९

Krishnaji Malhar Paithanker

सेक्रेटरी मुनसिपाल कमेटी

अकोलें.

☞ हें पत्र अकोला येथें के० वा खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

फ़ेरकोळ अंकास.........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Six monthly............3 " ९
Single copy..................................4a

Advertisements
Below 10 lines...21
per line over10... 4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 8 JULY 1889 | NO. 26

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख ८ माहे जूलै सन १८८९ इ० | अंक २६

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळनच असतील असें समजूं नये.

ता० पुसद.
ता० ३० जून सन १८८९

Complaints against the Postal arrangements

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा० न० वि० वि० आजरोजीं पोस्टाच्या गैरव्यवस्थेसंबंधीं चार ओळी पाठविल्या आहेत. त्यांस मेहरबानी करून ह्याच अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे. ह्यापासून जर पोस्टाच्या वरिष्ट अधिकाऱ्यांनीं मनावर घेतलें तर लोकांची गैरसोय दूर होईल.

वाशिमपासून उमरखेड पावेतों तसेंच पुसदपासून दिग्रसपावेतों डिस्ट्रिक्ट लाइन्स आहेत. ह्या लाइनीवरून हलकारे हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत रात्रीं, व पावसाळ्यांत दिवसा डाक घेऊन धांवतात. हल्लीं वाशिमाहून पहाटेच्या तीन वाजतां निघून पुसद येथें साडे अकरा वाजतां डाक यावी असा नियम आहे, नंतर येथून निघून पुढें उमरखेड व दिग्रस ह्या ठिकाणीं जावी. आतां ही वेळ पाहिली असतां फार सोयीची व विचारी मनुष्यानें नेमलेली आहे व ती चांगली आहे. परंतु कित्येक दिवशीं ह्या वेळेस डाक न येतां संध्याकाळीं पांच सहा वाजण्याच्या अमलांत येथें येते. तेव्हां अर्थातच ते दिवशीं डिलिव्हरी होत नाहीं. मग दुसरे दिवशीं सकाळीं डिलिव्हरी होऊन सात आठ वाजण्याच्या सुमारास लोकांस पत्रें मिळतात. त्यानंतर महत्वाचे व जरुरीच्या पत्रांचे जबाब, कांहीं माहिती मिळवून लिहावयाचे असतात. हे जबाब लिहून पोस्टांत जावें तो वाशिमची डांक निघून गेली किंवा बंद झाली असें समजतें मग हिरमोड होऊन पत्रें पेटींत टाकावी व घरीं यावें हीं पत्रें अर्थात कितीही जरूरीची असली तरी दुसरें दिवशीं जाणार. हेंच डांक वेळेच वेळेस येऊन ज्यांची त्यांस पत्रें वेळचे वेळेस मिळती तर अशी गोष्ट झाली नसती.

ही गोष्ट लोकांचे गैरसोयीची झाली. आतां बिचाऱ्या हलकाऱ्यांची स्थिती मनांत आणली ह्मणजे अंगावर थरथरकांटा उभा राहतो. येथून थेट दिग्रसपर्यंत जंगल आहे, त्यांत मध्यें बंदी आहे. ह्या दिवसांत झाडास पालवी येते, गवतास मान येतो ह्मणजे अशा जागेवरून रात्रीं एकटे मनुष्यानें जाणें ह्मणजे किती धिराचे व जिवावरचें काम आहे. ह्याबद्दल आपले वाचकांनींच विचार करावा. त्याप्रमाणेंच पुसदहून उमरखेडास जाणारी डांक ही ऐन मध्य रात्रीं कधीं कधीं घाटांत असते. निदान ह्या हलकाऱ्यांना रात्रीस घाटांत ठेऊं नये. अलीकडे मनुष्यास उद्योग मिळेनासे झाले ह्मणून हे हलकारे लोक नऊ दाहा रुपयाकरितां आपले जिवावर उदार होऊन भर रात्रीं मानलेल्या जंगलांतून एकटे जातात. त्याजवळ स्वसंरक्षणाचें साधन पाहिलें असतां तीन घुंगरू व एक लहानसा भाला. एखादें रानटी जनावर अंगावर आलें तर ह्यांपैकीं एकाचा ही मोठासा उपयोग होईल असें नाहीं. ह्या खेरीज ह्यांजवळ जोखमीचा व किंमतीचा माल असतो, तेव्हां सरकारासही एखादे वेळेस चट्टा लागण्याचा संभव आहे.

ह्या वरील सर्व गोष्टी ध्यानांत आणून पोष्टाचे वरिष्ठअधिकाऱ्यांनीं डांक वेळचे वेळेस जाईल व येईल ह्या बद्दल सक्त उपाय योजावें अशी माझी त्यांस विनंती आहे. कळावें लोभ करावा हे विनंती.

आपला
पुसद तालुक्यांतील
"एक मित्र"

---

ता. पुसद वऱ्हाड ता. २९-६-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा० न० वि० वि० इतके दिवस आपली भेट घेतली नाहीं. ही तरी कांहीं कारणामुळेंच घेतली नव्हती. असो, आतां पाठविलेल्या चार ओळीस कृपा करून जागा द्यावी.

हवामानः—पावसाळ्यास सुरवात होण्याचे दिवस नजीक आले आहेत असें भासूं लागले आहे. एक दोन पाऊस ही पडले आहेत. हवेंतील ती मागची असह्य उष्णता कमी झाली आहे. लोक आपापल्या वराच्य बरसातीच्या सोयी करण्यांत गुंतले आहेत.

येथील तहशीलदार रा. रा. कृष्णाजी अनंत ह्यांची बदली चांदूर येथें होऊन त्यांचे जागीं चांदूरचे तहशीलदार रा. रा. गणेश गोविंद हे आले आहेत. रा. रा. कृष्णाजी अनंत ह्यांस येथील हवा मानत नव्हती व ते बहुत करून अलीकडे आजारी असत. आतां त्यांची प्रकृति सुधारून ते आपलें काम मोठे मेहनतीनें करोत व लोक प्रियता संपादोत अशी आमची इच्छा आहे. येथें आलेले गृहस्थ अनुभाविक व आपले कामांत दक्ष असे आहेत त्यांनीं मागील तुंबलेल्या कामाचा निकाल करण्याचा सपाटा लावला आहे. ह्यांचे कारकिर्दींत काम तुंबून पडणार नाहीं व लोकांस कुचंबत बसावें लागणार नाहीं. असें दिसतें.

येथें असलेले कमिटीचें काम अगदीं बरोबर होत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. येथाल कमेटी गांवांतील सडकांची दुरुस्ती करिते ती ऐन उन्हाळा लागण्याचे सुमारास करते. त्या वेळेस जिकडे तिकडे धुरळा होण्यास सुरवात होते, तशांत कमेटीही सडकांच्या बाजूच्या नाल्या उकरून सर्व माती सडकेवर टाकते. मग काय गुलाल-च गुलाल! त्या नाल्या पाऊस काळ पर्यंत पुन्हा भरून जातात. व पावसाचें पाणी सडक धुऊन टाकिते ह्या प्रमाणें दोन्हीकडून त्रासच होतो. तरी वरिष्ट अधिकाऱ्यांनीं इकडे लक्ष पुरवून कमेटीची ही वहिवाट मोडावी. कमेटीच्या खर्चाचे अंदाजे अद्याप मंजूर झालि नसतील असें वाटत नाहीं. कारण वरिष्ट अधिऱ्यांचे ध्यानांत ही गोष्ट असेलच. आणि जर अंदाजेच मंजूर झाले नसतील तर बिचारी कमेटी काय करील. मग आमच तीस कांहींच ह्मणणें नाहीं. तरी ही गोष्ट अधिकाऱ्यांचे नजरेस आणवून त्यांची चूक त्यांजकडून दुरस्त करवुन घेण्याचें काम आमचे कमेटीचे आहे. पण इतकी पंचाईत होईल तेव्हां खरें!

येथें एक मुनसब कोर्ट होणार ह्मणून समजतें. तेव्हां आतां पक्षकारांचा बराच त्रास चुकला असें समजावयाचें. खरोखर पाहिलें असतां येथें कोर्टाची फार जरूरी होती. कारण ह्या तालुक्यांतील उमरखेड परगण्यांतील लोकांस थोड्याशा कारणाकरितां देखील वाशिमास तीस कोस जावें लागत होतें. ते त्याचे श्रम आतां वांचतील. हल्लीं येथें तहशिलदार साहेबांस ही पन्नास रुपयापर्यंत अधिकार दिला आहे. जर कोर्ट जुलई पहिले तारखेस सुरूं होण्याचे असेल तर तहशिलदार साहेब ह्यास पंधरा वीस दिवसां करितां अधिकार कां दिला हे समजत नाहीं.

येथील लायब्ररीची स्थिती अलिकडे बरी आहे. त्यांत ईश्वरकृपेनें सुधारणा होऊन लोकांस वाचनाची अभिरुचि लागो.

आपला,
पुसद तालुक्यांतील
"एक मित्र"

---

( लिहून आलेला मजकूर )

अकोल्यास कंपन्यांच्या दुकानांचा सुकाळ माथाळ्यावरील लेख पहून कोणास वाटेल कीं, आमच्या ह्या कंपन्यांचा असा कोणचा त्राप आहे. ह्या कंपन्यां पासून कोणत्या ही प्रकारचा त्रास नाहीं, त्या पासून लोकांस एकेजागीं भांडवल करून व्यापार करण्याचा संवत लागत आहे. गिऱ्हाईकांस पैशा दोन पैशांनीं जिन्नस ही इतर दुकनदारांपेक्षा बहुधा स्वस्त मिळतो. किंमत ठरविण्या करितां गिऱ्हाईकांस इतर दुकानी जी हेंगळ व टांकें फोड करावी लागते ती ही करावी लागत नाहीं. ह्या सर्व गोष्टि भांडवला संबंधानें खऱ्या आहेत; पण त्यांपासून देशास कोणताच फायदा होत नाहीं. उलटा तोटा होत आहे हें दाखविण्याचा पुढें प्रयत्न केला आहे.

कंपनीचे दुकान अकोल्यास प्रथम एकच होतें. आमचा आपली ही एक खोड आहेच कीं कोणी कांहीं नवीन टूम काढिली व तो फारशी भानगडीची नसली म्हणजे ज्यानें त्यानें तिचेंच अनुकरण करावें व चढावोढ करून त्यांत कांहीं सत्व नाहीं असें करून टाकावयाचें. असें न करितां आपली बुद्धी खर्चून दुसरें कांहीं नविन काढण्याचा प्रयत्न केला तर फार उत्तम होईल. ह्या खोडी प्रमाणें अकोल्यास एकामागून एक कंपन्या स्थापन होऊन त्या बहुतेक सर्वांनीं दुकानेंच घातलीं. दुकानांत तरी बहुतेक परदेशीय माल स्वदेशी मालानें जणुकाय दुकानांची शोभाच कमी होतें देशी माल म्हणजे सर्वच महाग पडतो असें नाहीं, हल्लीं नागपुरचे एंप्रेस मिल मध्यें जें कापड निघत आहे, तें उत्तम असतें निदान आमच्या सारख्या खाऊन पिऊन राहणाऱ्यांस तर तें खरोखरच उत्तम आहे. कारण दोन पैशांनीं स्वस्त असून टिकण्यांत जास्त असतें. तेव्हां मांचेस्टरचे जगन्नाथी ठाण घेऊन त्याची धोतरें करावयाचीं त्यापेक्षां ह्या गिरणींतील धोतर जोडा वापरणें पुष्कळ फायदेशीर होईल. श्रीमंत व नाजुक लोकांस कदाचित ही धोतरें पसंत पडणार नाहींत. पण ते ही जर आपल्या देशांतील कारागीर लोकांविषयीं थोडा विचार करतील तर त्यांची खातरी होईल कीं आपण जर आपल्या मालाच्या खपाविषयीं काळजी घेतली नाहीं तर तो माल पुढें मुळींच दृष्टीस पडेनासा होईल तसेंच इचिलपुरस चंद्रपुरास ठाणें क्लोथ प्रमाणें खाद्या निघतात त्याही उत्तम टिकाऊ व सवंग असतात. ह्या असल्या मालाच्या उत्पत्तीस व खपास आपण उत्तेजन दिलें पाहिजे. हें उत्तेजन देण्याचें काम कांहीं अंशीं दुकानदारांचें आहे व कांहीं अंशीं लोकांचें आहे. दुकानदारांनीं शोध ठेवून असल्या कापडांचे नमुने आणवून गिऱ्हाईकांस दाखविलें पाहिजेत; त्या खेरीज त्यास कळण्याचा दुसरा मार्ग नाहीं.

आमच्या अकोल्याचे कंपनीचे दुकानांत हे माल मुळींच नाहींत. तरी त्या कंपन्यांच्या व्यवस्थापकांनीं ह्या गोष्टी कडे लक्ष देऊन असला माल विक्री करितां ठेवावा. ह्या गोष्टीनें स्वार्थ साधून देशसेवा केल्याचें हीं थोडेसें श्रय येईल.

ह्या कंपन्यांच्या दुकानांतून बहुतक भपकेदार विलायती माल ठेविलेला असतो. गिऱ्हाईकांनीं हा भपका पाहिला ह्मणजे त्यांचें मन अर्थातच त्याकडे वळतें. पुढें गिऱ्हाईकें दुकानदारांस किंमत विचारतात. किंमत काय त्या भपक्याच्या मानानें कांहींच नाहीं. शिवाय तशाच तऱ्हेच्या मालास इतर दुकानांत जी किंमत पडते त्या पेक्षां किंमतही येथें कमी. मग काय घ्या हें घ्या तें. बाहेर गांवचे लोक आले ह्मणजे त्यांस तर भांबावल्या सारखेंच होऊन जातें. व ते आपल्या शक्त्यनुसार कांहीं तरी खरेदी करतातच. ह्मणजे

हीं दुकानें परदेशी मालाचे खपाचे उत्तेजनार्थच आहेत असें वाटूं लागतें.

कोणी ह्मणेल कीं, ह्या दोन तीन दुकानांनी काय एवढा मोठा तोटा केला आहे. खरेंच ही गोष्ट "दरयामे खस खस" ह्या प्रमाणेंच आहे. तरीही कंपनीच्या व्यवस्थापकासारख्या समजदार लोकांनीं आपले भांडवलाचा ह्या पेक्षां चांगला उपयोग करावा हें चांगलें. ह्या विषयीं माझे अल्प मतीनें मी एकदोन सूचना करितों.

आपले कडे हल्लीं पत्ते खेळण्याचा प्रचार बराच होऊं लागला आहे. शेकडों रुपयांचे पत्ते विलायतेहून येथें येतात. ह्या कामाला मोठेंसें बुद्धिकौशल्य पाहिजे आहे असें नाहीं तर असा एखादा कारखाना कां निघत नाही?

तसेंच कांहीं भांडवल उभारून त्यावर शेती करावी. अशीं कामें जर प्रामाणिकपणानें चालविलीं तर यांत फायदा होऊन पुष्कळ लोक हा धंदा करूं लागतील. व हा कित्येकांनीं जरी केला तरी सर्वांस हा पुरण्या सारखा आहे. ह्याप्रमाणेंच कित्येक गोष्टी आहेत. त्या सर्वच येथें सांगत बसण्याचें कारण नाहीं.

वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ शुद्ध १० शके १८११

## नेटिव संस्थानें.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

हिंदुस्थानांतील नेटिव राजेरजवाड्यांस आपआपल्या संस्थानचीं अधिकार सूत्रें परत दिलीं त्याविळीं महाराणी सरकारच्या सन १८५८ सालच्या ता. १ नोवेंबरच्या जाहीर नाम्यांत स्पष्टपणें उल्लेख केला आहे कीं 'ज्या प्रमाणें आम्हीं आपला अधिकार, आपला दर्जा, व आपला मर्तबा राखतो त्याच प्रमाणें हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांचा अधिकार, दर्जा, व मर्तबा आम्हीं राखूं.' या जाहीर नाम्यांत अभिवचन दिल्याप्रमाणें आमचे इंग्रज सरकार त्यांत तिळमात्र उणें पडूं देणार नाहींत अशी आमची पूर्ण खात्री आहे. सरकारच्या वरील नियमीत वर्तन क्रमांत फरक पडण्यास अनेक कारणें उद्भवतात हें आम्हीं ही कबुल करितों, आणि तशा कारणामुळेंच प्रस्तुत काळीं खालावत चाललेलीं संस्थानें उत्तरोतर मोडकळीस येत चाललीं आहेत हेंही आम्हीं पहातों. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा पाया मजबूत व चिरस्थायीं होण्या साठीं हिंदुस्थानांतील नेटिव संस्थानें अक्षयीं राजनिष्टपणें चालतील व भरभराटीस येतील असा क्रम सदोदीत राज्य कारभारांत ठेविला पाहिजे असें पुष्कळ उदार राजनीति कुशल पुरुषांचे विचार आहेत. व ह्याच धोरणानें सर माउंठ एलफिनस्टन व सरजान माल्कम प्रभृति मोठमोठे अधिकारी अव्वल इंग्रजोच्या वेळीं वागले ही गोष्ट इतिहासांत सुप्रसिद्ध आहे. खुद्द इंग्रज सरकारच्या अंमला खालीं खालसा झालेल्या प्रांतांतून राज्यव्यवस्था इंग्रजी न्याय तत्वास पूर्णपणें अनुसरून चालते, व त्यामुळें निरनिराळ्या प्रकारांनीं इंग्रजी अंमल प्रजेस अधीक सुखावह वाटतो. परंतु नेटिव संस्थानांत प्रसंग विशेषीं अंदाधुंदी होते तरी आजपर्यंत अशी वेळ आली नाहीं कीं राजे रजवाड्यांच्या व संस्थानिकाच्या रयतेनें आपले मूळ सरकार सोडून देऊन इंग्रज सरकारच्या अमलांत येऊन राहूं देण्यासाठीं व आपलें संस्थान मोडून टाकण्या साठीं इंग्रज सरकारांस अर्ज केला आहे. जोपर्यंत इंग्रज सरकारापाशीं दाद मागण्याची मजल पोंचली नाहीं तों पर्यंत हिंदुस्थान सरकारांनीं आपणच होऊन नेटीव संस्थानच्या कारभारांत रेसिडेंट किंवा पोलिटीकल एजंट ह्यांच्या मार्फतीनें हात घालणें व ढवळा ढवळ करणें रास्त व न्याय्य आहे असें ह्मणण्यास शंका वाटते. इंग्रज सरकारचे मुख्य विश्वसनीय फडनीस ह्मटले ह्मणजे नेटिवसंस्थानांतील इंग्रजी अधिकारी होत. हे लोक खरे मुत्सद्दी नसले ह्मणजे संस्थानावर किती अनर्थ ओढवतात ह्याचा दाखला सर लिपेलग्रिफीनच्या कारकिर्दी पासून आह्मास पुष्कळ प्रकारांनीं येऊन चुकला आहे. नेटिव संस्थानें इंग्रज सरकारच्या छत्रा खालीं आहेत तरी इंग्रज सरकारचा नेटिव संस्थानांशीं संबंध जों पर्यंत तीं राजनिष्ठ आहेत तों पर्यंत आपल्याच हातांत कारभार घेऊन चालविण्याचा नाहीं असें आह्मी पक्कें समजतों. ह्मणून जेव्हां जेव्हां नेटिव राजेरजवाड्यावर राजद्रोहाचें पातक लागण्या पूर्वींच निरनिराळे कुतर्क काढून संकट आणितात व थेट विलायत सरकारपासून तों तहत पोलिटिकल एजंट पर्यंत खलित्यावर खलिते चालवून संस्थान धुळीस मिळविण्यासही कांहीं अधिकारी साहेब मागें पुढें पहात नाहींत, हें पाहून अचंबा व खेद वाटतो.

( पुढें चालेल. )

प्रसिद्ध कैलासवासी रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक ह्यांची तसबीर चित्रशाळा प्रेस कडून आह्मास नजर आली आहे, तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. ह्या लोकमान्य पुरुषाचें चित्र प्रत्येक मनुष्याच्या संग्रहास असणें हें किती अवश्य आहे हें येथें निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तसबीर फारच सुरेख निघाली आहे. व त्या अभिमानी पुरुषाचे जे गुण आपण ऐकत होतों त्याच गुणांचें प्रतिबिंब ह्या चित्रावर स्पष्टपण व्यक्त होते. ह्या तसबिरीची किंमत टपाल खर्चासकट फक्त कायते पांचच आणे ठेविली आहे. त्यामुळें गरीबगुरिबांससुद्धां ह्या पुरुषाचें दर्शन होण्यास मार्ग खुला आहे. प्रत्येक देशाभिमानी पुरुषास ही तसबीर संग्रही ठेवण्यास आह्मी शिफारस करितों.

## पोंच.

वाशीमस्थ 'क्ष' कळवितों—पाऊस नाहीं महामारीचा उपद्रव सुरूं झाला आहे. पेरण्या सुरूं आहेत. मि. ॲाबर्ड साहेब डे. क. ह्यांचे जागीं मि. यासीनखां नबाब साहेबांची नेमणूक झाली. नेटिवांना असे अधिकार कधीं मिळत नाहींत, करितां एवढ्या मोठ्या अधिकारास आपण लायक आहोंत अशी सर्वांची खातरजमा करून देण्याची त्यांनीं खबरदारी घ्यावी. मि. कावळे यांची से. ज. चे क्लार्क ऑफ दि कोर्टचे जागीं नेमणूक झाली. मि. दहीगांवकर हे त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेस योग्य आहेत. डे. क. च्या ऑफिसांतील ४० रुपयांच्या इंग्रजी कारकुनाच्या जागेवर एका मि. ब्रौन नांवाच्या ख्रिश्चनची नेमणूक झाली. हेडक्लार्क व हे एकाच जातीचे आहेत परंतु यास पिछेहाट करावी लागेल असा अंदाज दिसतो.

शेगांव वाशीं "क्ष" आपले पत्रांत असें म्हणतात कीं गेल्या २८ तारखेचें सूर्यग्रहण दृष्टीस पडलें नाहीं. तारीख २७ २८ ह्या दोन दिवशीं पाऊस चांगला पडला. पेरे सपाट्यानें सूरू आहेत. तारीख १ जुलै रोजीं कमीटीचे चेअरमन ची निवडणूक करण्या करितां सभा भरली होती. त्यांत मि. अण्णाजी केशव एजंट मोफीसल कंपनी शेगांव यांस चेअरमन निवडले. ही निवडणूक अति उत्तम झाली. कारण हेंच कीं आतां पहिल्या प्रमाणें कारभार मनसोक्त चालणार नाहीं. या निवडणुकी पासून बहुतेक शेगाववाशीं लोकांस आनंद झाला आहे.

आपला रिसोडस्थ 'क्ष' तुमचें पत्र उशिरां पावलें. स्थल संकोचा बद्दल पुढील खेपेस घेऊं.

नोटिसीचें उत्तर.

सोनी मर्द किसन हिंगणकार राहणार काळवाडी ईस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी नोटीस तारीख २१-६-८९ ची पावली त्याचें उत्तर तूं आमचें घर सोडून व गैर चालीची वागणूक करून आम्हास न विचारतां निघून गेलीस व पोट आणले. आह्मी नेण्यास आलो असून तूं आली नाहींस सबब आह्मी तुला आजपर्यंत आणली नाहीं हली तूं नोटीस दिलीस व त्याचें उत्तर देण्यास आह्मांस खर्चांत घातलेस. तुला दुसऱ्याशीं मुहूर्त लावण्याचा आहे तरी आह्मांस तुझे लग्नासंबंधी झालेला खर्च २०० व आमचे दागिने ७९ रु. आणि ह्या नोटिसीचा खर्च अशी रक्कम आणून दिल्यास आह्मी तुला फारकती देऊं. आमच्या फारकती वांचून तूं मुहूर्त लावल्यास वर लिहिलेले रु० ह्या नोटिसीचे आधारें तुजवर योग्य कोर्टांत फिर्याद करून वसूल करण्याची तजवीज केली जाईल कळावें ता० ९-७-८९

सही

किसन वल्लद गणु पाटील हिंगणकार राहणार काळवाडी निशाणीखुद्द.

# The Berar Samachar

MONDAY JULY, 8, 1889.

The report on the administration of civil justice in this province is just out. As usual it consists of annotations of the figures contained in the returns annexed to it. Here and there we do come across a few remarks on those figures, but these only tend to strengthen the suspicion we have long entertained about this and the reports of the other departments being mainly the productions of the head clerks no we mean of the superintendents of the head offices.

The report opens with a charge against all the Deputy Commissioners of not submitting their returns with correct statistics, and closes with an interesting philosophic sermon preached to the Bar and to the Bench by the Resident at Hyderabad, hitherto the judge of the Highest tribunal in the province. But about this sermon by and bye.

We learn from the report that in the year 1888, the total No. of suits instituted was about 27,000 as against 24,500 in the year 1887. 'The increase" it is stated, "has come entirely in the chief District and Small Cause Courts." The increase is mainly in the Districts of Amraoti, Buldhana and Wun. In the Akola District there is a decrease in the No. of institutions. The causes of the increase and the decrease given by the Deputy Commissioner are very ingenious indeed. The increase in the Amraoti District is attributed to "a rebound after a year of checked litigation." The Judicial Commissioner as well as the Resident have both accepted this explanation of the "cause" of the increase; but we must confess our utter inability to discover any cause in the above explanation. All that we understand from it is that in the year under report there is a rise while in the year previous to that there was a fall. But why there is a rise or why there was a fall remains to be explained yet. The rise in the Buldhana District was owing to the institution of a new court at Mehekar "which drew a number of suits equal to nearly half of the whole of the rest of the District." The Deputy Commissioner of the Wun District has not explained the cause or causes of the increase in his district.

The decrease in the Akola District is said to be due to a favourable season an explanation with which the Judicial Commissioner is not satisfied.

The information given in paras 8 and 9 of the report is very interesting. Assuming that the condition of the inhabitants of the central Provinces, the Berars and the Bombay Presidency is very much alike the Judicial Commissioner proceeds to estimate the spirit of litigation of the Berarees with that of our neighbours on either side. In this province there is one suit to every 99 of the population, against 1 to 83 in Bombay and 1 to 103 in the central Provinces. This shows that we are neither as quarrelsome as our neighbours of the Bombay Presidency, nor quite so peaceful as our neighbours of the Central Provinces.

The facilities as to litigation in comparison with our immediate neighbours can also be partly judged by the following figures:—

Courts to area.

In Berar ...1 to every 554 square miles
Cenrral Provinces do. to 674 do.
Bombay ........... do. to 947 do.

and Courts to population

In Central Provinces 1 to every 68700
Berar .................... do. 83500
Bombay .................. do. 125,600.

The total number of suits disposed of was 27,767 and their aggregate value was Rs. 20,82,648. The Extra Assistant Commissioners disposed of nearly three fourths of the whole litigation of the province. Mr. Ambadas Santu at Mehekar alone disposed of 2428 and Mr. Shrikrishna Narhar at Telhara

disposed of 2162. It seems rather curious that most of our civil judges who have disposed of a very large number of civil cases during the year should have left a very remarkably small number of suits pending at the close of the year. Mr. Ambadas Santu for instance, who disposed of 2428 cases has left a pending file of 4 cases only and Mr. Shrikrishna only, 16. It would seem as if the parties had an equal interest with the Jedges in showing a very low pending file by not presenting plaints during the last 2 weeks of the month. Would the higher authorities look into this?

All the small causes Courts together disposed of 8773 cases. of these Rao Bahadur Purushottamrao Narayan Bhat alone disposed of 3291 cases.

The Deputy Commissioners and the Judicial Commissioner called several cases for inspection. With regard to this business we cannot help remarking that this duty is generally done by the clerks of Courts and their subordinates with the inevitable result that only errors in punching stamps and the like are noted. Cannot these inspections as will as the inspections made when the officers go on tours be made inspections of Judicial, work rather than mere inspections of the work of clerks by clerks.

The last para of the Review by the Resident has attracted great notice. Its peculiar features are two fold, viz, the lucrative nature of the work which the Bar does, and the incompetence of judges. These two have an admixture of complaints against the possible abuse of powers by the Bar. The Secretary for Berar's skill particularly appears in this that readers of this para of the review will be at a loss to discover if it is meant to be a stricture on the Bench or the Bar. Probably it is meant for both, and appears to be very much like an official answer or at any rate official notice taken of newspaper articles that have recently appeared in our columns and those of our contemporaries condemning the Bench. We are inclined to take this view of the remarks made as we fail to see why these remarks should have been made on this year's report rather than last year's. Want of information regarding the increase in the numbers of the Bar and their progress is taken as a 'notable omission' in the Judicial Commissioner's Report.

Now if one thing is more distinguishable from another in this para it is the incompetence of the Bench. If the Bench is incompetent, then, it is argued, parties cease to engage counsel even at the sacrifice of extravagant fees, as they think they thereby 'purchase some sort of influence over the judge.' Now unless we take the Resident to mean that he suspects that some such thing actually happens in Berar, these remarks would be altogether meaningless and puite uncalled for. And if there is ground even for a suspicion that such a state of facts exists in Berar the balance lies more at the door of the chief controlling authorities at Hyderabad. The Resident makes not a few appointments to the Bench. Why are not better qualified persons selected for the posts. The Berar officers always grumble that the Hoozoor at Hyderabad always send its men to fill judicial offices and room has to be made for them. We know of people who have been shoved in as Tehsildars and Extra Assistant Commissioners from the Residency superseding good qualified people in the province. The most recent development of this patronage principle is, we learn, the appointment of a representative of a scion of a Mohamedan family at Hyderabad on *Rupees four hundred* to start with as an Extra Assistant Commissioner. Good persons like Messers Nizamudin and Khaparde have to go away in disgust. Good men are thus discouraged and unfit persons put in. Rather than promote a servant of Mr. Khaparde's abilities, the authorities would rather put in a raw youth on 4 hundred a month, quite consistently however with the patronage principle. Now under these circumstances how could the Resident possibly expect a good Bench. If the Bench is incompetent in Berar as we most distinctly hold it is, the authorities at Hyderabad have to thank themselves.

We beg to dissent from the Resident's opinion that as the Bench becomes more competent, extravagant payments to counsel will cease. The absurdity of this general proposition is tried to be glossed over by saying that this is not so in *England*. Let us see if this so called valuable general rule applies to Bombay, Calcutta or Madras places not in England but in British India where European and native counsel practise. Nobody has a shadow of doubt that the Bench of the Bombay High Court is very competent and yet strange to say, in direct violation of this beautiful general rule laid down by the Resident Messers Inverarity and Macpherson and Jardine and Mr. Leath and Mr. Branson and a host of other well known names *do* get 'extrvagant' fees. The same remark applies to Calcutta and Madras. We may as well point out what is merely a truism, that counsel's fees do *not* depend upon the competency or otherwise of the Bench but upon their own merits. Nobody need grudge to a body of men who have spent their lives in the profession like Law, any amount that they can make by spending their brains in our opinion that would only discover a littleness of heart to be greatly deplored. Then again if we consider the number of years of persistent application in this profession, the gains would seem as nothing. We do not however wish to expatiate any further on the subject but expect a yearly budget of tirades or eulogiums as the case may be in the yearly Judicial reports after this memorable year 1889.

CORRESPONDENCE.

To,

The Editor of Berar Samachar.

Dear Sir,

Rain! Rain! Rain! is the hue and cry heard all around. The unusually severe heat of the last hot season and the heavy showers we had had at the set in of the monsoons gave promise of a copious rain fall this year. But this expectation, like all other human expectations, has proved a delusion. Jupiter Pluvins seems to have been lulled to repose at a time when he ought to have been working strenuously. Not a blessed drop of rain during the last ten days! Clouds bank themselves in the morning and evening but only to disperse without a discharge, or sight antalizing to a degree. The heat during the day is simply unbearable. All sowing operations have been suspended and the people are looking with awe and terror at these harbingers of the green eyed monster. I am afraid if the state of things continues the kapass seeds now spronting will suffer, nay a fresh pera will have to be made.

To add to our misery cholera still lingers in the Taluk and is slowly but surely doing its work. A few days ago some cases occurred here but by the grace of God they were promply suppressed. Since however the rains are holding back and consequently the heat grows intense, there are fears the fell disease will make its appearance again. At present it is chiefly confined to a few villages lining the river Purna.

Rao Sahib Deorao Vinayak your illustrious townsman had come here on Monday last in connection with the Shegon cheating case against Narayan Patil now pending in the court of the 2nd class Magistrate here. Advantage was to have been taken of his presence here to convene a meeting of the Towns people for the purpose of the Nation Congress but unfortunately the Rao-Sahib left abruptly. He is however coming again on the 19th instant and something will be done at the time.

The Naib Tashildar of this Taluk is invested with powers to try civil cases cognizable by the Small Cause Court up to 50. He is said to have opened his court from the 1st instt. So much the better for the people of Julgaon who were badly in want of a civil court. But what of appeals? If a party has to appeal against the decision of the learned judge he will have to drag his carcass to Amraoti even though the plaint be worth a rupee! This is an instance of the extreme foresight of the legislators who have spun the complicated web of the new Judicial Scheme out of their precious brains.

Julgon Berar. "X."
5th July 1889

(Extra Residency Orders 29-7-89.)
No. 161.

In exercise of the powers conferred by Sections 7 and 9 of the Code of Criminal Procedure, as applied to the Hyderabad Assigned Districts by the Notification of the Government of India No. 1651-1.,I dated the 26th April 1889, the Resident is pleased to establish a Court of Sessions for the Hyderabad assigned Districts, which shall be a Sessions division, and to appoint the Officer for the time being holding the Office of Civil and Sessions Judge for the Hyderabad Assigned Districts to be Sessions Judge for the said division.

The Resident is further pleased to direct that the Sessions Judge shall hold sessions in alternate months at Amraoti and Akola, and that cases Committed by Magistrates in the Amraoti, Wun, and Ellichpur Districts shall be tried at Amraoti and those committed by Magistrates in the Akola, Basim, and Buldana Districts shall be tried at Akola.

## वऱ्हाड.

आम्हांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. गोविंदराव अया मुदलियार आणि रा० रा० बाळकृष्ण काशीनाथ उर्फ नाना साहेब जोशी या उभयतां तहशिलदारांस नविन वर्गावर्गीत एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या जागीं लवकरच मिळणार आहेत. आलीकडे ए० अ० कमिशनरच्या जाग्यांवर ज्या नेमणुका होतात त्या पेक्षां हल्लींच्या नेमणुका पुष्कळ प्रकारें चांगल्या आहेत.

मि. टिकमदास व रामप्रताप याच्या मनुष्यावर पोलिस आक्टांतील क. ३४ प्रमाणें भर रस्त्यांतून जोरानें गाडी हाकल्या बद्दलचा मुकद्दमा मि. हैदरअली अब्बाची यांच्या समोर चालला होता परंतु नाशाबीत ठरला. सदरहु झालेल्या पुराव्या वरून चि. कानस्टेबल नि. पुंजाजी यांना त्या कलमाचा अर्थ अद्याप चांगलासा समजला नाहीं असें दिसतें. एकंदर चार साक्षीदार झाले त्यांपैकीं बहुतेकांनीं असें सांगितलें कीं, गाड्या नेहमीं प्रमाणें पळत होत्या. परंतु कान्स्टेबलची जबानी घेतल्यावर त्यांनीं असें सांगितलें कीं, मनुष्याची जी चालण्याची रीत आहे त्या पेक्षां जास्त वेगानें गाडी चालविली असतां ३४ कलम प्रमाणें गुन्हा होतो. अशी अर्थ करणारी विद्वान मंडळी असल्यावर मग लोकांना पोलिसा पासून उपाया पेक्षां अपाय फार होतो. यांत कांहीं नवल आहे काय?

गोविंदराव आलेगांवकर याजवर खुनाचा कैदी पळविल्याचा आरोप येऊन त्याची चौकशी कर्नल ग्रांट साहेब डेपुटी कमिशनर अकोला याजपुढें चालली होती. त्याचा निकाल ता० ४ रोजीं झाला व गोविंदराव यांस दोषमुक्त ठरविलें.

मि. इ. मोफट डि. सु. पोलीस, वणी, यांस एक महिन्याची रजा मिळाली. त्यांचें काम मि. एफ्. सी. अगर पोलीस इन्स्पेक्टर हे पहातील.

मि. कृष्णाजी अनंत तहशीलदार यांस आजारीपणाची दोन महिन्याची रजा मिळाली. त्यांचे जागीं मि. गोविंद गंगाधर यांसच नेमिलें आहे.

मि' रुस्तमजी फर्दुनजी, ऑनररी अब्बाची यांनीं ता. ८ मार्च ते ९ जून १८८९ पर्यंते वऱ्हाडचें सर्वे आणि सेटलमेंट ऑफिसरचें चालूं काम पाहिलें.

मि. टी.-सी. क्रौडन, बी. सी. एस. कमिशनर यांस ता. ११ जुलई १८८९ पासून तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली त्यांचे जागीं कर्नल स्पेन्स्की, डे. क. बुलडाणें. यांची नेमणूक होणार असें ह्मणतात.

मि० आर० आबर्ट यांनीं उमरावतीस जाऊन सिव्हील आणि सेशन्स जज्जाचें कामाचा चार्ज घेतला.

क्याप्टन् आर० डेव्हिस् अ०क० हे दोन महिन्याच्या रजेवर जाणार असें ह्मणतात.

सेशन जज्जाचे क्ला. आफ. को. धी व हे. क्ला. ची या जागीं मेसर्स त्र्यंबक गणेश परांजपे व विठ्ठलराव काळीकर यांस मिळाल्या अशी जी बातमी निघाली होती. ती खोटी ठरली. रा. रा. बळवंत राजाराम क्ला. आ. को. वाशीम यांस सेशन जज्जाचे क्ला. आ. को. व रा. रा. रामराव बापूजी क्ला. कमिशनर आफीस यांस हे. क्ला. व रा. रा. मारुतीराव लोहार क्ला. डि. क. आफीस अकोलें यांस रिडर नेमलें असें कळतें.

रा. रा. रामराव पतकी क्ला. कमिशनर आफिस यांच्या जाग्यावर त्याच आफिसांतील रा. रा. विठ्ठलराव काळीकर यांस व त्यांचे जागीं जु० कमिशनर आफिसांतील रा० रा० काशिनाथ यादव यांस व त्यांचे जागीं मि० मारुतीराव क्ला० डि०क० आफिस इलिचपूर यांस नेमल्याचें कळतें.

रा. रा. गणेश गोपाळ डे. क्ला. आ. व बुलढाणें यांस वाशिमचे क्ला. आ. को. व त्यांचे जागीं बुलढाणे डे. क. आफिसांतील विष्णु रघुनाथ यांस नेमल्याचें कळतें.

उमरावती येथें डे. क. आफिसांतील क्लार्क रा. रा. नारायण रामराव यांस अकोले डे. क. आफिसांत मि० मारुतीराव लोहार यांचे जागीं नेमलें असें कळतें.

मि० स्न्यानली मरे ए० अ० रेसिडेंट हे अ. कमिशनर झाल्यामुळें त्यांचे जागीं रेसिडेंट कचेरींतलेच मि. शेफर्ड यांस नेमून त्यांचे जागीं हल्लीं यवतमाळ येथें ए. अ क. असलेले मि. विश्वनाथ यांस नेमलें असें ह्मणतात.

ज्या दोन नव्या ए० अ० क० च्या जागा झाल्या त्यांवर मि० उग्रेडी रे० पो० इ० यांस व दुसरे हैदराबादचे कोणी मुसलमान गृहस्थ यांस नेमले असें कळतें.

## वर्तमानसार.

राशियानें फौज व आरमार यांची तयारी करून टर्कीवर पुनः झडप घालण्या करितां बाल्कन संस्थानामध्यें कारस्थानें चालूं केली आहेत असें दिसतें. इकडे हिंदुस्थानच्या तोंडावर इंग्लंडास शह देऊन ठेविला आहे. पुढें काय होईल तें पाहावें.

बीर दारूवर कर बसविण्याचा विलायत सरकारचा विचार चालला आहे.

हिंदुस्थान सरकारनें केलेली काश्मीरची व्यवस्था पसंत असल्याबद्दल सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा ठराव हिंदुस्थानांत आला आहे.

अमेरिकेंत १७९० त एकंदर ७५ पोष्ट ऑफिस होती, परंतु १८८० यध्यें एकंदर ४३,००० झालीं!

राशियन लोकांनीं नागासाकी जवळील डोरबेट आपल्या हस्तगत करून घेतलें असें ह्मणतात.

हरझो माँटेनिग्रियन सरहद्दीवर कांहीं लोकांनीं मारामारी करून नोवीबझार येथील गव्हरनरला शहरांतून हाकून लाविलें. सुलतानांनीं आपल्या फौजेस तिकडे रवाना केलें आहे असें समजतें.

रसो आफगाण सरहद्दी संबंधानें कांहीं व्याख्यानें सिमल्यास होणार आहेत त्या वेळेस कमांडर इनचीफ अध्यक्षस्थानीं बसतील.

डेकन मार्निंग खटल्या संबंधानें अद्याप निकाल होत नाहीं.

राशियांत पाऊस चांगला पडल्यामुळें तेथें पीक चांगलें येईल असा अनमास आहे.

दारूच्या संबंधानें जर कोणाचे देणें असेल तर ते कायद्याच्या मुदतीनें बेलजम मध्यें वसूल करतां येत नाहीं. इकडे असें असावें.

ब्रह्मदेशांत २८१ केरोसीन तेलाच्या विहिरी आहेत व त्यांतून दररोज १५,००० ग्यालन तेल निघतें.

जपानांत रेलवेचें काम फार झपाट्यानें चाललें आहे. असें समजतें.

गरीब आरोपी असला तर त्याचें काम फुकट करण्या बद्दल अभिवचन, सनद देते वेळीं प्रत्येक वकिलाकडून घेण्याचा फ्रान्स देशांत प्रघात आहे असें ह्मणतात.

उरल पर्वतांत एक सोन्याची खाण राशियन लोकांनां सांपडली आहे असें ह्मणतात.

रशियानें इंग्लिश पार्लमेंटास एक पत्र लिहिलें आहे कीं, प्रिन्स ऑफवेल्स यांस जर इंग्लंडचे अधिपत्य दिलें तर ड्यूक आफ एडिंबरो यांस हिंदुस्थानचें अधिपत्य द्यावें ह्मणजे आह्मी हिंदुस्थानच्या सरहद्दीवर तुह्माला त्रास देणार नाहीं. असें त्यांचें ह्मणणें आहे.

काबूलचे अमीर आणखी ८ लाख रुपये हिंदुस्थान सरकाराजवळ मागत आहेत.

सु० प०

मुंबईस एक नवें यंत्र शोधून काढलें आहे. हें यंत्र एखाद्या वखारींत ठेवलें असतां त्या वखारींतून किती माल गेला हें तें यंत्र रजिष्टर करून ठेवतें. हें यंत्र अजून पेटंट झालें नाहीं. असल्या यंत्रानें हाताखालील कामदारांस लबाडी करतां यावयाची, नाहीं. असें ह्मणतात.

२०० लाख रुपये प्रामिसरीनोटींनें कर्ज काढण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे, व्याजाचा दर चार टके आहे व या पैशाची टेंडरें पुढील महिन्याच्या ३० व्या तारखेच्या आंत याचीं असें गेल्या शुक्रवारच्या मुंबईच्या एकस्ट्रा सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. पैसे भरणारांनीं आपले खिसे उघडावेत. नाणें देऊन कपटे घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खुशाल सरकारला कर्ज द्यावें. आमचे त्रावणकोरचे महाराज प्रजेला कर्ज देतात व आमचे मुख्य सरकार प्रजे पासून कर्ज काढतात एवढेंच स्वराज्य आणि परराज्य यांच्यांत अंतर आहे.

लॉर्ड लॅन्सडौन हे उत्तम विटीदांडू खेळणारे आहेत, फारच उत्तम!

जपानांतील नागासाकी बेटाजवळ दोन नांवाचें ठिकाण राशियानें आपल्या ताब्यांत घेतलें असें ह्मणतात. राशिया गडबड तरी कोठें कोठें करितो.

उत्तर अमेरिकेंत जे इंडियन्स आहेत त्यांच्या केसाची वाढ जोराची आहे. तेथील एका संस्थानिकाची शेंडी १० फूट ७ इंच लांब आहे. मारामारी करावयाची असल्यास लोकांना काठीची जरूरी लागणारच नाहीं!

तुह्मी इजिप्तांतून निघून जा. व झालेला तह रद्द करा असें फ्रान्सानें इंग्लंडास कळविलें आहे तसेंच तुह्मी कधीं जातां त्याची तारीख ही ठरवा असेंही फ्रान्सानें इंग्लंडास कळविलें आहे. आह्मी निघून जात नाहीं व ड्यूमड उल्फच्या तहा प्रमाणें १८९२ पर्यंत आह्मास इजिप्तांत राहण्याची मोकळीक आहे असें इंग्लंडचें ह्मणणें आहे पहावें आतां काय होतें तें.

इजिप्तच्या सरहद्दीवर दंगा करणाऱ्या दरवेशी लोकांनीं वाडी हाफपर्यंत येण्याची तयारी केली आहे! आतां पुन्हा लढाई होण्याचा संभव आहे.

राष्ट्रीय सभेचें उत्पत्तीस्थान इंडियनट्रिब्यूट नांवाचें पत्र आहे असें आतां बाहेर आलें आहे.

टा. अ.

पंढरपुराकडे महामारीचा आजार असल्यामुळें आषाढीचे यात्रे करितां लोकांनीं तिकडे जाऊंनये म्हणून सोलापूरच्या कलेक्टरानीं सक्युलर केलें असल्याचें कळतें.

धान्याचा पाऊस व मोठ्या गारा काठेवाडांत जुनागड संस्थानांत ऊना म्हणून एक गांव आहे. तेथें ता० १५ मे रोजीं दुपारीं ३ वाजण्याच्या सुमारास आकाशांत सुमोर २५ यार्ड लांबीचा एक सर्पाकृती ढग उठून तो मोठ्या वेगानें उत्तरे कडून दक्षिणेकडे गेला. पुढें मोठी वावटळ सुटून सुपारी पासून आंबे, डाळिंबा एवढाल्या गारांचा अति वर्षाव झाला. पाऊस ५ वाजतां बंद झाला. त्या गांवांपासून १४ मैलांवर कांधी म्हणून एक गांव आहे तेथें त्याच वेळीं आकाशांत ढग येऊन नाचण्यांचा पाऊस पडला असें काठेवाड टाईम्स पत्रांत लिहिलें आहे. खरें असल्यास मोठी अद्भुत गोष्ट म्हणावयाची!

जलोदरीं निवास—थोड्या दिवसां पूर्वीं एका टार्पेडो बोटींत बसून दोन फ्रेंच खलाशी १० वाजल्या पासून संध्याकाळीं ५ वाजे पर्यंत पाण्याच्या तळाशीं जाऊन बसले होते. पाण्यावर एक ताफा ठेऊन त्यावर पंच बसले होते. पंच व आंतले खलाशी यांच्या मध्यें दूर ध्वनि यंत्रानें संबंध ठेविला होता आंतील माणसांच्या स्थितींत काय फेरफार होतो याची हकीकत दर मिनिटास पंचांस कळत होती पुढें ते खलाशी बोटीसह वर आले तेव्हां बोटींत पाण्याचा थेंब गेला नाहीं व त्यांच्या आंगास पाण्याचा स्पर्श झाला नाहीं असें दिसून आलें. जशी पाण्यावर तशी विजेच्या किंवा वाफेच्या शक्तीनें पाण्याच्या आंतून होडी चालेल कीं नाहीं असा विचार चालूं आहे. या वरून पूर्वींच्या काळीं आकाशगामी व जलगामी विद्यांचा जसा प्रचार होता तसाच आतां ही होणार.

शु० सू०

राक्षसी घोडा—अमेरिका खंडांत न्यूआर्क येथें एक घोडा जन्मला आहे त्याचें वय आतां ५ वर्षांचें आहे. त्याची उंची २० मुठी, तोंडाचीलांबी ३६ इंच, खांद्याचा परीघ ३५ इंच व कमरचा परीघ २० फूट आहे. त्याचें वजन ३००० रतल आहे! असें वर्णन वाचूनच आपणास विस्मय होतो तर तो घोडा पाहणाऱ्यांस काय वाटत असेल बरें!

पंखा ओढणारें यंत्र—बाराकपुरच्या मि० युइंग नांवाच्या इसमानें पंखा ओढणारे यंत्र काढिलें आहे. त्यानें काम कसें काय होतें त्याची प्रचीति कलकत्ता येथें पहाण्यांत आली. सांप्रत हिंदुस्थान सरकारानें असा ठराव केला आहे कीं, हिंदुस्थानांतील सर्व सरकारी बंगल्यांतून तशा प्रकारचें यंत्र लावावें.

दी० बं०

पुणें शहरांत एका रावसाहेबानें एका विश्वयोषितेच्या तरुण कन्येस फुसलावून पळविल्यामुळें फिर्यादी पर्यंत प्रकरण आलें आहे. ही नासकी व गुप्त बातमी देण्याचें कारण नव्हतें, पण रावसाहेब हे आमच्या नांवाजलेल्या म्युनिसिपालिटीचे मेम्बर असल्याव रून आम्हांस ही बातमी देण्याची बुद्धि झाली! अलीकडे हीच निती आहे उपाय नाहीं.

कलकत्याजवळ आगगाडीचा एक पूल वाहून गेल्या मुळें तिकडची डाक एक दिवस मुळींच आली नाहीं.

खानदानीच्या कुलांतील मुलांस लष्करी शिक्षण देऊन तयार करावे असें सरकारानें योजिलें आहे चांगलें.

पु० वै०

गेल्या शुक्रवारचें सूर्यग्रहण येथें दिसलें नाहीं. परंतु मिरज, पंढरपूर इकडून पत्रें आलीं, त्यांत तर्थे पटवर्धनी पंचांगांत दिलेल्या वेळेच्या जवळ जवळ स्पर्श-मोक्ष-काल आढळले असें लिहिलें आहे.

रा० ब० रामचंद्र गोपाळ देशमुख यांचा मृत्यु— सरदार गोपाळराव हरि देशमुख यांचे चिरंजीव राव बहादूर रामचंद्र गोपाळ देशमुख हे गेल्या गुरुवारीं क्षय रोगाच्या आजारानें मुंबईस मरण पावले.

पाऊस नाहीं ह्मणून आतांच येवल्या कडील गरीबगुरीब निवडुंगाचीं बोंडें व चिंचेचा पाला खाऊं लागले आहेत. पुढें कसें होणार!

मिसिसिपी या नदीवरील आगबोटीचे कप्तान स्त्रिया आहेत. आतां पलटणींत मात्र त्यांचा उघडपणें रिवाज झाला पाहिजे. के.

गोरक्षणाचा कडक निर्बंध आकबर बादशहाचें वेळीं मुसलमानी राज्यांत देखील होता असें आपण नेहमीं ऐकतो. त्याचि राज्यांत हा गोवध कधीं पासून बंद झाला या जबदलची एक आख्याईका आहे. एकवार आकबर बादशहाच्या वाड्या भोंवतीं लक्षावधि गायी सवत्स आणून त्याच्या चतुर बिरबलानें उभ्या केल्या होत्या बादशहा निजून उठल्यावर सहज गच्चींवर येऊन पाहूं लागला तों चोहींकडे गायाच गाया त्यास दिसूं लागल्या. त्यावरून त्यानें बिरबलास हें काय ह्मणून विचारलें. त्यावरून बिरबलानें त्या अर्ज करण्याकरितां आल्या आहेत ह्मणून सांगितलें. त्यांचा अर्ज काय आहे ह्मणून विचारल्यावरून बिरबलानें आपल्या खिशांतून एक कागद काढून तो बादशहास वाचून दाखविला. त्यावरून बादशहा खुष होऊन त्यानें गोवध बंद केला! ही आख्याईका मागेंच आह्मी आपल्या वाचकांस सांगितली आहे, पण आज तिची पुनरावृत्ति करण्याचें कारण इतकेंच कीं, त्यावेळीं बिरबलानें जो दोहरा बादशहास वांचून दाखविला त्याची खरी नक्कल एका गृहस्थानें आमचेकडे पाठविली असल्यामुळें आह्मी या गोष्टीची पुनः आवृत्ति केली आहे तो दोहरा येणें प्रमाणें.—

॥निबल दंत तृण धरे॥ मबल वाक बहुन मारि॥ हम सदा दंत तृण धरे॥ बचन आधि न पूकारि॥हिंदुकोंक्या मदंदे॥तुरक कुठीलक्या विषदे॥पावे दोड एकरस झरे॥ धराधरतिके जावे॥कर जोड गऊ बिनती करे॥सुनहू अकबरशाह॥ जुमुये चरण छांडत नाहि॥मारत कौन गुनाहजु दोह॥माधु गडके कारणें॥ ॥हारिवरसांव मेघ॥ उनके पाछे परशराम॥दुनिया पालत देह ॥१॥ हा दोहरा श्रवण करून बिचाऱ्या आकबरानें गोवध बंद करून सर्व हिंदु लोकांची मनें आपलीशीं करून घेतली पण या लेखन वाचनाच्या काळांत एवढ्याशा होहऱ्याची कोण दाद घेईल!

पु० वै०

रेंवा आणि सटना यांच्यामध्यें कांहीं डाक लोकांनीं जाणाऱ्या येणाऱ्यावर हल्ला करून त्यास लुटण्याचें काम चालविलें आहे. थोड्या दिवसांपूर्वीं त्यांनीं सुमारे ४००० ची मिळकत लुटली. या ड्यूक लोकाचा पत्ता लागत नाहीं. ह्याचा बंदोबस्त अवश्य झाला पाहिजे.

काश्मीरच्या संबंधानें हिंदुस्थान सरकारानें केलेली व्यवस्था आपणास पसंत आहे, अशा अर्थाचा खलिता सेक्रेटरीनें हिंदुस्थान सरकारास पाठविला आहे.

हिंदुस्थानच्या वर्तमानपत्रांत काबूलसंबंधी बातम्या कशा कळतात याचा शोध लावण्यासाठीं काबूलच्या अमीरानें इकडे आपले लोक पाठविले आहेत.

धरणीकंपाच्या संबंधानें अगाऊ सूचना देणारें यंत्र हांगकांग येथील मि० वुड नांवाचे इंजिनीयर तयार करीत आहेत

न्या० सु०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशीम तारीख ९।७।८९ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

छतानेक सां. नमस्कार विनंती विशेष. हल्लीं पाऊस चांगला लागत आहे. अद्याप उष्मा फार होतो, यावरून फार पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसतात. पेरणीचीं कामें बहुतेक संपत आली. पेर उत्तम प्रकारची साधली आहे. हवा उर्फ माहामारी दिवसें दिवस वाढत चालली आहे या मुळें प्राणी मात्राचें तोंडचें पाणी पळालें आहे. कोणावर या रोगाची गदा बसेल याचा नेम नसल्यामुळें हरएकाला आपल्या जिवाची चिंता वाहावी लागते. माहामारीसारखा दुर्धररोग दहशत घालणारा दुसरा कोणताही नाहीं. प्राच व पश्चिमात्य मोठीं मोठीं नामांकीत राष्ट्रें या रोगाचें निदान करण्याचे कामांत शेंकडों रुपये खर्च करून या महतामहत रोगावर तसेंच महतामहत औषध शोधकरून काढण्याचा यत्न करीत अहेत परंतु सर्व व्यर्थ आहे. अजून या संबंधीं कांहींच शोध नाहीं. हा रोग सर्वकाळीं व सर्व ऋतूमध्यें कोठेंना कोठें तरी आपलें काम बजावित असतो. यां याला थंडो नाहीं. पावसाळा नाहीं व उन्हाळा ही नाहीं. स्वच्छता असली म्हणजे हा रोग उत्पन्न होत नाहीं असें कित्येक म्हणतात. परंतु कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं जेथें अतिशय घाण असते तेथें ह्या रोगानें सर्व माणसें जाया व्हावी परंतु तसें कित्येक ठिकाणी न होतां उलट असा प्रकार होतो कीं जेथें लोक स्वच्छता ठेवण्यासाठीं फार जपतात तेथें लोक मरतात. एकूण मृत्यु स्वच्छतेवर अगर घाणीवर अवलंबून नाहीं. तर मला असें वाटतें मनुष्याचें आचरण हें जसें असेल त्या मानानें त्याला सुख अगर दुःख प्राप्त होतें. असें पाहाण्यांत येतें कीं ज कांहीं लोक आपल्या धर्माचरणानें वागतात नितीचा त्याग करित नाहींत, आपला पुरातन चालत आलेला धर्म सोडीत नाहींत त्यांचेवर दैन्याचे मेघ कधीं ही येत नाहींत. त्यांचा सृष्टक्रिम अव्याहत चालून त्यांना सुख प्राप्ती होते. ज्या वर्णाचा जो धर्म असेल तो त्याला नको पर धर्माचे अवलंबन करावेंसें बहुतांना वाटतें. या मुळें नानाप्रकारचीं दुःखें भोगणें मनुष्याच्या वाट्यास येतें तर सुज्ञ जनहो. हरएक वर्णाच्या मनुष्यानें धर्माचरणानें वागण्याचा नियम केल्यास फार फार फायदा होईल.

नवीन आलेले मे. ई. ए. इन्स्पेक्टर साहेबाचे क्लार्क फार हुशार, मन मिळाऊ असे आहेत अशी गांवांत चर्चा आहे. ईश्वर त्याना यश देवो अशी प्रार्थना आहे. ह्या जिल्ह्यांतून Gudicial Scheme मध्यें हलक्या प्रतीच्या कामगारांपैकीं एकास व मध्यम प्रतीच्या कामगारांपैकीं एकास असें दोघांनां Promotion मिळालें. ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. पत्र कर्ते महाराज छापा कृपा करून नी काय.

आपला

"क्ष"

---

मुक्काम वाशीम ९।७।८९ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

छतानेक साष्टांग नस्कार वि० वि० नवीन आलेले अर्क्टिंग डेप्युटी कमिशनर नबाब यासीनखान हे फार शांत वृत्तीचे आहेत. यांचें स्वच्छतेच्या कामीं चांगलें लक्ष्य आहे. गांवापासून त्यांचा रहाण्याचा बंगला जरी लांब आहे तरी गांवांत हे येतात. मुनिसिपालिटीनें स्वच्छता चांगली राखावी, गांवांतला कचरा वेळीं बाहेर नेतां यावा ह्मणून कचरा नेणाऱ्या गाड्यांची संख्या वाढविली आहे. ह्या गांवीं पायखान्यांची व्यवस्था नाहीं ही चांगली होण्या करितां म्युनिसिपालिटीच्या चालकांनी लक्ष्य पुरवावें ही त्यांना सूचना आहे. कित्येक लोक गांवांत अगदीं गरीब असल्यामुळें हुकूम एकदम करून त्यांना पायखाने बांधण्यास लाविलें तर एकप्रकारचा जुलूम लोकांना वाटेल तर तसें न करितां एव्हांपासून त्या कामास लागून तीन चार वर्षांमध्यें सर्व पायखाने एका fashion चे होतील अशी नीट त्यांनीं तजवीज ठेवावी.

नवीन झालेल्या टाऊनहालांत(Townhall) म्युनिसिपल ऑफिस गेलें. तशीच लायब्ररी गेली. आतां वाचनाची लोकांना अभिरूची लावण्याच्या कामीं लायब्ररीचे सेक्रेटरी यांनीं प्रयत्न करावा. एवढा मोठा गांव असून लायब्ररीची अशी शोचनीय स्थिति असावी हें मोठें खेदकारक आहे. आतां तरी पुढाऱ्यांनीं या कामीं लक्ष्य द्यावें. व १० रुपये दरमहा म्युनिसिपालिटी कडून मिळतात त्यांची योग्य व्यवस्था लावावी. हल्लीं तरी त्यांची योग्य व्यवस्थाच आहे. परंतु ज्या लोकांना वर्गणी देऊन स्वतंत्र पत्रें घेतां येत नाहींत. त्यांना थोडक्या पैशांत वर्गणीनें वाचण्यास पत्रें मिळावी या करितां दहा रुपये म्युनिसिपालिटी देते. बाकी मोठ्या लोकां करितां ह्मणून नेटिव लायब्ररी पासून गांवची स्थिती सुधारत असते असें मोठ्या लोकांचें ह्मणणें आहे. अजून येथें अगर ह्या जिल्ह्यांत राष्ट्रीय सभेकरितां कोठें लोकांची खटपट चालल्याचें ऐकूं येत नाहीं. अशा कामीं इतकी उदासीनता कां? पुढाऱ्यानों विचार करा. कळावें लोभ करावा हे विनंती.

आपला

" क्ष "

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

—सोडत—

छ० सा० न० वि० वि० अलिकडे असें पहाण्यांत आलें आहे कीं, मोठे कामगार लोक आपले हाताखालच्या लोकांपासून सोडतीच्या रूपानें पैसे उपटूं लागले आहेत. स्वामी ह्मणजे Superior व सेवक ह्मणजे त्याचे Subordinate आतां सेवकांपासून स्वामीनें पैसे घेणें ह्मणजे अगदीं वाईट व लोक चर्चेला पात्र होण्या सारखें आचरण होईल. तेव्हां प्रत्यक्ष रीतीनें पैसे घेणें बरोबर नाहीं. ह्मणून सोडतीच्या अगर दुसऱ्या अशाच रूपानें पैसे घेतले ह्मणजे लोकांना बोलण्यास जागा राहिली नाहीं. आतां हल्लींच्या काळीं सोडत वगैरे घातली तर इतर लोक मना पासून तींत पैसे घालण्यास धजत नाहींत. कारण सोडत ह्मणजे बेभरंशाचा व्यापार. त्यांत पैसे घातले तर कांहीं परत मिळेल अशी आशा नाहीं. तेव्हां शहाणे लोक अशा व्यापारांत पैसे घालणें ह्मजे केवळ मूर्खपण आहे असें समजतात. आतां जे कोणी अशांत पैसे घालतात ते केवळ वाळूवर इमारत बांधतात असें ह्मटलें पाहिजे. स्वामी असला त्याचे हाताखालीं पुष्कळ माणसें ( सेवक ) असलीं व स्वामीला आपल्या एखाद्या मालाची सोडत घालणें पडलें तर हाताखालच्या लोकांना निमूटपणें त्या सोडतींत पैसे घालावे लागतात. न घातले तर स्वामीची तब्येत जाईल व त्यामुळें आपलें नुकसान होईल असें ह्मणून बिचारे सहा रुपयांचे हो जरी नोकर असले तरी पुढील गोष्टीवर नजर देऊन मागें लागलेल्या शिरायाला कसा तरी वळण्या करितां निरूपाय होऊन यादीवर नांव घालतात. आतां हाताखालच्या लोकांपासून अशा रूपानें पैसे घेणें हे कोणत्या कायद्याला अनुसरून आहे व ही गोष्ट जर खात्याच्या मुख्याला कळली तर अशा रूपानें घेतलेले पैसे परत द्यावे लागल किंवा बाबा अशाच सोडती घालीत जावें आपल्या हाताखालच्या लोकांनां बुचाडीत काऊन आपली तुमडी भरून घे असें उत्तेजन मिळेल. काय होईल न कळे. आतां जो मनुष्य सरळ, नीतीमान, पापभीरु हाताखालच्या लोकांचे हित इच्छिणारा असेल तो जरी सोडत काढील तरी त्याच्या हाताखालच्या लोकांचे त्यांत आंकडे घेणार नाहीं. व जरी ते खुशी असले व न मागतां आपखुषीनें त्यांनीं त्यांत आंकडे घातले तरी ते त्या स्वामीला आवडणार नाहींत. कारण तो सरळ ह्मणून त्याला सरळच बुद्धीनें वागले पाहिजे. मला वाटतें दयाळू सरकारच्या राज्यांत अशा प्रकारचा धाक बहुधा असलच यांत संशय नाहीं. आतां अशा प्रकारचा धाक असून ही जर एकदां डोळ्यांवर पांघरूण घेऊन पैशाच्या लालचीकरितां नीतीचें तत्व विसरेल तर मग त्याला आत्मघातकी असें कोणी ही शाहणा मनुष्य ह्मणेल. तर अशाला सुज्ञानानें थोडक्या साठीं वश होऊन अपकीर्ति करून गरीब बिचाऱ्या हलक्या पगारांच्या नोकरांचा शाप घेऊं नये.

आतां अशा प्रकारचा व्यवसाय करणारा कोणता गृहस्थ, कोणत्या जिल्ह्यांत, कोणत्या हुद्यावर, कशाची सोडत, किती रुपयांची, त्यांत त्या गृहस्थाच्या हाताखालचे नोकर किती आहेत– याची इत्थंभुत हकीकत ती सोडत होऊन गेल्यावर कळवीन. मात्र सध्यां नांव गांव इतक्यांतच प्रकट न करण्याचे कारण इतकेंच कीं हे छापून आल्यावर जर कदाचित् ही गोष्ट वाईट आहे असें वाटून जर कदाचित हाताखालच्या लोकांचीं नांवें यादींतून काढिली तर मग इतक्या पंचाइती करण्याचें कांहींच कारण नाहीं. व हें छापून आल्यावर ही जर तिकडे काना डोळा केला तर मग गरिबांचा पक्ष घेऊन कांहीं झालें तरी आपल्या पत्रद्वारें जाहीर केल्या शिवाय रहातां नये, पत्रकर्तेराव आपण गरिबांचे कनवाळू व अनीती काढून टाकण्याचे कामीं आपला अवतार आहे तेव्हां हयगय नका हो करूं. नाहींतर परिचय नाहीं ह्मणून द्याल फेकून. तर असें नका हो करूं. कळावें हे विनंती.

आपला

'अपरिचित'

Justice

---


CALCUTTA ART STUDIO

185 *BOWBAZAR STREET.*

**PICTURES PICTURES PICTURES**

PUBLISHED FROM THE FAMOUS

CALCUTTA ART STUDIO.

About 200 sorts of beautifulld colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festiva.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy any Lady Lansdowne.

Every facility would be afforded to mofussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a mere nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO
185 Bowbazar Street.
CALCUTTA.

N. BISWAS.
Manager

*K. B. Rele and co.s' most efficacious.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणानीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतींध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढतें ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचित. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

रद्दा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घा.प. इ० मिटविणारें मलम कायतें हेंच किं० ०८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जातो, क्षयचा,, खोकला घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागतें अन्न पचतें किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सुचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पोव्डाश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फ्रूट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुनईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

---


बहिऱ्यांस.

बहिरेपणा आणि २३ चा कर्णनाद यांस गुण आणणारें सोपें औषध

जे. एच. निकलसन, ५ बी ओल्ड कोर्ट हैस स्ट्रीट कलकत्ता, यांस मिरटपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविण्यांत येईल.



राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा कराराचा कायदा.

सन १८७२ चा ९ वा

समजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अल्लाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यांसुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.


---

नोटीस.

म० रा० गजाननराव वामनराव देशपांडे वरु० सबरजिस्टर कचेरी रिसोड तालुके व जिल्हे वाशीम यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं सुमारें १५ दिवस होत आले असतील तुह्मी मजला आपले घरीं बोलावून नेऊन असें सांगितलें कीं तुझें शेताचें खरेदीखत कच्चे आहे आणि त्यांत आबा साहेब पांडे ढवळाढवळ करणार व त्यामुळें तुझें शेत जाणार तूं सदरहू शेताचें खरीदखत मजला करून दिल्यास तुझें शेत पक्कें करून देतों. पुढें माझे पैसे व्याजानीं मी परत घेऊन तुझें शेत १ वर्षानें परत देईन व शेत परत देण्या बद्दल उलट दस्तऐवज मी तुजला करून देतों अशी थाप तुह्मी मजला देऊन माझे शेताचे खरीदखत तुमचे बंधु चिंतामनराव देशपांडे हल्लीं वाशीम येथें हुजूर कचेरींत सरकारी नौकर आहेत त्यांचे नांवचें मजपासून तुह्मी करून घेतलें व ठरल्याप्रमाणें शेत तुजला परत देण्याचा उलट दस्तऐवज मी तुह्मास मागत असतां तुह्मी उलट दस्तऐवज मजला न देता माझें खरेदीखत तुह्मी दाबून बसला आहांत इतकेंच नाहीं. माझें शेतांत चालू असलेलें आऊतें तुह्मी शिपाई व माणसें पाठवून मारहाण करण्याचा धाक दाखवून माझीं आऊतें बंद करितां व माहरांच्या हातून खेटरें मारीन असें बोलतां व अधिकाराच्या जोरानें माझ्या शेतांत आऊतें धरण्याच्या खटपटींत तुम्ही आहां याकरितां तुम्हांस ह्या नोटीसीनें कळविण्यांत येतेकीं, सदरहू खरदिखत तुम्ही मजला फसवून कपटानें करून घेतलें आहे. जर तुमची मर्जी असल्यास सदरहू खरेदखत तुम्ही सरकारांत रीतप्रमाणें अर्ज करून घ्याव. तसें न करितां विनाकारण अधिकाराच्या जोरानें माझे शेतांत जबरदस्तीनें आऊतें धरण्यास येऊन मारहाण वगैरे केल्यास त्याचे जबाबदार तुम्हांस व्हावें लागेल तुम्ही सरकारी नौकर आहां व सरकारची रीत भात तुम्हांस माहीत आहे. तेव्हां जास्त आपणास कळविण्याची जरूरी नाहीं. इतकेही करून आपण रीती प्रमाणें न करितां जोर जुलमाचें वर्तन आपण मजवर करूं लागल्यास मजलाही तसेंच करावें लागेल. व तसें वर्तन उभयपक्षा कडूनही होण्याचा प्रसंग न यावा. याकरितांच केवळ आपणास आगाऊ नोटीसीनें कळविण्यांत आलें आहे. इतकेही करून आपण जुलमाचे वर्तन करूं लागल्यास आपले पुढें माझें गरिबाचें काय चालावयाचें आहे कळावें.

ताजाकलम तुम्ही आमचे शेतांत पेरलेलें जमानींत जबरीनें पेरून आमचं नुकसान केलें या बद्दल आम्ही तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करूं. तारीख १२ जुलाई सन १८८९ इसवी.

सही.

रावबा रामजी देशमुख रीसोडकर दस्तुर
नाना रामजी देशमुख खुद्द.

---

नोटीस.

रामजी वल्लद बाळाजी तेजनकर राहणार मौजे वडगांव तेजन ता० मेहेकर जिल्हे बुरडानें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमची मुलगी नामें लहानी मर्द गणपती सिरसाट हिच्याशी व माझ्याशीं तुम्ही धर्मशास्त्र जाती धर्मा प्रमाणें लग्न करून देण्यास आज सुमारें ९।१० वर्षें झालीं. आणि लग्न झाल्या दिवसा पासून-जन रिती प्रमाणें तिजला आमचे घरीं पाठवून तुम्ही आपलें घरीं ही नेत होते. परंतु मी दुसरी गंधर्वीची बायको करण्यास आज सुमारें ३ वर्षें झालीं आहेत. मी दुसरी गंधर्वाची बायको केः त्यामुळें तुम्ही आपली लेक ही दिपवाळीचे निमित्यानें घरीं नेली. त्या दिवसा पासून आज पावेतों पाठविली नाहीं. व ती अज्ञान असल्यामुळें माझें घरीं पाठविण्यास मी तुम्हास आग्रह केला नाहीं परंतु तिजला आतां सज्ञान होऊन आज सुमारें १॥ वर्ष झालें असून मी तुम्हास पुष्कळ पाठविण्या बद्दल ह्मटलें आणि तिजला आणण्यास आलों. परंतु तुम्ही पाठविली नाहीं आतां एक वर्षा पासोन तुम्ही आपली लेक ह्मणजे माझी बायको कोणीकडेस नेऊन घातली आहे हे समजत नाहीं. व तुम्हास विचारले असतां तुम्ही ही सांगत नाहीं. आतां सुमारें एक महिना झाला मजला असें समजलें आहे कीं, तुम्ही आपली लेक लहानी हिला दुसरा गंधर्वाचा नवरा देवजी मरकड राहणार गनपूर याचे हातून करून देणार आहेत तर या नोटीशीनें असें कळवितो कीं, जरी मी दुसरी बायको केली आहे तरी मी तिजला नांदविण्यास कबूल आहे. तिचे अंगावर डागिने चांदीचें वजन तोळे ४० आणि बाळ्या व नथ वगैरे सोन्याचे वजन तोळे २ हें तुमचे जीमेस आहेत. आणि या नोटीशीनें तिजला दुसरा नवरा करण्याची मनाई आहे. करितां ही नोटीस पावल्या तारख पासून आठ दिवसाचे आंत वर लिहिलेल्या डागिन्या सुद्धां माझी बायको आणून घालावी. जर असें करणार नाहीं तर तुमचेवर रीती प्रमाणें फिर्याद करून नोटीशीचे खर्चा सुद्धां भरून घेतले जाईल कळावें तारीख ६--७-८९ इ०.

( सही. )
गणपती वल्लद भवानी सिरसाट राहणार वडगांव तेजन ह्याची निशाणी रेघ असे.

सालअखेर " " ८८
किरकोळ अंकास......................८४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Per annum in advance 5 Postag
Per annum in arrears 7 "1Rs.
Six monthly............3 "
Single copy.......................

Advertisemen
Below 10 lines.
per line over10...
Repetition per lin


# वऱ्हाडसमाचार.


THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 15 JULY 1889 NO.

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख १५ माहे जुलै सन १८८९ इ० अंक २


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रिसोड ता० ४ जून सन १८८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा० नमस्कार वि० वि०

आपल्या गेल्या अंकीं रिसोडस्थाचें पत्र आलेलें पाहून फार समाधान वाटलें. कारण सदरहू पत्र जर आमचे नजरेस आलें नसतें तर आमच्या गोरक्षणी सभेचें काम किती झालें आहे हें सांगत बसण्यांत आम्ही कधीं गुंतलो नसतो.

असो, रिसोडस्थ "क्ष" म्हणतात त्या प्रमाणें प्रकार माझ्या पहाण्यांत आला नाहीं. येथें अडीच हजारावर वर्गणी जमली असून ती सावकारांचे घरीं व्याजी पडली आहे. व्यापारी लोकांनीं आपआपल्या व्यापाराच्या मगदुरा प्रमाणें कर देण्याचें ठरविलें आहे व त्याप्रमाणें पैसा वसूल होणें चालूं आहेच. प्रत्येक बाजाराचे दिवशीं गुरांचे बाजारांत गाई बळी जाणाऱ्या आढळल्यास यमाजी पंताचे पकड समन्स परत केलें जातेंच. गाई करितां एक मोठा कोठा केला असून तेथें पंधरासोळा गाई आपल्या वत्सासुद्धां निवाऱ्याच्या बसून दुवा देत आहेत. त्यांस गवताची दाण्याची वगैरे बिलकुल कमतरता नाहीं.

मग रिसोडच्या सभेचें काम जर इतकें रूपाला आलें आहे तर त्यांत 'आरंभशूर' पणा कसा झाला हें समजत नाहीं पण कदाचित इतकेंच करून गोभक्त स्वस्थ बसलेले "क्ष" स दिसून आरंभशूरपणाचा आरोप सभेच्या माथीं मारला असेल तर आमचे बंधूनीं रिसोडचें सामर्थ्य मनांत आणावें, म्हणजे रिसोडस्थ गोभक्त थोडे विश्रांती दाखल उभेराहून आजपर्यंत झालेल्या कृत्यांकडे सिंहावलोकन करित आहेत. याबद्दल खेद पावणार नाहींत.

येथें एक गोष्ट सांगितल्यास वावगी होणार नाहीं कीं, ह्या पावसाळ्याच्या आंतबाहेर एक बड्या गृहस्थाचा आश्रय धरून येथील गोरक्षणी सभा आसपासच्या मोठ्या गांवीं म्हणजे वाशीम, मालेगांव, मेहेकर, लोणार अशा ठिकाणीं आपल्या वृक्षाचें बीं पेरण्याचा प्रयत्न करण्याचे योजीत आहे हीं कामें घाईनें करू ह्मटल्यास होणार नाहींत.

आतां येथील शाळा व पोस्ट आफीस यावर जे आमच्या बंधूचें ह्मणणें आहे त्यास आपला अनुवाद देत बसण्यांत मी आपला वेळ व तुमचे पत्रांतील अमोलिक जागा कशास दवडूं! कारण, सध्यां 'तुका ह्मणे उगे रहावें. जें जें होईल तें तें पहावें.' असें दिवस आले आहेत कळावें हे विनंती.

आपला
रिसोडस्थ 'क्ष' जवळ स्थळाची
अपेक्षा करणारा
'म.'

वऱ्हाडसमाचार.

मिती आषाढ वद्य ३ शके १८११

## गोरक्षण.

अलीकडे या विषया संबंधानें बरीच चळवळ सुरू झाली आहे. या चळवळीचे मुख्य उत्पादक श्रीमान् स्वामी नांवाचे कोणी मद्रासी यति आहेत. हे गृहस्थ मद्रास युनिव्हरसिटीचे ग्रॅज्युएट असून हे कोर्टाचे वकील होते परंतु त्यांस उपरति होऊन त्यांनीं सध्यांचा आश्रम स्विकारला. सध्यां ते गोरक्षणाच्या पुण्यकर्मी आपलें आयुष्य क्रिमवीत व लोकांस बोध करीत सर्व देशभर फिरत आहेत. बंगाल, आलाहाबाद, पंजाब, नागपूर वगैरे प्रांतीं यांच्या उपदेशाचें चीज होऊन लोकांनीं गोरक्षणासंबधानें चांगली खटपट चालविली आहे. सध्यां हे स्वामी पुणें मुंबईकडेस आले आहेत व तेथें हीत्याची खटपट चालली आहे थोड्या दिवसांमागें यांनीं मुंबईस या विषया संबंधानें एक व्याख्यान दिलें. या व्याख्यानांत गोमाते पासून देशाला कसकसे फायदे आहेत हें त्यांनीं उत्तम रीतीनें सांगितलें. देशाच्या शेतकीला, संपत्तीला व आपल्या शक्तीवर्धनाला गायीचा कसा उपयोग होतो व त्यांच्या अभावी वर सांगितलेल्या गोष्टीमध्यें आपलें कसें नुकसान होतें आहे हें त्यांनीं श्रोत्यांच्या मनांत उत्तम रीतीनें ठसविलें. या व्याख्यानामध्यें त्यांनीं जी जी माहितीं सांगितली ती प्रत्येकानें वांचून विचार करण्या सारखी आहे करितां तिचा गोषवारा.

"सर डब्ल्यु हंटर यांनीं हिंदु लोकांच्या आपल्या इतिहासांत ह्मटलें आहे कीं, हिंदूच्या राष्ट्रीय उन्नतीला तीन अडथळे आहेत ते हेः— (१) गुरांची न्यूनता, (२) खताचें दुर्भिक्ष्य, (३) पाण्याची टंचाई. गुरांच्या न्यूनतेची कारणें;—(१) रोग, (२) उपासमार, (३) वध. ह्या उपासमारीनें दर वर्षी ५० लाख गुरूं मरतें.

१८८५-८६ च्या शेतकीच्या रिपोर्टांत एकंदर गुरांची संख्या दिली आहे ती येणें प्रमाणेः— (मद्रास) बैल व टोणगे ४६,७७,७२८; गाई व ह्मशी ४७,३२,८८२ (सिंध वजा करून बाकी मुंबईइलाखा) बैल, ३१,८९,९६७, गाई २१,६२,९२९, टोणगे ३,७६,१७६; (वायव्य प्रांतांत) गाई व बैल २३,२४,२०२, टोणगे व ह्मशी, ३०,२९,९२३; (औंध) गाई व बैल ५०,७६,१६४; टोणगे व ह्मशी ९,९५,८२३; (पंजाब) गाई व बैल ८९,३६,१८४, टोणगे व ह्मशी २४,४५,९१६, या पैकीं शेतकीची गुरें, मद्रास इलाखा, ४० लाख, मुंबइ ३० लाख, वायव्य प्रांत ७०, औंध २५, पंजाब ५ लाख; एकंदर १ कोट, १५ लाख. यांतील बिनशेतकीची एक षष्ठांष धरलीतर बाकी शेतकीची जनावरें राहिलीं एक कोट, ८० लाख.

आतां शेतकी जमीन मिलियन (दहालाख) एकरांच्या प्रमाणानें इतकीः— मद्रास, २७.४०; मुंबई, २८.१३; वायव्य प्रांत, २७.१३; औंध, ९.२५; पंजाब, २५.२०; एकंदर ११७.११ मिलियन एकर ह्मणजे ११७१.१० लाख एकर शेतकी जमीन झाली. ह्या संख्येशीं गुरांच्या संख्येशीं रुजबात घातली ह्मणजे दर ११ एकरांना एक बैलाची जोडी हें मान पडतें! गुरांच्या न्यूनतेचें दर शेंकडा प्रमाण काढलें तर अचंबाच वाटेल. १८८६ च्या जानेवारींत प्रसिद्ध झालेल्या एका रिपोर्टांत असें लिहिलें आहे कीं "गेल्या २६ वर्षांत शेंकडा २४ या प्रमाणें गुरें कमी झालीं." आणि ही स्थिति ६०—७० वर्षें चालली तर हाहाःकारच उडेल.

गोवधाचें मानः—आज ८५००० युरोपियन शिपाई आहेत, प्रत्येकास दर दिवसास पौंड गोमांस देतात. कमिसारिअट खात्यानें १ गाईचें १५० पौंड मास निघतें असें ठरविलें आहे. त्याप्रमाणें ५६७ गुरें दररोज मारलीं जातात. बांद्र्यास १८८३-८४ त २०,९४० गुरें; ८४-८५ त २२,६१९ ८५-८६ त १९,७०२; ८६-८७ त २६३८७; ८७-८८ त २७,५९५ गुरें मारलीं गेलीं. गेल्या पांच वर्षांत गोवधाचें मान शेंकडा ३१ ह्या मानानें वाढलें आहे. कलकत्ता व मद्रास येथें हें मान त्याहून अधिक आहे. दररोज ८३३३३ गाईंचा वध होतो व तो मुसलमान लोकां प्रित्यर्थ होतो, ह्मणजे दररोज ८९०० गाई बैलांचा वध होतो.

आतां आपण अर्थशास्त्रदृष्टीनें या विषयाचा विचार करूं. बंगाल्यांत दररोज दर गाईमागें ९ शेर दुध, वायव्य प्रांतांत ४ शेर, पंजाबांत १२ शेर, मद्रासेंत १३-१५ शेर, मुंबईंत ५-६ शेर दुध निघतें. सरसकट मान ६ शेराचें धरिलें, तर वर्षास एका गाई पाठीमागें १४ मण दुध निघतें. म्हणजे ३० वर्षांत १० वर्षें गाईपासून दुध मिळतें असें धरलें ह्मणजे त्या मुदतींत १४० मण दुध निघतें. दरमणीं ३ रु. दरानें १६० रु. उत्पन्न होतें. आतां ३० वर्षांची महि ४ रु. प्रमाणें खाउटी १४४० रु. हो ह्मणजे ३० वर्षांत एका गाईपासून १८० किंवा वर्षाला ६ रु. फायदा होतो. आणख ३० वर्षांत एक गाय दहादां विते व ति पांच कालवडी व पांच गोऱ्हे होतात. ए बैलानें १० वर्षांत १० वर्षें काम केलेंत १५०० रु. उत्पन्नाचें काम कारितो. तितक्य मुदतींत त्याची खाउटी १४४० रु. धरलें तर ६० रुपयांचा फायदा होतो. दोन गुरां मांस ३०० पौन्ड असतें, व तें दोन आ शेराप्रमाणें विकतें, (कोठें कोठें तें आध आणा शेराप्रमाणें विकतांना म्यां पाहिलें आहे) तर रु. १८-१२ आणे उत्पन्न होतें. कातडें वगैरें मिळून ६ रु. ४ आ धरले तर दोन गुरांच्या मांसापासून २५ रु. झाले. शेंकडा १२ टक्के व्याज धरिलें तर एका वर्षांत २५ चे ३ रु. व्याज झालें ह्मणजे दोन गुराच्या मांसावर ३ रु. फायदा आणि तींच दोन गुरें पाळल्यापासून दरवर्षी ८ रु. फायदा वर वाचविण्यांत आलाच आहे!

दूधाचा अपुरा पुरवठा व वाईट दूध यांच्या योगानें ८४—८५ त मुलें मेलीं त्यांची सरासरीः-- मुंबइ, एकंदर मृत्युसंख्येपैकीं पांच वर्षांच्या आंतील ४ पंचमांश मुलें मद्रास, एका वर्षाच्या आंतील १४१८९१; मध्यप्रांत, एक वर्षाच्या आंतील एक त्रितियांश; आणि पांच वर्षांच्या आंतील एकद्वितीयांश; पंजाब व वायव्य प्रांतांत एक द्वितीयांशावर ही मान आहे.

१८६५-६६ त बांर्डी ६०९८०३ पौंडाची बाहेर गेलीं; ७०-७१ त २०२८३७ पौंडाचीं; ७५-७६ त २९,४४,९३४ पौंडांची; ८०-८१ त ३७,३५,६४० पौंडांची. ८५-८६ त ५०,३६२२९ पौंडांची; ८६-८७ त ५१,४९,३१८ पौंडांची, याप्रमाणें दरवर्षी हें मान वाढत जात आहे.

ऑफिशिअल व नॉव्हिगेशनरि टर्नावरून येथें तूप व लोणी किती आलें त्याचा तपशील. ८५-८६ त १,८१७३२ रुपयाचें, ८६-८७ त ७०३,४३० रुपयांचें; ८७-८८ त १८१५१८ रुपयांचें तूप आलें, तसेंच वरील सालांत अनुक्रमें १,६९३३५ रुपयांचें; २४४८८१ रुपयांचें; ३०७४७२ रुपयांचें लोणी आलें बेलजम. डेन्मार्क, स्विटसलंड हे देश अमदाबाद किंवा सुरत या जिल्ह्याएवढे असतील; परंतु या देशांतून शेंकडों मण तूप लोणी बाहेर देशी जातें, परंतु हिंदुस्थानांतून एक पैसाभारसुद्धां लोणी किंवा तूप बाहेर जात नाहीं. इतकेंच नव्हें तर देशाला पुरेंसेंसुद्धां देशांत नाहीं.

येणप्रमाणें गोवधापासून अति नुकसान होत आहे व ही स्थिति ६०-७० वर्षें अशीच कायम राहिली तर आमच्या व्यापा-

ांना आपलीं दुकानें बंद करून बसावें ला-
ळ. आमच्या कडे शेतकीला घोडे किंवा
ट यांचा पुरवठा नाहीं. बाकीच्या नांगरांनीं
तकी करणें अगदीं अशक्य आहे. आणि
कीचे नांगर विकत घेण्यास लोकांत समर्थ्य-
ा नाहीं, तेव्हां आमची शेतकी गुरावरच
वलंबून आहे, ह्मणून आमची गुरें आम-
च्या पोटच्या पोराप्रमाणें जतन करून ठेवि-
लीं पाहिजेत. जंगलच्या नियमा मुळें शेणा-
चा खताकडे प्रयोग चांगलासा होत नाहीं.
पब्लिकवर्क्सखात्याच्या नियमामुळें गुरांना
चरण्यास मिळत नाहीं. सरकारनें कालव्या
संबंधानें पुष्कळ खर्च केला आहे, परंतु आ-
मच्या गुरांची स्थिति जर नीट राहिली ना-
हीं तर त्यांचा उपयोग नाहीं. गुरांच्या दुर्द-
शेमुळें शेतकी स्थिति वाईट, ह्मणून जमीन म
हसूल चांगला निघत नाहीं, असें मि. व-
स्टलंड साहेबानीं सुद्धां ह्मणून दाखविलें आ-
हे. तेव्हां प्रजेबरोबर सरकारचें सुद्धां नुकसान
होत आहे. हें अनिष्ट टाळण्या करितां ठिक-
ठिकाणीं गुरांचीं इस्पितळें व उत्तम गुरें उ-
त्पन्न करण्याच्या जागा व गुरांचे रोग शि-
कवण्याच्या शाळा स्थापाव्या. पारध व मांस
धरणें ह्या बद्दल सरकार नियम करिते. तर
गोरक्षणा संबंधानें कां करूं नयेत?

---

मे. कमिशनर साहेबाकडून आमच्या म्यु,
क. कडे एक पत्र आलें आहे त्यांत त्यांनीं
असें लिहिलें आहे कीं पुला नजीकचा दवा-
खाना हा केवळ लोकांच्याच उपयोग करि-
तां असल्या मुळें त्याचा सर्व खर्च या पुढें
म्युनिसिपालिटीनें देत जावा. आज पर्यंत स-
रकारा कडून जे पैसे मिळत होते ते या पुढें
मिळणार नाहींत. ह्या दवाखान्याशीं सरकार
चा अगदींच संबंध नाहीं. सर्व सरकारी कामें
सिव्हील सर्जन व हास्पिटल असिस्टंट यांज
कडूनच होतात. सरकारचा लोकांना लोकल
सेल्फ गव्हरमेंटचा अधिकार देण्या मध्यें आ-
पली जी काय मदत असेल नसेल ती सर्व
काढून घ्यावी असा उद्देश आहे काय? सर-
कारी कामा प्रीत्यर्थ जर सरकार पैसे खर्च
करण्यास तयार आहे तर लोकाप्रीत्यर्थ खर्च
करण्यास कां नसावें? ह्या पैशावर लोकांचा
कांहींच हक्क नाहीं काय? आह्माला लोकल
सेल्फ गव्हर्मेंट मिळून अद्याप वर्ष सुद्धां
झालें नाहीं तोच सरकार आह्माला
तंगी करूं पहाते आहे. ह्या बद्दल
लोकांनीं चांगला विचार करून आ-
पलें ह्मणणें सरकारास योग्य द्वारें कळवावें.
अशी आमची त्यांनां सूचना आहे.

---

शुद्धवऱ्हाडीनें आपले अशुद्ध कलम भा-
गवत याजवर झाडली आहे हें पाहून फार
वाईट वाटते. खरा प्रकार असा आहे. पोलि-
सांनीं आपण जो कायद्याचा अर्थ केला तो
खरा आहे असें दाखविण्याकरितां त्यानीं मु.
कायद्याचें कलम दाखविलें कारण त्यांनां
वाटेल कीं ह्या कलमावरून माजिस्ट्रेटास
वाटेल कीं मनुष्याच्या चालीपेक्षां जास्त वे-
गानें चालले ह्मणजे गुन्हा होतो हा जो आ-
पला ३४ कलमावर कोटी क्रम आहे त्यास
बळकटी येईल. परंतु खरोखर त्याचा या
मुकद्दम्याशीं कांहीं संबंध नाहीं. कारण प्रा-
सिक्युशन ही त्या प्रमाणें नव्हते व गुन्हा
ही दिवसास झाला होता. पोलिसचे ३४ क-
लमाचा अर्थ करण्यांत जितके शाहणपण
होते तितकेंच हे कलम दाखविण्यांत होते.
असा प्रकार असतां शुद्धवऱ्हाडीनें विनाकार-
ण अशुद्ध अक्षेप केला हा त्यांची मोठी चूक
आहे.

---


# The Berar Samachar

MONDAY JULY, 15, 1889.


## THE AMRAOTI MUNICIPAL RULES UNDER SECTION 34 OF THE NEW MUNICIPAL LAW

The new municipalities are fairly launched into working existence by this time and we propose to publish to-day the rules framed under section 34 of the Municipal Law by the Amraoti Municipality for general information and if possible, for general adoption. The rules commend themselves to us as they ensure division of labour and responsibility and yet do not tend to retain power in the hand of single individuals. The rules are as below:—

TIME AND PLACE OF MEETING OF COMMITTEE

1 The Committee shall hold an ordinary meeting on the first Wednesday of every month at Municipal office at an hour to be fixed from time to time for the conduct of ordinary business.

2 Other ordinary meetings and special meetings shall be held at such time and place as the Chairman or in his absence one of the Vice— Chairmen may direct such time and place shall be notified in the notice convening such ordinary or special meeting.

B

The manner of convening ordinary or special meetings and of giving notice there of.

3 Notice of the monthly ordinary and of special meetings shall be issued by one of the secretaries at least 7 days previous to the day of the meeting.

4 Notice of other ordinary meetings shall be issued by one of the secretaries at least 3 days before the day of the meeting.

But in cases of emergency the chairman or in his absence one of the Vice-Chairmen may convene such meeting after 12 hours notice.

5 A notice convening an ordinary or special meeting shall state the business that is to be transacted at such meeting and shall be circulated to all the resident members of the Committee.

C

The quorum necessary for the transaction of business at an ordinary meeting.

6 At an ordinary meeting the presence of 7 members will be necessary to form a quorum.

D

The conduct of proceedings at meetings and the adjournment of meetings.

7 The Chairman presiding at a meeting shall regulate the course of business to be brought forward at that meeting and shall preserve order.

8 Any member shall be entitled to lay propositions before the committee at any of its meetings provided written notice of the same has been given to the secretaries at least 8 days previous to the day of such meeting, and the secretaries shall insert such propositions in the list of subjects to be brought before the next meeting.

9 All questions on municipal matters shall be discussed at the meetings of the Committee except such as under the rules framed under section 34 of the Law may be delegated to sub-committees or secretaries.

10 Every proposition before the Committee or its amendment shall be proposed by one member and seconded by another. No proposition shall be considered which is not duly proposed and seconded.

11 When a proposition or amendment has been proposed and seconded the members present shall be entitled to speak on it. No member, until all the other members present desirous of speaking have had their turn shall speak more than once on any proposition or amendment unless specially allowed by the Chairman of the meeting. The proposer of a proposition shall be entitled to reply.

12 When an amendment has been brought to any proposition the amendment shall be put to vote first. If it is carried it shall become a substantive proposition and shall be put to vote as such. If it is not carried the original proposition shall be put to vote. When there are more amendments than one they shall be put in the inverse order in which they are proposed. When the number of votes on either side is euqal the presiding chairman shall have the right of giving a casting vote.

13 All proceedings shall be recorded in English. The matter under discussion before each committee shall be carefully explained in the vernacular to those members who do not know English before votes are taken. The record of the proceedings shall show how each question has been passed whether unanimously or by a majority; if by a majority, the names of the dissenting members shall be recorded if they so desire

14 All the meetings of the Committee are open to the public unless otherwise ordered by a majority of the Committee.

15 No question which has been once decided by a meeting of the Committee shall be brought up for consideration again unless a period of three months has elapsed since it was decided,—provided that the Committee may reconsider such a question if two thirds of the members present agree to do so.

E

The division of duties among members of the Cmmittee.

16 There will be four Sub Committees for the following purposes:—

(1) Finance and accounts.

(2) Sanitation and supervision of municipal sites.

(3) Public works.

(4) Education, Dispensary, vaccination and markets.

17 Each of these sub Committees, except the sanitation Committee, shall consist of 8 persons. The sanitation Committee shall consist of 12 persons.

18 The Sub-Committees shall meet as often as necessary for the dispcsal of business provided they meet at least once a week.

19 The sub-Committees will be entrusted with the performance of all executive duties in connection with the following subjects:—

(1) The finance and accounts Sub-Committee with the following subjects & every other business following under law sects 55. 56. 57. 58. 59. 63 & 96. Rule sects 36. 41. 44. 45. The assesment of taxes, the collection of all municipal taxes and dues and the proper keeping of accounts, and with the sanction and subject to the confirmation of the Committee the farming of the weekly Bazar Cess, Nakas, slaughter houses, refuse mago-trees &c.

(2) The Sanitation conservancy and sites Committee with following subjects and every other business following under Law sects 87, 88, 89, 90. 93, 94, 97 to 114 inclusive.

(a) The conservancy of the Municipality.

(b) Watering and lighting of roads.

(c) Prevention of encrouchments.

(d) Supervision of the night soil trenchs.

(e) Preliminary inquiry into applications for sites.

(F) supervision of public wells, springs, tanks or other sources from which water is or may be available for public use.

(g) Supervision, of saries of burial and burning grounds and of slaughter hoses.

(h) Registration of Vital statistics.

(i) Supervision of the cattle-grounds

(j) And generally the prevention of all nuisances.

(3) The public works Sub-Committee with the following subjects and every other business following under Law sects 79,80. 84, 85, 87. 95. 119 and Rules 43.

(a) The Construaction, maintenance, improvement and repair of public streets, bridges, drains latrins, municipal buldings and digging of night soil trenches.

(b) Planting and preservation of trees and superintendence of the municipal garden.

(c) Management of the water works

(d) Repairs to carts dustbins, plants, tools and all other municipal property.

[4] The Bucation Dispensary and miscellaneous Committee with.

[a] The supervision and management of Municipal Schools.

[b] Supervision of municipal Dispensary.

[c] Superintendence of Vaccination

[d] Superintendence of the Markets and except those markets (cotton grain markets) which have special Committee and rules of their own.

20 The Sub-Chmmittees shall elect their own chairman and shall conduct their own proceedings according to the above rules so far as applicable. The members of the several sub Committees may arrange for division of work among themselves. The quorum for the sanitation Sub Committee shall be four and for the other three Sub Committees there.

21 The secretary in charge of the office work shall be a member and secretary of the Finance Bucation and Dispensary Sub Committees. The other secretary shall be a member and secretary of the sanitation and Public works Sub Committees.

22 All Sub Committees will do their work subject to the sanction of the Committee where it is necessary under the Berar Municipal Law and the Rules framed there under.

23 The General Committee may at any time, on the application any person or without such application rescind or modify any order of a Sub-Committeee.

24 The Secretaries will be the chief responsible excutive officers of the Committee. It will be their duty to carry out every order or resolution of the Committee and of the Sub Cmmittees.

F

The persons by whom receipts may be granted on behalf of the Committee for money paid under the Berar municipal Law:—

25 All receipts for money paid under the B. M. law shall be granted by the Secretary in charge of the office work for the time being or by any other person authorized by the Finance

Committee in this behalf.

G

26 The power of entering on behalf of the committee, into any Contract under sect 39 of the B. M. Law, is hereby delegated to the Chairman of the Sub Committee to which the work under contract belongs, and the Secretary in charge of the office.

27 The appointment, punishment, and dismissal of Mehetars, male and female, will be in the hand of the sub Committee for sanitation subject to the general control of the Committee. The appointment, punishment and dismissal of municipal overseer, clerks, Jamadar Defedars, peons and other municipal servants shall rest with the committee.

28 Casual leave not exceeding 3 days may be granted to any servant of the municipality by the secretaries. Leave exceeding this period to servants whose pay is more than Rs. 10 may be grant ed by the secretaries after obtaining the sanction of the chairman and in the absence of the chairman the Vice—chairmen.

Leave to servants, whose pay is Rs. 10 and under may be granted by the secretaries.

---

Amongst the clerical appointments in the new scheme Mr. Ganesh G. Dahi gaokars seems to be particularly lucky. This gentleman passed his Lower Standard only and that in 1888 by two instalments. There were men in the service who had passed the Higher Standard and who were senior to Mr. Dahigaokar as they drew more pay. Some of them have even passed the higher standard. People came and asked us if we had influencial friends at head quarters to give them a 'lift'. of course we had none. Mr. Kavle's appointment cannot be taken exception to as he deserved the promotion he got. Mr. Patki and Mr. Marutirao especially the latter undoubtedly deserved promotions and a very good choice has been made as regards the appointment of the Sessions Judge's establishment.

---

Nobody will deny that there are greater chances of injustice in cases where the procedure is short and from which the Law allows no appeal, than in cases which are appellable and to which the ordinary rules of Procedure apply. And the only safe guard in such cases is to appoint efficient and experienced Judges to try them. And such is really the state in Bombay and other provinces. But here in Berar where the *justice* is *secure* the Resident has given these summary powers to almost all the assistant commissioners Extra Assistant commissioners and pleases to order any of them, without any regard for their efficiency or experience to exercise them. Lately Mr Mac Gill has taken charge of the Akola small cause court in which the daily average files is nearly 25; and to dispose of so many cases in addition to other routine work of a judge within 6 hours is not a small thing. To do it conscientiously requires a trained mind and good worldly knowledge. We leave it with the readers to decide whether Mr MacGill possesses these qualities. He has been in the Judicial line for years not more than two or three and passed his higher standard only a few months ago. We doubt whether he had ever read the Small Cause court Act before he occupied the chair. Mr. Davies who was in charge of the court gave him with the charge the lesson of the necessary procedure and had to guide him till he became *efficient*.

---

## THE GAZETTE OF INDIA JULY 6, 1889.

No. 1183-*C*.---M. Vishwanathum Modliar, officiating Extra Assistant Commissioner of the fifth Class, in the Hyderabad Assigned Districts, is appointed to be an Extra Assistant Commissioner of the 5th Class, with effect from the 26th November, 1888 *vice* Pandit Suraj Narayn, Supernumerary Assistant Commissioner of the 3rd Class, absorbed.

No. 1185-*G*.--The following substantive promotions and appointment are made in the berar Commission, with effect from the 19th April, 1889, consequent on the retirement of Colonel J. Fitzerald Deputy Commissioner of the 2nd Class:

Mr. H. B. Knowlys, Deputy Commissioner of the 3rd Class, to be a Deputy Commissioner of the 2nd Class.

Lieutenant- Colonel H. deP. Rennick, Assistant Commisssioner of 1st Class, to be a Deputy Commissioner of the 3rd Class.

Mr. C. A. W. Davies, Assistant Commissioner of the 2nd Class, to be an Assistant Commisssioner of the 1st Class.

Dastur Edalji Bymonji, Assistant Commissioner of the 3rd Class, to be an Assistant Commissioner of the 2nd Class.

Mr. Stanley Murray, Extra Assistant Resident incharge of the Residency Civil Offices in Hyderabad, to be an Assistant Commissioner of the 8rd Class.

No. 1187-*G*.--The following temporary appointments are made in the Berar Commission, consequent on the departure on forlough of Mr. H. B. Knowlys, Deputy Commissioner of 2nd Class, and with effect from the dates specified:

Mr. H. S. Nicholetts, Deputy Commissioner of the 3rd Class to officate as a Deputy Commissioner of the 2nd Class,---23rd May, 1889.

Mr. R. Obbard, Special Assistant Commissioner, Akola to officiate a Deputy Commissioner of the 3rd Class, with effect from the date of assuming charge.

Consequent on Mr. Obbard's making over charge of the duties of Special Assistant Commissioner Akola, the following temporary appointments are made, with effect from 21st May, 1889:

Mr. C. A. W. Davies, Assistant Commissioner of the 1st Class, to officiate as Special Assistant Commissioner Akola.

Dastur Edalji Bymonji, Assistant Commissioner of the 2nd Class, to officiate as an Assistant Commissioner of the 1st Class.

*The 1st July*, 1889.

No. 1189-*G*.. In consequence of the introduction of Hyderabad Assigned Districts Courts Law, 1889, the following appointments are made in the Berar commission, with effect from this date, unless otherwise stated:

Colonel R. Bullock, Deputy commissioner of 2nd class (on forlough), to be Civil and Sessions Judge.

Mr. R. Obbard, *C. S.* Special Assistant commissioner, and officiating Deputy commissioner of the 3rd class to officiate as Civil and Sessions Judge, during the absence on forlough of colonel R. Bullock, or until further orders.

Captain R. V. Garrett, Assistant commissioner of the 8rd class, and officiating Assistant commissioner of the 2nd class, to be an Assistant Commissioner of the 2nd Class.

Mr. J. O'Grady, Inspector of Police in the Hydrabad Assigned Districts to be an Extra Assistant Commissioner of the 5th class, with effect from the date of assuming charge.

No. 2007-*I*...In continuation of the notification of the Government of India in the foreign Department, No.1385.I dated the 29th March, 1889, the Governor General in council is pleased to appoint colonel K. J. L. Mackenzie to be Judicial commissioner in the Hyderabad Assigned Districts, with effect from this date.

No. 1213 *G*...Lieutenant L. S. Newmarch, Political Assistant of the 3rd class. and officiating Cantonment Magistrate at Secondrabad, is granted privilege leave, for three months, with effect from the 25th July, 1889, or the subsequent date on which he may avail himself of the leave.

No. 1219 *G*. Lieutenant M. A. Tighe, officiating Political Assistant of the 3rd class, and Assistant to the Resident, and to the General Superintendent of Operations for the Supression of Thagi and Dakaiti at Hyderabad, has passed in the subjects prescribed under clause A, rule II. of the rules for the examination of junior officers in the Political Department.

No. 1228 *G*. The services of Mr. A. P. Howell, Resident of the First Class, and Resident at Hyderabad, sub. *pro tempore*, are replaced at the disposal of the Home Department, with effect from the date on which he may relinquish charge.

No. 1231 *G*. Mr. D Fitzpatrick, C.S.I. chief commissioner of Assam, is appointed to be a Resident of the First class, and Resident at Hyderabad, with effect from the date of assuming charge *vice* Mr. A. P. Howell.

## CORRESPONDENCE

Dear Sir.

Please insert the following lines in the next issue of your valuable journal.

*Judicial Scheme* "The so called Judicial Scheme" has at last come into force from 1 st July 1889.

Mr. Ardesar Dinshojee has been invested with powers of a civil Judge and is also to try cases of Daryapoor Taluk the value of which exceeds 500. He is also a Taluka officer and is to dispose of Revenue cases. The Judicial Scheme has given Mr. Chinoy an addition to his work but not to his establishment. The Berar administration is well known for this policy. We see many Extra Assistant commissioners and Attachees appointed every year; but we rarely hear of new clerks being added to the establishment. This District has not gained by the new scheme but on the contrary it has suffered There is no appellate court here. A suitor must drag himself to the *heavenly town* of Amraoti to prefer an appeal against the decree of one Rupee. The notification published in the Residency orders of 29-6 89 declares that sessions cases arising within the limits of this District are to be tried at Amraoti and not in this District as was hitherto done This system is greatly inconvenient to Ellichpur public. Suppose a murder is commited at Kolamkhar in Melghot Taluk, and the sessions Judge tries the culprit at Amraoti. The witnesses for prosecution (most of them must be residents of Kalamkhar) shall have to come down to Amraoti with a long and tedious journey of 90 miles! The Government will have to undergo a large expense on account of these witnesse's, subsistence allowance &c. The civil Surgeon, the District Superintendent of Police and other police officers will have to attend the sessions court at Amraoti to the great detriment of public service. The accused would be prejudiced in his cause in as much as he could not have assessors of local experience to try his case. There are thus many disadvantages resulting from the new system. The old system has worked well and was most convenient to public. It is therefore sanguinely hoped that old system be retained and the Sessions cases may be tried in the District in which the offence is alleged to have been committed.

*Inspection*. The Judicial commissioner on his way back to Amraoti inspected all subordinate offices here. It is rumoured that this year's inspection was one in the proper sense of the word. It was most sharpened pinching and is sure to create awe in the minds of subordinates.

Yours truly

"X"

## वऱ्हाड.

हवामानः—गेल्या आठवड्यांत पा[ऊस] उत्तम तऱ्हेचा पडला, रोगराई ह्मणण्यासार[खी] नाहीं, पेरणीचीं कामें जारीनें सुरूं आहेत.

---

मि० डी. फिटझप्याट्रिक सी. एस. आ[य.] चीफ कमिशनर असाम यांस हैद्राबादचे रे[सि]डेंट नेमल्याचे गेल्या इंडिया ग्याझिटांत [प्र]सिद्ध झालें आहे. तसेंच वऱ्हाडचा स[न] १८८९ चा दिवाणी कोर्टाचा कायदा [या]अन्वयें कर्नल मेकंझी सा. यांस जु. कमि[श]नर, कर्नल बुलक सा. यांस सिव्हील व से[]शन जज्ज नेमलें असून कर्नल बुलक सा[.] परत येईपर्यंत मि. आब्र्ड सा. यांस आफि[]सिएटींग सिव्हील व सेशन जज्ज नेमल्या[चें] ही प्रसिद्ध झालें आहे.

---

कर्नल फिटझलेंड से. क्ला. डे. क. यांनी पेनशन घेतल्यामुळें मि. नौलीस सा. डे. क[.] थर्ड क्ला. यांस सेकंड क्लास डे. क. नेमिलें, कर्नल रेनिक साहेब अ० क० फ० क्ला० यांस थ. क्लास डे. क. नेमले, मि० डेव्हिस अ. क. से. क्ला. यांस फ. क्लास अ. क. नेमले, दस्तुर एदलजी बैमनजी थर्ड क्लास अ. क. यांस से. क्लास अ. क. नेमले व मि. स्टानले मरे ए. अ. रेसिडेंत यांस थ. क्ला. अ. क. नेमले.

---

कर्नल लेन सा. गेल्या रविवारीं विलायतेस जाण्यासाठीं येथून रवाना झाले.

---

मि० म्यांगिल सॉ० येथें येऊन आपले कामावर रुजूं झाले.

---

मुंबई येथील ग्रयांट मेडीकल कालेजांतील ग्र्याजुएट रा. रा. हरी वामनभट एल. एम. अँड एस हे थोड्या दिवसापूर्वी येथें खानगी दवाखाना घालण्याचे इराद्यानें आले आहेत व ते आपला कारखाना सात आठ दिवसांत सुरूं करणार असल्याचे समजतें. अशा प्रकारच्या विद्वान डाक्तरांची या शहरास फार उणीव होती ती हल्लींचे डाक्तर सा. यांणी येऊन दूर केली सबब आह्मी त्यांचे फार अभिनंदन करितो सदरहू डाक्तर सा. यांची विद्वत्ता व अनुभव या पासून आमचे ग्रामस्थ व प्रांतांतील लोक आपला फायदा करून घेतील असें आह्मी इच्छितों व तो करून घेण्या बद्दल त्यांस आह्मी शिफारस करितों.

---

मेहेरबान हेअर साहेब यांची नेमणूक येथील डेपुटी कमिशनरच्या जागीं झाल्यावरून ते ता. १३ रोजीं २ वाजतां हैद्राबादेहून आले व आज आपले कामाचा चार्ज घेतील.

## वर्तमानसार.

हस्तीदंती नमस्कार– तो असा कोणीही आपल्यास भेटलें ह्मणजे एकदां हात उचलून ह्यः ह्यः ह्यः करून हंसावें व दांत दाखवावे. ह्मणजे तो हस्तीदंती नमस्कार होय! हस्त आणि दंत मिळून हस्तदंती नमस्कार!

निझामाला नुडविणाऱ्या डेकन मायनिंग कंपनीबद्दल हल्लीं पार्लमेंटांत थोडासा वाद चालूं आहे. या वादांत कित्येक गोष्टी मोठ्या गमतीच्या बाहेर पडत असून त्या गोष्टीवरून आमचें संस्थानिक किती परतंत्र आहेत आणि त्यांची स्थिती किती निकट व केव्याप्रमाणें आहे हेंहीं सहज कळण्यासारखें आहे. निझामाच्या राज्यांतील दोन मुत्सद्दी यांची तोंडें दोन दिशेला झालीं आहेत; मेहेदी हसन त्या हरामखोर कंपनीला पुन्हां आपल्या घरांत घेण्याबद्दल मत देत आहे व मेहेदी अली ही तीस हुसकावून लावण्याच्या पंथांत आहे. कंपनीला कांहीं जास्त सवलती देऊन व नवा करार करून त्या चोर कंपनीस पुन्हां निझामाच्या राज्यांत शिरण्याबद्दल हिंदुस्थान सरकार आपलें मत ठोकून देत आहे व याच मताला मेहेदी हसन मिळाला आहे. या कामांत यजमानाला कोणीच विचारीत नाहीं. या कंपनीस पुन्हां आपल्या राज्यांत न येऊं देण्याबद्दल निझामाचें मत आहे. पण आमच्या बहादूर हिंदुस्थानसरकारानें तें त्यांचें ह्मणणें गुंडाळून ठेवून आपल्या जातभाईचा नफा करण्याच्या मार्गास ते सरकार लागलें आहे. स्टेट सेक्रेटरी ही याच मताला मिळणार होते पण मेहेदी अलीच्या मार्फत एक लांब लचक व पक्षपाती लेख लंडन टाइम्स पत्रांत प्रसिद्ध झाल्यामुळें पार्लमेंट मेंबरांत मोठी गडबड उडून राहिली आहे. गेल्याच्या मागील शनवारीं पार्लमेंट मेंबर मि. लाबोचीर याणी स्टेट सेक्रेटरीस पुढील प्रश्न विचारलेः डेकन मायानिंग कंपनीच्या पूर्वींच्या कराराप्रमाणेंच त्या कंपनीस पुन्हां काम करण्याचें स्टेट सेक्रेटरीनें ठरविलें असें जें लंडन टाइम्स पत्रांत प्रसिद्ध झालें आहे तें खरें कीं काय ? या कंपनीशीं हा जो नवा करार झाला आहे त्यामुळें तो अपुरा व निझामाच्या हितास बाध आणणारा आहे असें जे मेहदी अलीचें ह्मणणें तें कितपत खरें आहे? या गोष्टीस हैद्राबादचें रेसिडेंट व इंडियाऑफिसाचे वकील यांची संमती आहे काय? इंडिया ऑफिसाच्या ह्मणण्यावरून निझामानें नेमलेल्या फ्रेशफील्ड नांवाच्या वकिलानेंच हा करार, निझामाच्या संमतीवांचून, वाटसन कंपनीशीं केला किंवा कसें हा करार तुम्हास कबूल नसल्यास आह्मी तुमचें काम करण्यास तयार नाहीं अशी फ्रेशफील्ड वकिलानें निझामास तंबी दिली आहे किंवा नाहीं? गेल्या वर्षीं जी पार्लमेंट कमेटी स्थापन झाली होती त्या कमेटीनें या कंपनीस अबदुलहकाचे भागीदार असें म्हटलें असतांहीं असा करार करण्याचें कारण या देशांतील निझामाची अब्रू कमी होऊं नये असें जें कारण मेसर्स फ्रेसफील यांच्या कडून सांगण्यांत आलें आहे तें कितपत संभवनीय आहे? या प्रकरणाचा शेवट निकाल लागण्या पूर्वीं तुह्मी रेसिडेंट व निझाम सरकार यांच्यांत जो पत्रव्यवहार झाला आहे तो आमच्या पुढें मांडाल काय? यावर आमच्या अंडर सेक्रेटरीनें जीं उत्तरें दिलीं तीं अशीं, टाइम्स पत्रांतील लेख घाईनें प्रसिद्ध झाला आहे, या प्रकरणाचा विचार अजून स्टेट करीत आहे, वकील मेसर्स फ्रेशफील्ड व निजाम सरकार यांच्यांत कांहीं गुप्तपत्रव्यवहार झाल्याचें स्टेट सेक्रेटरीच्या कानावर ही आलें नाहीं. स्टेट सेक्रेटरी यांचा निकाल करी तों पर्यंत मला तें कागदपत्र या सभेपुढें मांडतां येत नाहींत. तो पत्रव्यवहार टाइम्सच्या हातांत गेला असून तुह्माला माहीत नाहीं ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे ह्मणून तो पत्रव्यवहार आह्माला पहाण्यास मिळालाच पाहिजे असें लाबोचीर यांणी तक्रार केली पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां असें बाहेर आलें आहे कीं, ज्या कित्येक अटी वाटनसनें लिहून दिल्या आहेत त्या अटी हिंदुस्थान सरकार कबूल करीत नसून याहून निझामाला अधीक सवलतीच्या अटी वाटसन कडून लिहून मिळाल्या पाहिजेत असें हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें आहे. आतां इंडिया ऑफिसानें फ्रेशफील्ड नांवाचा जो एक वकील निझामाला दिला होता तो निझामाचें कितपत हित करीत होता हें पुढील हकिकती वरून सहज समजेल. इंडिया ऑफिसाकडून हा वकील निझाम सरकारच्या मुद्दाम माथीं मारला होता. या वकिलाची काम करण्याची शैली मोठ्या गमतीची आहे. त्यांस जें वाटलें तें त्यांनीं केलें. त्यांनीं ज्या ज्या सूचना केल्या त्या त्या हैद्राबाद सरकारास अपुऱ्या अशा वाटल्या आणि ह्मणून हैद्राबाद सरकारानें कांहीं अटी लिहून पाठविल्या पण त्या आल्या बरोबर फ्रेशफील्ड वकिलाचें डोकें तापून गेलें व त्या सूचना आह्मी पुढें मांडीत नाहीं असें त्या वकिलानें सांगितलें (असला वकील निजामाला मिळणें त्या चोर कंपनीचें मोठें दैवच समजलें पाहिजे) असा आपल्याच वकिलाशीं तंटा झाल्या मुळें निझामाचें ह्मणणें कांहींच पुढें येईना. त्या फ्रेशफील्ड वकिलास तरी तशा सूचना नाकारण्याचें कारण विचारतां तो सांगतो कीं, यामुळें वाटसन ह्मणजे चोर कंपनीची अब्रू जाईल! ज्या वाटसननें एक पत्र लिहिण्या करितां ६,००० रुपये निझामाच्या खिशांतून काढल्याची हीं अब्रू पहा!! या सर्व हकिकतीवरून इंडिया ऑफिसानें निझामाची काय किंमत केली. आपल्या जाती बांधवाचे कसे खिसे भरले व निझामाला कशा युक्तीनें तोंडघशीं पाडण्याचा वेळ आणला होता हे सहज समजण्या सारखे आहे. ठा. अ.

ठराव— सरकारी नौकरांनीं व्यापारांत वगैरे पैसा घालूं नये असा जो ठराव आहे; तो ठराव ते नोकर नेटिव संस्थानांत; म्युनिसिपालिट्यांकडे किंवा रेलवे कंपन्यांकडे नौकरीस गेले तरी त्यांस तेथें हीं लागूं आहे, असा विलायत सरकाराकडून ठराव होऊन आला आहे.

ड्यूक ऑफ केंब्रीज यांचेवर कोणी एकानें फिर्याद करून समन्स मागितलें तें देण्याचें माजिस्ट्रेटनें नाकारिलें परंतु वरिष्ट कोर्टाच्या जज्जानीं समन्स दिलें.

जगांत १,९०,००० किड्यांच्या जाती आहेत.

फिलिपाईन बेटांत एक झाड आहे याचे फुलाचा व्यास एक यार्ड आहे. ज.

सर सालरजंग यांचा मृत्यु— सर सालरजंग हे तारीख ७ रोजीं बारावर तीन वाजतां हैदराबादेस मरण पावले. यांस एक मुलगा आहे. तो जन्मून नुकेच तीन आठवडे झाले. सर सालरजंग ह्यांचें वय २६ वर्षांचें होतें. ह्यांस हैद्राबादच्या दिवाणगिरीची वस्त्रें मिळालीं होतीं त्या वेळेस यांचें वय २० वर्षांचें होतें. पुढें यांचे व निजामाचें पटेना ह्मणून यांनां दिवाणगिरी सोडावी लागली तथापि निजामांनीं मोठ्या उदार बुद्धीनें यांचा वराण्याचें सर्व कर्ज फेडून टाकलें होतें. व यांस दरमाहा ७ हजार रुपये पेनशन करून दिलें होतें. हे विलायतेस गेले होते यांनीं एक निबंध लिहून नाईन्टिन्थ सेंचुरीमध्यें प्रसिद्ध केला होता. त्यांत टर्की व आस्ट्रिया यांनी एकत्र व्हावें ह्मणजे रशियाची पुढें चाल होणार नाहीं असें सुचविलें होतें हे अल्पवई होते तरी यांच्या अंगीं बराच पोक्तपणा दिसत असे यांनीं नोकरी सोडल्यावर राजप्रकरणांत ढवळाढवळ करण्याचें काम बिलकुल केलें नाहीं यावरूनच त्यांच्या अंगच्या विवेकाची साक्ष पटते.

वाल्सा सुरूं असल्यास लग्नाच्या मेजवान्या देण्याचें बंद करावें, व कोणीं मेजवानी दिल्यास त्यास कायद्याप्रमाणें शिक्षा द्यावी असें ठरत आहे.

पैठणास एका ब्राह्मणानें सोन्याचें जोडवें गिळलें तें कांहीं केल्यानें बाहेर पडत नाहीं. भटजी महाराजांस दररोज घुतल्या चादरीवर बसवितात. ढाळके सुरूं आहेत. पैजेखातर हें साहस त्यांनीं केलें असें ह्मणतात.

आजपर्यंत बायका शिपाईगिरीचें काम करीत नव्हत्या. परंतु नुकीच एक पलटण तयार करण्यांत आली आहे. तींत सर्व मुली आहेत. त्या पलटणींतील मुली शिपाईबेरा घालतात व कवाईतकरतात. ही स्त्रियांची पलटण कोठें स्थापन झाली असावी बरें! इंग्लंडांतील बायकांनीं तर नुकेंच स्त्रियांच्या हक्काविरुद्ध गवगवा करण्याचें आरंभिलें आहे. तेव्हां त्या कशाच्या बांध्या होणार? अमेरिकेंतच असेल प्रकार आढळावयाचें. के०

नवल ! पुणें कसबा पेठेंत रहाणारे कोणी बाळभट शालिग्राम या गृहस्थाच्या सुनेच्या आंगावर दररोज शेरोगणती मिरच्यांचे तांबडेलाल तिखट येऊन आपोआप पडतें. तिखटाचा मासला आमचेकडे आलेला आहे. यांस ठसणीचा व कोयींबिरीचा वास येतो ! तिखट कोण टाकतें हें दिसत नाहीं, पण डोळ्याची व तोंडाची आग होणें हे तिखटाचे परिणाम बाईस भासतात ! बाईचें वय ११-१२ वर्षांचे आहे. एकादेवेळ मारलें मारलें ह्मणून ती ओरडते, पण मारणारें कोणीच दिसत नसून गालावर पांच बोटें मात्र वठलेली दिसतात ! मांडी आवळली मांडी आवळली ह्मणून बिचारी हाका मारते, पण आवळणारें कोणी दिसत नसून मांडीला मात्र करकोचा दिसूं लागतो !! हें नवल काय आहे तें पाहून जर या यातनेंतुन सदर बाईची कोणी सुटका करील तर आह्मी त्याचे फार आभारी होऊं. मुख्यत्वें करून आमच्या सुधारक मंडळीनें इकडे विशेष लक्ष्य देऊन त्याचा विचार करावा. पु० वै०

ज्या मजुरांस देशांतर करणें असेल त्यांनां सध्यां आफ्रिकेंतील ट्रान्सवाल नांवाच्या संस्थानासारखी सोय नाहीं. तेथें हल्लीं गवंडी सुतार वगैरे लोकांना दररोज सुमारें ८ पासून ९ रुपये पर्यंत मिळतात. अगदीं साध्या पाट्या वाहाणाऱ्या मजुरासही दररोज २।–२॥ रुपयांची प्राप्ती होते. के०

बंगाल इलाख्याच्या डायमंडहारबर नांवाच्या जिल्ह्यांत भयंकर दुष्काळ पडला आहे. अन्न न मिळाल्यामुळें लोक कंदमुळें व पानें यांवर निर्वाह करीत आहे अशा प्रसंगीं एका दोघां माणसांनीं आपल्या कंदमुळाच्या अन्नांत घालण्यासाठीं जमिनीवरचें मीठ खरवडून घेतलें, ह्मणून त्यांवर फिर्याद होऊन दंडाच्या व कैदेच्या शिक्षा झाल्या! मिठाच्या कायद्यापासून लोकांस किती सुख होतें आहे तें पहा! !

दालगोवा प्रांतांत इंग्रज रेल्वे कंपनी व पोर्तुगीज सरकार यांच्यांत बरेंच हातघाईचे प्रकरण माजलें आहे. रेल्वेकंपनी तेथून निघत नाहीं व पोर्तुगीज पोलीस त्यास सक्तीनें हांकून काढीत आहे. त्या ठिकाणच्या इंग्रज लष्करी अधिकाऱ्यानें कुमक पाठविण्याविषयीं केप व इंडियन अधिकाऱ्यास कळविलें आहे. रेल्वे बंद करते वेळीं एका इंजिन ड्रायव्हरास गोळी घालून ठार मारल्याची गोष्ट पोर्तुगीज सरकार कबूल करीत नाहीं असें लंडनची ता. १ मिनहूची तार सांगते. या प्रांतांत इंग्रज प्रजेचे जें नुकसान झालें तें पोर्तुगीज सरकारास भरून द्यावें लागेल तसेंच रेल्वेची नुकसानी केल्याबद्दल दिवाणी दावा करून नुकसानी भरून घेतली जाईल असें विचारल्या प्रश्नाचें उत्तर देतानां सर जेम्स फरग्यूसन याणी कामन्स सभेंत ता १ मिनहू रोजीं बोलून दाखविलें.

इजिप्त प्रांतांत दरवेशी लोकांनीं पुन्हा उचल केल्यामुळें ज्या लष्करी अमलदारांस पेनशन दिलें होतें त्यास तेथील इंग्रज अधिकाऱ्यांनीं पुन्हा कामावर बोलावलें आहे. दरवेशी लोकांनीं हल्ला केल्यास तयारी असावी म्हणून तेथील अधिकारी मोठ्या जारीनें कडेकोट तयारी करीत आहेत.

युरोपांत लढाई होण्यास कारण झाल्यास सर्व्हियाप्रांतांत होईल असें आतां वाटूं लागलें आहे सर्व्हियाप्रांतातील लोकांचे दोन तट झाले आहेत. एका पक्षाचें म्हणणें आपण रशियाच्या स्वाधीन व्हावें असा आहे व दुसऱ्याचें त्याच्याविरुद्ध आहे म्हणजे सर्व्हिया रशियाचा मिंदा होण्यापेक्षां स्वतंत्र राहून काय होणें असेल तें व्हावें सर्व्हियानें गुपचुप रशियाच्या स्वाधीन व्हावें व आजपर्यंतच्या इतिहासावरून ते रशियाच्या अमला खालींच होता असें रशियनपत्रें म्हणू लागली आहेत.

पगार मिळणाऱ्या नोकरानीं पुरावा घेण्याबद्दल जर कमिशन घेतलें तर तें सरकार जमा होईल असें हायकोर्टानें प्रसिद्ध केलें आहे.

आजपर्यंत गंजमप्रांतांत दुष्काळ पिडिलेले फक्त ८ हजारच लोक होते पण आतां ती सख्या तिपटीनें ह्मणजे २१ हजार झाली आहे.

मुंबईच्या हायकोर्टांतील जज्जास कौन्सलरची जागा मिळावयाची नाहीं असें स्टेट सेक्रेटरी इतक्यांत ठरवील असें पायोनियर ह्मणतो. ठा० अ०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास.............................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements
Below 10 lines...2R.
per line over10... 4as.
Repetition per line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 22 JULY 1889 | NO. 28

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २२ माहे जूलै सन १८८९ इ० | अंक २८

वऱ्हाडसमाचार.

मित्ती आषाढ वद्य १० शके १८११

## नेटिव संस्थानें.

( २६ वें अंकावरून पुढें चालूं. )

वरील विवेचन सरकारच्या बाजूचें संपलें. आतां राजे रजवाडे व संस्थानें ह्यांच्या संबंधानें धुरंधर पुरुषांनीं चार हीतगोष्टी सांगितल्या त्या आपण ऐकतों, त्या पुन्हां थोडक्यांत सांगणें ह्यावेळीं फार अवश्यक आहे. धनं दौलत कशी मिळते हें ज्यास प्रत्यक्ष कळून आलें आहे तो सद्गुणी व सच्छील असेल तर त्या दौलतीच्या ऐश्वर्याचा उपयोग व उपभोग हे योग्य प्रकारें मिळणें सहजीक घडून येतें. कंबरेला तलवार लटकत आहे अशा शूरशिपायाच्या बाण्यानें भगीरथ प्रयत्न करून आंगच्या पराक्रमानें व कर्तबगारीनें ज्यांनीं राज्यें संपादन केलीं आहेत त्यांचा नांव लौकीक कोणीकडे आणी त्यांच्याच पश्चात वंश परंपरेनें वंशज म्हणून त्या वैभवाचे बनलेल्या स्वामीचा हतवीर्य व अनागळ राज्य कारभार आरंभिच्या बहादर पूर्वजांच्या वर्तनक्रमाशीं तोलास तोल देऊन कितपत टिकणार आहे हें उघड दिसत आहे. वर जितक्या म्हणून संस्थानिकांचीं नामें ळी दिली आहे त्यांची पूर्व पीठीका लक्षांत आणिली म्हणजे त्या त्या संस्थानच्या गादीच्या संस्थापकांचीं धन्यता वाटते. गर्भ श्रीमंती नशीबानुसार प्राप्त होते तरी गर्भ श्रीमान लोकांनीं हवें तसें वागावें व आपल्यास समशेर बहादर व रणशूर म्हणून नांवाजलेल्या व नाणोलेल्या थोरथोर राज घराण्यांस काळिमा आणण्या सारखें वर्तन ठेवावें ही गोष्ट पराकाष्ठेची दुःखप्रद होत असते. आम्हीं कबुल करितों कीं राजबिंड्या पुरुषांना जगाचा अनुभव व लोकांची परिक्षा करितां येण्यास साधन सामुग्री नसते, परंतु त्यांनीं निदान खबरदारी ठेविली पाहिजे कीं, माणसें एकेक जवाहिऱ्याचे तुकड्या सारखी दौलतींत जमा केलीं आहेत तर वडिलांनीं संपादलेल्या हरएक खानदानी लोकांचा परामर्ष घेऊन त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें पाऊल रतीभरही इकडे तिकडे पडूं न देतां वागलें असतां खात्रीनें लोक अशा राजपुरुषांस चहातील आणि त्यांची सर्वत्र वाहवा होईल. पण हा साधारण अकलेचा नियम सुद्धां पाळणें आमच्या होळकरा सारख्या तरतरीत युवराजास अवघड वाटतें. राजेरजवाडे व संस्थानिक ह्या पैकीं प्रत्येकानें लक्षांत वागविलें पाहिजे कीं ज्या राजलक्ष्मीचा ते हल्लीं उपभोग घेत आहेत ती केवळ त्यांच्याच उपभोगासाठीं ह्यांनां दिलेली नाहीं. त्यांच्यावरची जबाबदारी फार फार मोठी आहे. आपले पूर्वस्मरून त्याच्याशीं समतोल राज्य कारभार हकावा आणि दिवसें दिवस आपली दौलत वृधिंगत करून मरणोत्तर पुढें होणाऱ्या वंशजांच्या स्वाधीन करून ठेवावी हें त्यांचे कर्तव्य कर्म होय. रयतेचें कल्याण करण्याकडे नेहमीं मनाची प्रवृत्ती ठेविली आणि राजलक्ष्मीचें वैभव व मकरध्वजाचे वारें ह्यांचा आपल्या मनावर जोर होऊं न दिला तर सदोदींत प्रजा आबादानींत राहून दुवा देत जाईल आणि निश्चयें करून त्या संस्थानची यशश्री दुणावेल.

## जिल्हा बोर्डांची निवडणूक करण्याविषयींचे नियम.

सन १८८५ सालचा वऱ्हाड रूरल बोर्डस् कायद्यांतील कलम ३३ अन्वयें अलिशान रेसिडेंट साहेबानें जिल्हा बोर्डांतील सभासदांची निवडणूक करण्या संबंधानें नियम केले आहेत त्यांचा सारांशः—

तालुका बोर्डांतील चेअरमन व व्हाइस चेअरमनची निवडणूक झाल्यावर जिल्हा बोर्डांतील मेंबराची निवडणूक करण्या करितां चेअरमनेंन आपल्या बोर्डांतील लोकांची सभा भरवावी. व या सभेची नोटीस सर्व मेंबरांना निदान सात दिवस तरी आधीं दिली पाहिजे. सभेची सर्व व्यवस्था चेअरमनें किंवा त्याच्या गैरहजरींत व्हाईस चेअरमनें करावी. प्रत्येक मेंबरानें आपल्या बोर्डांतील जे मेंबर जिल्हा बोर्डांत जाण्यास लायक असतील त्यांच्या नांवाची सूचना करावी व ती एका पेक्षां जास्त मनुष्याबद्दल करूं नये, या प्रमाणें सभेचे दिवशीं सर्व लोकांची हजरी घेतली जाईल व जे लोक हजर असतील त्यांनींच आपणांतून जे लोक निवडायाचे असतील त्यांच्या बद्दल जितक्या ह्मणून जागा भरावयाच्या असतील तितकीं मतें तोंडीं किंवा आपल्या स्वदस्तुरच्या सहीनिशीं लेखीं द्यावीत. परंतु प्रत्येक उमेदवारला एका मेंबरानें एका पेक्षां जास्त मतें देऊं नयेत. या प्रमाणें मतें घेतल्यावर चेअरमनेंन किंवा व्हा. चेअरमनें प्रत्येक उमेदवाराबद्दलच्या मताची बेरीज घेऊन ज्यांना ज्यास्त मतें असतील त्यांचीं नांवें प्रसिद्ध करावीत. दोन किंवा अधीक उमेदवाराबद्दल मताची संख्या सारखी आल्यामुळें जर निवडणूक करण्याचा संशय येईल तर चेअरमन किंवा व्हा. चेअरमन जो कोणी काम करीत असेल त्यांनीं आपलें एक जास्त मत देऊन निवडणूक करावी. खालीं दिल्या प्रमाणें प्रत्येक तालुक्यांतून जितके मेंबर निवडले पाहिजेत तितक्यांची जर निवडणूक होणार नाहीं तर ज्या जागा भरावयाच्या बाकी राहतील त्या कमिशनर साहेबांनीं भराव्या. परंतु नेमलेल्या लोकांची संख्या जिल्हा बोर्डांतील लोकांच्या संख्येच्या निमेपेक्षां जास्त होऊं नये. या प्रमाणें निवडणूक झाल्यावर निवडलेल्या लोकांचीं नांवें मे. कमिशनर साहेबांस कळवावीं. ह्मणजे पुढें लिहिल्या प्रमाणें बाकीच्या मेंबराची नेमणूक ते करतील. या प्रमाणें निवडलेल्या व नेमलेल्या लोकांचीं नांवें रेसीडेन्सी ऑरडर प्रसिद्ध झाल्यावर प्रत्येक डे. कमिशनरनें आपल्या जिल्ह्यांतील मेंबरांची सभा भरवून त्या मधून चेअरमन व व्हा. चेअरमन नेमावेत.

प्रत्येक जिल्हा बोर्डांत किती लोक पाहिजेत व त्या पैकीं प्रत्येक तालुका बोर्डानें किती लोक निवडावें व क. सा. नीं किती नेमावे हें पुढील कोष्टकावरून समजेल.

| जिल्ह्याचें नांव. | ता. बोर्डांची संख्या. | जि. बो. करितां प्रत्येक ता. बो. किती लोक निवडावे ते. | एकंदर निवडलेल्यांची संख्या. | जि. बो. करितां क. सा. किती लोक नेमावयाचे ते | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| उमरावती | ४ | ६ अ | २४ | ६ ब | ३० |
| आकोला | ५ | ६ अ | ३० | ६ ब | ३६ |
| इलिचपूर | २ | ६ अ | १२ | ४ क | १६ |
| वाशीम | ३ | ६ | १८ | ड ५ | २३ |
| बुल्ढाणा | ३ | ६ | १८ | ड ५ | २३ |

टीपः—(अ) जागल्या आणि लोकलफंड मेंबरांपैकीं निदान चार पेक्षां कमी नाहींत इतके मेंबर प्रत्येक ता. बोर्डानें निवडावे.

(ब ड) एकंदर सर्व तालुका बोर्डांत सरकारनीयुक्त जितके मेंबर असतील त्यांमधून तीन पेक्षां कमी नाहींत इतके लोक नेमले जावेत.

( क )एकंदर सर्व ता० बोर्डांतील नेमलेल्या लोकां पैकीं दोनपेक्षां कमी नाहींत इतके लोक नेमले जावेत.

म्युनिसिपालिटीचीं इतर जीं कामें आहेत त्या सर्वांत पैशाचें काम हें मुख्य आहे, व जों पर्यंत हें काम चांगलें झालें नाहीं तोपर्यंत म्युनिसिपालिटी कडून कांहींच व्यवस्था झाली नाहीं असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. रेसीडेंट साहेबांचे आगतस्वागत करणें, त्यांच्या सन्मानार्थ कमानी उभारणें व त्याच प्रमाणें इतर बडे बडे अधिकारी आले ह्मणजे शहर सफाई ठेवणें व जिकडे तिकडे झक् पक् करून नांव मिळविणें ह्मणजे मोठें शिताफीचें काम आहे असें आह्मी समजत नाहीं. अशा वरपंगी डामडौलाच्या योगानें ऑफिसर लोकांच्या डोळ्यांत माती टाकून म्युनिसिपालिटीची शिफारस होईल व मेंबरांस किताब मिळतील. परंतु लोकांची जबाबदारी अशा गोष्टीनें दूर होणार नाहीं. ती जबाबदारी चांगल्या रीतीनें बजावण्यास फार दक्षतेनें व शहाणपणानें काम केलें पाहिजे.

अकोला म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नाच्या ज्या बाबी आहेत त्यांत पोलीसपट्टी ही सर्वांत मुख्य आहे. परंतु या पट्टीच्या वसुलांत दोन तीन वर्षें फार घोटाळा होऊन म्युनिसिपालिटीस बरीच चट्टी बसली आहे असें आतां समजतें. अद्याप कित्येक लोकांकडून दोन दोन चार चार वर्षांचे पैसे आले नाहींत असें कागदपत्रावरून कळून येते परंतु शोध करितां त्या लोकांपैकीं कित्येकांजवळ पाटलाच्या सहीच्या पावत्या सांपडतात. व कित्येक लोक पावत्या नसून तेही पैसे दिले ह्मणतात व पावत्या होत्या परंतु हरवल्या अशी सबब दाखवितात. कदाचित् त्यांचें हें ह्मणणें खोटें असेल असें आह्मास वाटत नाहीं. कारण म्युनिसिपालिटींत पैसे कोणी दिले व कोणी दिले नाहीं ह्याचा तपास करण्याचा मार्ग जो पर्यंत सांपडत नाहीं तों पर्यंत अमुक मनुष्यांनीं पैसे दिले व अमुकांनीं दिले नाहींत असें म्युनिसिपालिटीस ह्मणतां येणार नाहीं. हा सर्व अपराध म्युनिसिपालिटीचा आहे. एक तर वसूल म्युनिसिपालिटीच्या नौकरानें तोंडांत टाकला असावा किंवा आपल्या हयगयीमुळें पाटलास त्याचा फराळ करण्यास सवड दिली असावी. दोघां शिवाय तिसऱ्याकडे कांहीं अपराध लागूं शकत नाहीं. पाटील आज असा जबाब देत आहे कीं मला वसूल करण्या बद्दल तुह्मी शेकडा कमिशन देत होते व ते कमिशन पैसा वसूल करून देण्या बद्दलचे असल्यामुळें पैसा वसूल करून दिल्या शिवाय कोणी देणार नाहीं. व ज्या अर्थीं मला तुह्मी कमिशन चुकतें दिलें आहे त्या अर्थीं मी तुह्माला पैसा ही चुकता दिला आहे; व खरोखरच जर माझ्या जवळ बाकी राहतां तर तुह्मी मला हिशोब समजून घेतल्या शिवाय कधींच कमिशन दिलें नसतें

टलाच्या ह्मणण्यावरून असें दिसून येतें कीं, पाटलानें हिशेब दिला परंतु म्युनिसिपालिटींत त्याचा दाखला नाहीं, खरें काय असेल तें असो. परंतु एवढें खरें आहे कीं, म्युनिसिपालिटीची या कामांत फार सुस्ती दिसून येते व खरोखरच जर अशी स्थिति असेल तर रावसाहेब देवराव विनायक म्यु. क. चे माजी व्हाईस प्रेसिडेंट यांना हें फार लांछनास्पद आहे. आमची अद्यापपर्यंत अशी समजूत आहे कीं रा. सा. नीं म्युनिसिपालिटीचें काम फार दक्षतेनें व हुशारीनें केलें व त्या प्रमाणें आह्मी त्यांची योग्य प्रसंगीं तारीफही केली आहे व अशीच समजूत आमची कायम राहील असें आह्मी मनापासून इच्छितों. परंतु आमच्या पिशवीलाच जर असें भोंक दिसतें तर इतर मेंबरांना नांवें ठेवण्यापेक्षां आधीं त्यांना दोष देणें भाग पडतें. अद्याप राव साहेब म्यु. पालिटींत आहेत व त्याच प्रमाणें इतर सर्व जुने मेंबर ही म्युनसिपालिटींत आहेत. तर या गोष्टीचा ते फार मेहनतीनें तपास करून सार्वजनिक कामाकडे दुर्लक्ष्य केल्याचा अपवाद आपल्यावर येऊं देणार नाहींत व लोकांची पूर्ण खातरी करून देतील अशी त्यांना आमची सविनय प्रार्थना आहे. अद्याप ह्या प्रकरणाचा निकाल लागला नाहीं. पहावें काय होते. तें.

---

आमच्या कृष्णमुखींतील मुक्ताफळें आमच्या वऱ्हाडीस कां बरें पारखतां आलीं नाहींत! त्याच्या शुद्धतेंत तर कांहीं कमीपणा आला नाहींना? व. स. तील "खरा प्रकार असा आहे" "पोलिसांनीं म्यु. कायद्याचें कलम दाखविलें. कारण त्यांना वाटलें कीं +++ बळकटी येईल" इ. वाक्यें जर शु. व. नें आपल्या ता. ११ जुलैच्या लेखाशीं जुळवून समजून घेण्याच्या इराद्यानें वाचली असती तर सहज कळून आलें असतें कीं मि. भागवत यांनीं तें कलम दाखविलेंही नाहीं व शु. व. ह्मणतो त्या प्रमाणें प्रतिपादनही केलें नाहीं. शु. व. स पाल्हाळिक लिहिल्या शिवाय जर अर्थबोध होत नसेल तर आमची तयारी आहे व आतां तरी अमच्या शुद्धानीं अर्थ समजून घेऊन आपला आक्षेप कितपत शुद्ध आहे हें पहावें.

शु. वऱ्हाडींत लिहिल्या प्रमाणें मि. भागवत यांनीं माजिस्त्रेटास ३४ क. प्रमाणें दावे करण्याचें काम म्यु. क. चें आहे, हें सांगितलेंही नाहीं व दावाही डिस्मिस करविला नाहीं. पुरावा योग्य झाला नाहीं सबब माजिस्त्रेटांनीं आरोपीस दोषमुक्त केलें. माजिस्त्रेटानीं पुराव्यावरून व आरोपीचें घोडें पाहून तें जोरानें पळण्या सारखें नाहीं असें ठरवून जर आरोपीस सोडून दिलें तर तो मुकदमा वकिलानीं डिस्मिस करविला असें ह्मणावें काय? मि. भागवत हे आरोपीचे वकील होते परंतु त्यांनीं शु. व. ह्मणतात त्या प्रमाणें प्रतिपादन केलें नाहीं फक्त पोलिसानीं ३४ कलमांतील "जोरानें हांकणें" ह्या शद्बाचा अर्थ "मनुष्याच्या गती पेक्षां जास्त वेगानें चालणें असा होतो" असें दाखविण्या करितां जेव्हां म्यु. क. च्या कायद्यांतील क १२८ माजिस्त्रेटास दाखविलें त्या वेळेस मि. भागवत इतकें मात्र ह्मणालें कीं ह्या कलमा प्रमाणें प्राशिक्युशन हल्लीं नाहीं, व त्या प्रमाणें प्राशिक्युशन करण्याचा अखत्यारही पण पोलिसाला नाहीं. पोलिसानीं म्यु. कायद्याचें कलम कां दाखविलें व तें दाखविणें कितपत रास्त होतें हें आह्मी मागील अंकीं कळविलेंच आहे. पोलिसानीं आपण होऊन कलम काढून दाखविल्यावर मि. भागवत यांनीं अगदीं स्तब्ध न बसतां वर लिहिल्या प्रमाणें ह्मणणें इतक्या वरून जर "माजिस्त्रेटास व्हाईस चेअरमन एल्. एल्. बी. यांनीं वकिलाच्या नात्यानें ++ असें सांगून मुकद्मा डिस्मिस करविला" असें होत असेल तर मग आमचा वऱ्हाडी ह्मणतो तें शुद्ध खरें.

---

मे. कमिशनर साहेबांच्या तक्त्या वरून कळून येतें कीं सन १८८८ सालीं वनपशूंनीं २४ मनुष्यें व १८५४ गुरें मारलीं व सर्पदंश होऊन २८३ म. व २०६ गुरें मरण पावलीं. ही संख्या मागील सालाशीं ताडून पाहतां यंदा मागील वर्षापेक्षां १०१ मनुष्यें व १०३ जनावरें अधीक मेलीं असें समजतें. मागील सालीं एकंदर २०६ म. व १८५७ गुरें या योगें मेलीं होतीं.

साप व वनपशू मारण्या करितां यंदा अनुक्रमें १४०८६ व ३१९९ रु. बक्षीस देण्यांत आले व यंदा एकंदर ६९७ साप व ३५९ वनपशू मारण्यांत आलीं ह्या संबंधानें अलिशान रेसिडेंट साहेबांचें असें म्हणणें आहे कीं हें सर्व आंकडे चुकीचे असतात. यांत खरें म्हणून कांहींच समजत नाहीं. दुसरें बक्षीस देण्याची रीत असल्या मुळें गारोडी, पारधी वगैरे लोक केवळ हें काम आपले उदर निर्वाहाचें साधन आहे, असें समजतात. तर जंगलांतील सर्प मारण्या बद्दल बक्षीस न देतां फक्त शहरच्या हद्दींत मारण्या बद्दल द्यावें. या संबंधें आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं आंकडे चुकीचे येतात याचें कारण इन्पेक्शन व्हावें तितकें होत नाहीं म्हणून येतात. दुसरें बक्षीस देण्याचा हेतु जर लोकांचें रक्षण व्हावें व सर्प व वनपशू जितके कमी होतील तितके कमी करावे असा आहे तर गांवांतील सर्प कमी झाले काय व जंगलातील कमी झाले काय एकच. खरोखर सर्प दंश होऊन प्राणी मरतात ते गांवापेक्षां जगलांतच फार मरतात व सर्पही जंगलांतच फार असतात.

---

रेलवेवर अपघातः—ता. १७ मिनहू रोजीं रात्रीं सुमारें बारावर दोन वाजतां नागपूरकडे जाणाऱ्या मनुष्याचे गाडीचे सुमारें १५-१६ डबे नांदुरा व जलंब या दोन स्टेशनाच्या मधील रेल रस्त्यावरून खालीं आले. ह्या डब्यापैकीं सहा सात डबे तर रूळापासून सुटून खालीं उतारावरून गरंगळत एका कलावर पडले, त्या मुळें डब्यांतील कंदील फुटले, व त्यांच्या कांचांचे तुकडे अंगास लागून व धक्के बसून सुमारें २९–३० लोकांस बऱ्याच जखमा झाल्या व त्यापैकीं ६–७ मनुष्यें तर फारच घायाळ झालीं आहेत. ह्या एवढ्या भयंकर प्रसंगांत एक ही मनुष्याची प्राण हानि झाली नाहीं असें ऐकतों हें जर खरें असेल तर मोठी खैरच झाली म्हणावयाची. ईश्वरीलीला अगाध आहे. ह्या गाडींतील दुर्दैवी लोकांवर हा दुर्धर प्रसंग येण्याचें कारण तो रस्ता होय. ज्या रस्त्या वरून ही गाडी येत होती तो डबल लाईन करितां नवीन तयार केलेला रस्ता होता. व नेहमीच्या रस्त्याची डबल लाईन करितां डागडुग चालली होती. डब्यांच्या धक्क्या मुळें तारेचे खांब मोडून तारा तुटल्या त्या मुळें लवकर बातमी पोंहोंचून औषध पाणी वगैरेची मदत मिळविण्यास बराच अडथळा आला, तरी पण सात आठ तासांत सर्व तजवीज करण्यांत आली.

---

The Berar Samachar

MONDAY JULY, 22, 1889.

## THE PLEADERS AND OUR NEW HIGH COURT.

A curious question has arisen in connection with the appearance of that section of our pleaders known as 'B' form pleaders in the Court of the Judicial Commissioner as now constituted. We learn that the point was argued before the Judicial Commissioner who having patiently heard both the 'A' and 'B' form pleaders has ruled that the 'B' form pleaders be allowed to plead in his Court pending a referrence in the matter to the Resident. He has also asked both parties to put in written statements of their respective arguments to be forwarded to the Resident. It is a question of privilege and we are glad both parties are so jealous of guarding their rights. We give below the full test of the arguments put in by the 'B' class pleaders on 19th instant; we were unable to get the same put in by 'A' class pleaders before we went to press and are therefore compelled to leave it till our next.

In the Court of the Judicial
Commissioner
H. A. Ds.

In re the status of the pleaders holding certificates in form B.

The pleaders holding certificates in form B most humbly beg to submit the following:—

That according to the certificates in form B under which they plead they have the right to practice in all the courts subordinate to the Court of the Resident which phrase as defined in the rules regulating legal practitioners means "all Civil and Criminal Courts, excepting Revenue Courts and including Courts of Small Causes in the Hyderabad Assigned Districts," Vide Rule 1 Clause (a). They have thus a right to practise in the Court of the Judicial Commissioner as it is a Court which clearly comes within the above definition

2 The A class pleaders, however, would substitute the words "the Court of the Judicial Commissioner" in place of the words "the Court of the Resident" in the above rules under the supposed authority of rule 4 clause (3) of the Hyderabad Assigned Districts Courts law 1889. But that rule necessarily contemplates two things, (1) that the enactment in which such a substitution was to be made should have been first enacted for British India and subsequently made applicable to the Hyderabad Assigned Districts; and (2) that in making such enactments applicable to the Hyderabad Assigned Districts the words "the Court of the Resident at Hyderabad" should have been substituted for the words signifying a "High Court in British India" in the original enactment. Under these circumstances alone could the words "the Court of the Judicial Commissioner" be substituted for the phrase "the Court of the Resident at Hyderabad." But neither of the above conditions is at all satisfied in the case of "the rules regulating legal practitioners;" for first the legal practitioners rules cannot be said to be an enactment originally enacted for British India and subsequently applied to the Hyderabad Assigned Districts, nor again can it possibly be said that the words "the Court of the Resident at Hyderabad" in the legal practitioners rules have been substituted for the words signifying a "High Court in British India" in the original enactment.

It is clear from the above that the rules regulating Legal practitioners are not at all affected by rule 4, clause (3) of the new Hyderabad Assigned Districts Court Law.

3 Again if the words "the Court of the Judicial Commissioner" be substituted for the words "the Court of the Resident" in the certificates the consequence will be that the Courts presided over by the First Assistant Resident at Hyderabad, the Cantonment Magistrate and his assistant in the Secunderabad Cantonment, the Superintendent of the Residency Bazar at Hyderabad and an Attachee to the Resident sitting at Hyderabad, and the Judicial Superintendent of Railways in His Highness the Nizam's Dominions, all these Courts will be declared subordinate to the Court of the Judicial Commissioner which they are clearly not and the pleaders holding certificates in Form A will not be allowed to practice in the Court of the Resident as that Court is neither subordinate to the Court of the Judicial Commissioner nor is it the Court of the Judicial Commissioner Hyderabad Assigned Districts.

4 There is also no reason why the status of the B class pleaders should be affected by the new law. Practically the new law abolished the Court of the Resident as a Court of final appeal for H. A. D. The Judicial Commissioner's Court however as constituted under the new law does almost the same kind of work regarding the first and second appeals as it used to do before the new law came into force. The B class pleaders have been practising in the Court of the Judicial Commissioner and if under the new law the nature of the business in that Court is not altered there is no justification for preventing them from doing the same kind of work which they have hitherto been doing.

5 That it is a general principle of law both Municipal and constitutional that privileges once granted cannot be taken away except for misconduct in the grantees. The C class pleaders have been given and have actually enjoyed the rights of the District pleaders in the Bombay Presidency viz: that of appearing in second appeal upto Rs. 1000, and it is humbly submitted that in the absence of the circumstance of misconduct mentioned above the rights and privileges hitherto enjoyed by them cannot be curtailed.

6 If in contravention of all rules of construction and interpretation of legal enactments the words "Judicial Commissioner" were read as substituted for the word "Resident" the consequence will be that the B class pleaders will be debarred from appearing in all appeals above the value of Rs. 500 and will thereby suffer a reduction of rights amounting to lowering of status which is unprecedented in India and England and subversive of the constitution and tradition of the honorable profession which they follow. To avoid a result so disastrous to their position and interest they humbly submit that they should continue to enjoy the same rights and privileges as they have hitherto done. They speak merely to status quo and have put forth their arguments with due regard to the rights and privileges of the A class

pleaders and have studiously avoided any encroachment thereon.

Owing to the want of timely repairs the Municipal roads are discreditably in a very bad condition. Everywhere heaps of Murrum are allowed to remain to the greatest inconvenience of the people. This evil is more keenly felt at night when the Municipal lamps are either dimly lighted or are not lighted until a late hour of a rainy night. With so many eyes to watch the public conveniences and with a double set of officers and so many under lings to direct and control the Municipal work, the existing mismanagement, one would think very strange and certainly very shameful.!!

With reference to Section 25 of the Berar Municipal Law, 1886, it is hereby notified that Mr. Mahamad Mubarak Alli, Tahsildar, a member of the Municipal committee of Akot, has been elected chairman of the said committee with the approval of the Resident in accordance with the provisions of Section 18 of the Law.

Mr. C. Shamrao, Attache to the Resident, from Secunderabad to Basim.

Mr. Hashmat Ali, Attache, to the Resident, from Basim to Secunderabad.

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. Hyder Ali Khan, Attache to the Resident in the Akola District, to be a Magistrate of the 1st Class in that district.

Mr. Frederick Leslie Crawford a half brother of Mr. Arthur Crawford of the Bombay Civil Service has been appointed an Inspector of Police and posted to Amraoti in room of Mr. A. Priestly, transferred to Budnera as railway Police Inspector. Mr Crawford is a promising young man, and will no doubt be soon pushed up the departmental ladder.

No. 1274 G.—Colonel H. C. A. Szczepanski, Deputy Commissioner of the 1st class in the Hyderabad Assigned Districts, is appointed to officiate as Commissioner of the Hyderabad Assigned Districts, with effect from the date of assuming charge and during the absence on privilege leave of Mr. T. Chichele Plowden, or until further orders.

## ADVERTISEMENT

The following rules framed under sections 41 and 44 of the Berar Municipal Law of 1886 for the imposition and regulation of the Cotton and Grain Market cesses at a special meeting of the Akola Municipal committee held on the 16th of July 1889 have been published for general information previous to sanction.

### COTTON MARKET

Rule I A yard fee of one anna per Boja of Bui and one anna per Khandi of Kapas shall be paid by the seller or the buyer on the seller's account for Cotton brought into the Cotton market at Akola in Berar for sale.

Rule II The fee mentioned in rule (I) shall be collected at the gate of the market by the Cotton Daroga after the sale is effected and when cotton is taken out of the compound of the market.

Provided that when the seller can not find a purchaser in the market he may be allowed on the security of a registered buyer or any other good security to remove his cotton from the compound of the market without paying the yard fee at the gate, but in this case the seller or the buyer on his account shall pay to the Daroga the yard fee as soon as the sale is effected.

Provided that when a registered buyer undertakes to pay the yard fee on behalf of his sellers, he may with the written permission of the Cotton market Committee, be allowed to make monthly payment instead of payment at the gate.

### GRAIN MARKET

Rule 1 A fee of one anna and a half per Khandi of the following kinds of grain viz:-

| | |
|---|---|
| 1 Linseed | 12 Rajgira |
| 2 Wheat | 13 Peas |
| 3 Jawari | 14 Masoor |
| 4 Grain | 15 Kardi |
| 5 Tilseed | 16 Halad |
| 6 Toor | 17 Mahaseed |
| 7 Udida | 18 Cotton seed |
| 8 Mooga | 19 groundnut |
| 9 Lakha | 20 Mustard |
| 10 Myraballams | 21 Methi |
| 11 Bajri | 22 Rice |
| | 23 Dhania |

Shall be paid by the seller or by the buyer on the seller's account on all grain brought into the Grain market at Akola in Berar for wholesale sale.

Rule 11 The fee mentioned in Bule (I) shall be collected daily in the market by the Grain market Daroga.

Provided that a registered buyer who undertakes to pay the fee on behalf of his sellers may with the written permission of the Grain market Committee make monthly payment in the market.

If any person has any objection to the proposed taxes he may, within thirty days from the publication of the notice, submit his objection in writing to the Committee to the address of the undersigned,

Akola Municipal Committee's office. 22nd July 1889

Krishnaji Malhar
Secretary
Municipal Committee
Akola

पोंच.

वाशिमस्थ "क्ष" तुमचें पत्र पावलें स्थलसंकोचास्तव पुढील अंकीं घेऊं.

## वऱ्हाड.

मि० मुबारक अली तहशिलदार अकोट रजेवरून परत येऊन कामावर रुजू झाले.

रा० रा० बाळकृष्ण बळवंत सुळे बि० ए० हे उमरावतीस आपले कामार परत गेले.

सट्टे स्टांप कागदावर लिहावेंत असा ठराव झाला होता ह्मणून सट्टयाचे व्यापारी फार नाखुष झाले होते व हा ठराव रद्द करण्यासाठीं त्यांनीं बरीच खटपट केली. हल्लीं असें कळतें कीं रुई सठ्यास स्टांपांची गरज नाहीं व सट्टे ट्रान्स्फर करण्यासही पावतीच्या तिकिटाची गरज नाहीं असा सरकारनें ठराव केला आहे.

मि. फ्रेडरिक लेली क्राफर्ड मुंबई कडील प्रसिद्ध आर्थर क्राफर्ड ह्यांचे सावत्र बंधु ह्यांस वऱ्हाडांत मि. प्रीस्टली ह्यांच्या जागीं उमरावतीस पोलिस इन्स्पेक्टर नेमलें.

कमेटीची सुस्ती—पावसाळा सुरूं होऊन बरेंच दिवस झालें तरी सडकाची व्यवस्था अजून लागत नाहीं जागजागीं रस्त्यावरून मुरुमाचे व खडीचे ढीग मात्र दृष्टीस पडतात परंतु हे ढीग सडकेवरील चिखल नाहींसा करितात काय? शिवाय हे दिवस पावसाळ्याचे असून ही रात्रीचे नऊ दहा वाजेपर्यंत सुद्धां कंदील लावले जात नाहींत, आणि जे लावले जातात त्यांचा उजेड इतका मोठा असतो कीं ते कंदीलच आहेत असें समजून घेण्यास दुसऱ्या दिव्याची जरूर लागते. तर तरीत असून दुजोऱ्यानें चालणाऱ्या आमच्या कमेटीनें इतका हलगरजी पणा दाखविणें हे फारच शोचनीय होय.

मि. महमद मुबा[illegible] अली अकोटचे तहसिलदार यांस अको[illegible]० कमेटीचे चेअरमन नेमिलें.

मि. शामराव अट्याची यांस सिकंदराबादे हून वाशीमास नेमिले व मि. इसमतअली यांस वाशीमाहून सिकंदराबादेस नेमिले.

सन १८८२ सालचा कायदा दहावा कलम १२, अन्वयें मि. हैदर अली खान अट्याची जिल्हा अकोला यांस पाहिला वर्ग माजिस्ट्रेट नेमिलें.

वऱ्हाडची वकीलीची परीक्षा या वर्षी सप्तेंबर महिन्याच्या पाचव्या तारखेस उमरावतीस घेतली जाईल ह्या परीक्षेस ४९ उमेदवार बसणार आहेत.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, अकोलें म्युनिसिपालिटींतील कॉटन व ग्रेन मार्केट मध्यें आज पावेतों जे कर घेतले जात आहेत तेच चालूं ठेवण्या करितां सन १८८६ च्या नवीन म्युनिसिपल कायद्याचें कलम ४१ व ४४ अन्वयें सरकारची मंजुरात मागणें जरूर आहे ह्मणून तारीख १६ जुलई सन १८८९ रोजीं अकोला म्युनिसिपाल कमिटीच्या स्पेशल कमिटीमध्यें खालीं लिहिलेले नियम पास झाले आहेत ते सर्वांच्या माहिती करितां वर इंग्रजींत प्रसिद्ध केले आहेत व मराठींत ही येथें दिले आहेत. ह्या संबधानें जर कोणाची कांहीं हरकत असेल तर ती त्यानें पाहिजे असल्यास ही जाहिरात प्रसिद्ध झाल्या दिवसा पासून ३० दिवसांच आंत म्युनिसिपाल कमिटीचे आफिसांत आमचेकडे लिहून कळवावी. ह्मणजे तिचा योग्य विचार केला जाईल.

कॉटन मार्केट.

१ अकोलें येथें काटन मार्केट मध्यें विक्री करितां आणलेल्या मालावर रुईच्या दर बोजास एक आणा व कपाशीच्या दर खंडीस एक आणा विकणारा पासून अगर त्याचे तर्फे खरेदी करणारापासून यार्ड फी ह्मणून घेतला जाईल.

सदहू नियम १ यांतमध्यें सांगितलेली फी मालाची विक्री झाल्यावर तो कॉटन मार्केटचे कांपौंडा बाहेर नेला जातांना कॉटन मार्केट दरोगा कॉटन मार्केटच्या दरवाजापाशीं वसूल करील. तथापि जेव्हां विकणारास मार्केटमध्यें खरीददार मिळणार नाहीं तेव्हां त्यास ज्याचें नांव कॉटन मार्केटचें रजिष्टरांत दाखल आहे अशा खरीददाराच्या अथवा दुसऱ्या एखद्या चांगल्या खात्रीवर सदहू फी दरवाजापाशीं न घेतां आपला माल कॉटन मार्केटचें कांपौंडा बाहेर नेण्याची परवानगी देतां येईल. परंतु अशा प्रसंगीं विक्री करणारानें अगर त्याचे तर्फे खरीददारानें त्या मालाची विक्री होतांच सदहू यार्ड फी दरोग्यास दिली पाहिजे.

आणखी; ज्याचें नांव कॉटन मार्केटचें रजिष्टरांत दाखल आहे अशा खरीद दारानें जर आपल्या विक्रीदारांकरितां सदहू यार्ड फी देण्याचें पतकरलें तर कॉटन मार्केट कमिटीच्या लेखी परवानगीनें त्यास दरवाज्यापाशीं फी देण्याचें ऐवजीं ती दर महा देण्याची परवानगी देतां येईल.

ग्रेन मार्केट.

१ अकोलें येथील ग्रेनमार्केटमध्यें ठोक विक्री करितां आणिलेल्या खालीं लिहिलेल्या जातीच्या व इतर सर्व धान्यांवर दर खंडीस दीड आण्या प्रमाणें विकणारा पासून अगर त्याचें तर्फे खरीददारापासून फी घेतली जाईल.

| | | |
|---|---|---|
| १ जवस. | ८ मूग. | १५ करडी. |
| २ गहूं. | ९ लाख | १६ हळद. |
| ३ ज्वारी. | १० हिरडे. | १७ ढोळंची |
| ४ हरभरे | ११ बाजरी. | १८ सरकी. |
| ५ तीळ | १२ राजगिरा | १९ भुईमुग |
| ६ उडीद | १३ वाटाणें. | २० मोहरी. |
| ७ तूर. | १४ मसूर. | २१ मेथी. |
| २२ तांदुळ | | २३ धणें. |

२ नियम १ मध्यें सांगितलेली फी ग्रेन मार्केट मध्यें ग्रेन मार्केट दरोगा रोज वसूल करील. तथापि ज्याचें नांव ग्रेन मार्केटचें रजिष्टरांत दाखल झालें आहे त्यानें आपले विक्रीदारां करितां सदहू फी देण्याचे पत्करलें असतां त्यास ग्रेन मार्केट कमिटीच्या लेखी परवानगीनें दररोज फी देण्याचे ऐवजीं दरमहा फी देण्याची परवानगी देतां येईल.

आकोलें तारीख २२ जुलई सन १८८९ इ.

कृष्णाजी मल्हार सेक्रेटरी
म्युनसिपाल कमिटी
अकोलें.

मागाहून आलेली नोटीस

बळवंतराव यशवंतराव देशमुख तर्फे सस्ती यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही वैदर्भ पत्रांतन नोटीस दिली ती पावली तिचें उत्तर.

आमचे येथें यशवंतराव भगवंतराव देशमुख वगैरे बद्दलचा निमे[illegible] रुसमाबद्दलचा पैसा जमा असून आह्मी सावकाराचे दुकानावर ठेविला आहे तो तुम्ही येऊन रीतीप्रमाणे रसीद देऊन घेऊन जावें जर तुह्मी रीती प्रमाणें रसीद न द्याल व पैसा न न्याल आणि विनाकारण दिवाणींत दावा कराल तर आह्मी दिवाणी खर्च देणार नाहीं तो तुह्मास द्यावा लागेल करितां ही नोटीस पावतांच तुह्मी येऊन रसीद लिहून पैसा घेऊन जावा. कळावें तारीख २१ –७–८९ इ०

(सही.)
दवलतराव फत्तेसिंग देशमुख
ता. बाळापुर द. खु.

## वर्तमानसार.

रेवा संस्थानच्या राण्या व त्यांचीं दुःखें

रेवा संस्थानाच्या राण्यानीं आपलें संस्थान आपणास परत मिळावें ह्मणून व्हाइसराय साहेबाकडे एक अर्ज पाठविला आहे. हा अर्ज वाचून पाहिला असतां रेवा संस्थानच्या राण्यास सरकाराकडून कांहीं कामांत विशेष तऱ्हेचा जाच सोसावा लागला आहे असें होतें. या संस्थानचा महाराज हल्लीं मरण पावला आहे. या महाराजानें जिवंतपणीं इंग्रज सरकारापासून बरेच पैसे उसनें घेतले होते व त्या पैशाची फेड होईपर्यंत त्या महाराजानें आपल्या संस्थानचा सर्व राज्य कारभार इंग्रज सरकारच्या स्वाधीन केला होता. ज्या वेळीं हें संस्थान या सरकारच्या स्वाधीन केलें त्यावेळीं संस्थानचा सर्व खर्च भागून चार लाख रुपये शिल्लक राहात होती आणि इतकी शिल्लक राहिल्यामुळें इंग्रज सरकारचें कर्ज फारच थोड्या मुदतींत फेडण्यांत आलें. तुमचा अधिकार, जाहागीर व इतमाम आमच्या हातून उत्तम रीतीनें ठेवण्यांत येईल अशीं त्या वेळच्या पॉलिटिकल एजंटानें राण्यास अभिवचनें दिलीं आहेत. पण खरी स्थिती कांहीं निराळीच झाली. या राण्यास महाराजांची भेट घेण्याची परवानगी नव्हती( ! ) तसेंच राहाण्यासाठीं त्यांनीं राजवाडाही उपयोगांत आणूं नये असाही हुकूम सुटला होता. अमुक मुदत पर्यंतच तुमच्या स्वाधीन राज्यकारभार दिला आहे अशा प्रकारचा कांहीं करार झाला आहे असें राण्यांचें ह्मणणें आहे. रेवा संस्थानचे महाराज मेल्या बरोबर तर आमच्या सरकारच्या आंगांत जास्तच स्फुरण आलें. या संस्थानांत नामधारी कौन्सिल आहे पण त्या कौन्सिलास राज्यकारभारांत हात घालण्याची मुळींच परवानगी नाहीं. राण्या व अज्ञान महाराज यांच्याबद्दल ज्या ज्या वेळीं प्रश्न निघेल त्या वेळीं मात्र या कौन्सिलास आपलें मत देण्याचा अधिकार आहे. नेटीव संस्थानांत युरोपियन कारभार शिरला ह्मणजे त्या संस्थानास उतरती कळा लागलीच असें समजावें. महाराज ज्या वेळीं वारले त्यावेळीं संस्थानच्या खजिन्यांत रिझर्व फंड ह्मणून १३ लाख रुपये होते. पण आतां हे सर्व रुपये नाहींसे झाले आहेत. या साठीं ग्वालेर सारखी व्यवस्था करावी अशी आमची सरकारास शिफारास आहे.

भिकेची हुंडी शिक्याला चढावयाची नाहीं असें ह्मणतात तें खोटें नव्हे, अबदुलहक गृहस्थ पूर्वीं कोण होता व कोणच्या स्थितींत होता हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेल. नंतर तो अतीशय मोठ्या योग्यतेस चढला व आतां पुन्हां खालावला. २४ लाखाचे भाग अबदुल हकानें मध्येंच बळकावले असें समजून ते परत घेण्याकरतां अबदुल हकानें मुंबईची आपली सर्व इस्टेट निझामास गहाण लाऊन दिली आहे व शिवाय चार लाख रुपये त्याच वेळीं भरण्यांत आले. आतां असा प्रश्न पुढें आला आहे कीं अबदुल हकानें जे हे २४ लाखाचे भाग विकत घेतले ते निझाच्या चाकरींत असतांना घेतले ते निझामाच्या चाकरींत असतांना घेतले. त्या अर्थीं ते निझामाचेच आहेत ह्मणजे अबदुल हकाची जिनगी जाऊन पुन्हां भाग नाहींत ते नाहींतच या कायद्याच्या प्रश्नाचा निकाल हाय कोर्टांत लवकरच लागेल असें आतां बाहेर आलें आहे. नशीब बिचाऱ्या अबदुल हकाचें. ठा०अ०

झांझिबार येथें लढाई होण्याचीं चिन्हें दिसत आहेत

रोमेलियन रेल्वे एका कंपनीच्या स्वाधीन करण्याच्या बेतांत टर्की आहे पण हा बेत बलगेरियास कबूल नाहीं. या कृत्यामुळें टर्की व बलगेरिया यांच्यांत जास्त द्वेषभाव वाढत आहे.

काश्मीरचा उत्तर रस्ता पहाण्याकरतां एक गोरा कामदार लवकरच तिकडे जाणार आहे.

सिंधु नदीला अतीशय पाणी आलें आहे ह्मणून नोर्थवेस्ट रेल्वेला धोका येण्याचा संभव आहे.

विलिमोरा येथें एक विषाची विहीर सापडली आहे ह्मणजे या विहिरींत विषारी हवा आहे. आपला पोहोरा पडला ह्मणून प्रथम एक माळी त्या विहिरींत उतरला तो लागलाच पडला त्याला काढण्यासाठीं दुसरा पाशीं उतरला तोंही मेला व दोघांस काडण्यासाटीं तिसरा उतरला तोही मेला. आतां त्या विहिरीत कोणी उतरत नाहीं.

क्राफर्ड प्रकर्ण मामलेदारांसच भोवून राहत नाहीं. त्या प्रकरणांत एक संस्थानिक हुकमतीस आचवणार, व ते संस्थानिक बहुधा भोरचे पंत सचीव असतील असें सातारच्या पत्रांवरून समजतें. होईल तें थोडेच.

न्यूयार्कमध्ये एक जगडव्याळ देऊळ बांधणार आहेत. याचा नकाशा तयार करण्यास ८२ इंजिनीअर नेमिले आहेत.

अफ्रिकेंत वर्षांत ४००००० लोक गुलाम केले जातात. आणि इतके धरण्यांत २००००० इतक्यांची कत्तल उडते.

कानडादेशांतील एक फ्रेंच स्त्री आज ८ वर्षें पाण्यावर आहे.

स्विझर्लंड देशांत एक रेलवे समुद्राचे सपाटी पासून ६७२४ फूट उंच आहे.

क्रीट नावाच्या बेटांत पुन्हां दंगा सुरू झाला आहे.

न्याटांग येथें युरोपियन लष्करांत वाखा उठला आहे. ठा०

वर्ल्ड पत्रावरून असें कळतें कीं, ड्युक आफ पोर्टलंड आपली सर्व संपत्ति गोर गरीबा करितां वाटून टाकणार आहेत, ह्या कामास त्यांच्या बायकोचें ही अनुमोदन आहे असें समजतें.

जे जे पार्लमेंटचे मेंबर्स हिंदुस्थानच्या वाईट चाली बंद करण्यास झटत आहेत त्यांचे आभार मानण्या करतां अलाहाबादेस नुकतीच एक सभा भरली होती. अध्यक्ष स्थानीं मि. जे. इ. हावर्ड हे होते.

शिकंदराबाद येथें अलिगोड नांवाच्या एका युरोपियन शिपायानें जाफरखान नांवाच्या एका मुसलमान भिस्तीस ठार मारलें.

येत्या ओरिएंटल कांग्रेसला गायकवाड सरकारांनीं आपल्या खर्चानें रा. ब. ध्रुव आमरेलीचे सेशन जज्ज ह्यास दरमहा ४०० रु. पगार व वाटखर्चा करतां ३०० रु. देऊन स्टॉक होम येथें पाठविलें.

प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर हे येत्या नव्हेंबर मध्यें मुंबईस येणार,

सुरत रिलिफफंडां करितां १३५०९ रु. आजपर्यंत जमले आहेत.

जपान मध्यें एक ज्वालामुखी पर्वत फुटून त्याच्या खालीं ३०० घरांचा चुराडा झाला. व १७० मनुष्यें मेलीं.

जपानच्या महाराणीनें जपानी स्त्रिया करितां एक कालेज बांधलें आहे त्याची व्यवस्था २ अमेरिकन, २इंग्लिश, १ फ्रेंच व १ जर्मन अशा बायकांच्या कमिटीकडे आहे.

मध्य एशियांत रशियन लोकांच्या आगगाड्या सुरू झाल्या कारणानें इंग्लिश व्यापाऱ्यांचा माल खपत नाहीं.

मि. ओमानी, क्राफर्ड प्रकरणांतील मुख्य पोलीस ऑफिसर, यांनीं मुंबई सरकारास कांहीं गुप्त गोष्टी बद्दल एक पत्र लिहिलें आहे त्यांत क्राफर्ड खटल्याच्या संबंधानें पुरावा न मिळण्याविषयीं कोण कोण खटपट करीत होते त्यांचीं नांवें दिलीं आहेत पुण्यांतील सार्वजनिक सभेवरही त्यांनीं थोडासा दोषारोप केला आहे.

रुमेनियाच्या जवळपास रशियाचा विशेष धामधुम चालली आहे.

अमेरिकेंत एक नवीन यंत्र शोधून काढलें आहे त्याच्या योगानें दर मिनिटांस १२,००० खिळे पाडता येतात.

क्रीटमध्यें लोकांनीं कर देण्याचें नाकारलें ह्मणून सुलतान तिकडे फौज पाठवीत आहेत.

काश्मीरांत इंग्लिश लोकांची कालनी करावी असें सर लेपेल ग्रिफिनचें म्हणणें आहे. सु० प०

इराणचेराजे शहा हे इंग्लंडास जाऊन तेथें त्यांचा जावया पेक्षांही मोठ्या थाटाचा सन्मान चालला आहे.

इराणांत रशियाचें अतीशय वजन बसलें आहे, आगगाडी सारखीं कामें इराणांत करण्याचें काम शहा याणी रशियन कंपन्यांत दिलें आहे, रशियाचा व्यापार इराणांत अतिशय वाढला आहे. इराणच्या दोनतीन बाजूनीं रशियाचें राज्य स्थापित झाल्यामुळें बहुतेक इराणदेश रशियाच्या मूटींत गेल्या सारखा झाला आहे. हें इंग्लिशांस पाहवत नाहीं. इंग्रज हे बनिया आहेत त्या मुळें पृथ्वीवर व्यापार संबंधांत आपल्या शिवाय दुसऱ्या कोणाचा हात शिरूं नये असें त्यांस वाटतें. दुसरें इराणांतून रशियास हिंदुस्थानाकडे येण्यास वाट आहे तो इराणानें देऊं नये आगगाड्या तयार करणें, खाणीं खणणें, असे जे कारखाने आहेत त्यांचा सगळा हक इंग्रज कंपन्यांस मिळावा असा इंग्रजाचा इरादा असल्यामुळें हें सगळें शहाचें आर्जव चाललें आहे. व्यापाराच्या योगें एकदां चंचुप्रवेश झाला म्हणजे पुढें इंग्रजलोक हातपाय कसे पसरतात ह्याचा अनुभव आम्हा हिंदुस्थानवाशी यांस फारनामी आला आहे.

मु० सु०

सरकारचा वटहुकूम—सनदी गडकरी यांजकडे निमजुडीनें चाललेलीं इनामें सन १८५९ सालचे हिशेबी जो वहिवाटदार दाखल आहे त्याचे सरळ वारस पुरुष संतती कडे व ५९ सालचे वहिवाटदाराचे सख्खे भावाकडे व वहिवाटदाराचा दत्तक याजकडे मात्र चालविलीं जातील. वहिवाटदाराची बायको, सून व चुलत भाऊ अशा वारसां कडे चालविलीं जाणार नाहींत. तसेंच सदरहू इनामें ५९ सालचे वहिवाटदारांनीं अगर त्याचे वारसान कोणास गहाण, खरेदी किंवा बक्षीस दिलीं असतील तर त्यांजकडे अगर सदर्हू इनामें दिवाणी कोर्टाचे डिक्री वरून ज्याचे कबजांत असतील त्यांजकडे ही न चालवितां खालसा केलीं जातील म्हणून सरकारचे ठरावा वरून जिल्ह्यांतून तालुक्यानिहाय वट हुकूम होऊन तशा इनामाची चौकशी जारीनें चालू आहे. या वटहुकुमांतील शद्बांच्या अर्था वरून सदरील इनामां विषयीं सरकारचा इरादा कसा आहे हे सर्वांनीं ताडलेंच असेल सनदी गडकरी लोकांचें उपकार जाणून मागें सरकारानें ज्या शर्तींवर त्यांनां हीं इनामें करून दिलीं त्या शर्ती किंवा देणगीचा उद्देश हल्लींच्या सरकारास मान्य नाहीं असें स्पष्ट दिसतें. ह्या नवीन वट हुकुमाच्या योगानें कित्येक सनदी गडकरी लोकांचें मोठें नुकसान होणार आहे, हें कोणास सांगणें नकोच. वटहुकुमांतील अर्था प्रमाणें व्यवस्था झाल्यास सरकारानें हजारो रुपयांचें व निरंतरचें उत्पन्न नवीन संपादन केलें असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. फायद्याची बाजू दिसली म्हणजे सरकारचे डोळे दिपून जातात, कान बहीर होतात, विचार शक्ति नाहींशी होते. अशा स्थितींत सदरील वटहुकुमा प्रमाणें सरकारांतून अम्मल होणार नाहीं असा रामबाण उपचार कोणी शोधून काढीलतर त्याची धन्य खरी. शु० सू०

मध्यप्रांतांत १८८८ सालीं २,९३,०६१ मनुष्यें मेलीं व ३,६६,०५० जन्मलीं

हिंदुस्थानांतील गरीब लोकांकरितां कायदा झाला पाहिजे असें कित्येकांचें ह्मणणें आहे.

सिंधप्रांतीं मालाची आगडी चालली असतां तींतून गव्हांचीं पोतीं चोरीस गेलीं. के०

तुर्कस्थानांत महामारीचा उपद्रव सुरू झाला आहे. व त्यामुळें तुर्कस्थाच्या बंदरीं गलबतांची खोटी करण्याबद्दलचा सक्त ठराव झाला आहे. ता० १३ जुलैची कान्स्ट्यांटिनोपलची तार.

अपूर्व बनावट.— तुरुंगांतील कैदी आपल्या तुरुंगाधिपतीच्या सह्या व त्यांचे लेखासारखे लेख इतके हुबेहूब करीत असलेले नुक्तेच आढळले आहेत कीं, ज्यांच्या सह्यां खालीं ते लेख लिहिलेले पकडले आहेत त्या तुरुंगांवरील अधिकाऱ्यांना सुद्धां ते लेख आपल्या हातचे नव्हेत व त्या सह्या आपल्या नाहींत असें ह्मणतां येत नाहीं! आणि असें बनावट दस्तैवज तयार करण्यांत दुसरा एक असा चमत्कार आहे कीं, त्या बनावटी करणाऱ्या कैद्यांना ती भाषा लिहितां वाचतां येत नाहीं व समजतही नाहीं! ह्यावरून हे बनावटीचे कसब अज्जब आहे असें ह्मणावें लागतें! ज्ञा० च०

शेंपटाचा मनुष्य.—आफ्रिकेंत एका मनुष्याला दहा इंच लांबीचें शेंपुट आहे व त्यांत हाडें मुळींच नाहींत असें समजतें.

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

रुपये ७१ प्रमाणें देत जावें. असें न केल्यास तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करून या नोटिशी खर्ची सुद्धां वर लिहिलेली रक्कम घेतली जाईल कळावें. तारीख २६ माहे जुलै सन १८८९ इसवी.

सही

सुंदराबाई जवजे नागयणपंत देशपांडे कुळकर्णी हिच्या हातची नांगडी असे.


CALCUTTA ART STUDIO

185 BOWBAZAR STREET.

**PICTURES PICTURES PICTURES**

PUBLISHED FROM THE FAMOUS
CALCUTTA ART STUDIO

About 200 sorts of beautifully colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festival.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy and Lady Lansdowne.

Every facility would be afforded to mofussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a mere nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO
185 Bowbazar Street.
CALCUTTA.

N. BISWAS.
Manager

" TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 6 Old Court House street, Calcutta.


## गृहिणी

( कुलवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचें आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांची चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवणकाम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईंत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल हं. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,

## गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते-परम्याचा रोग उत्पन्न होतो शरीराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, ढेकरा होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

K. B. Rele and co.s' most efficacious.
PREPARATIONS.

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेला क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्त्रीतीध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतुस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनचूक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितीही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हे ही परम्यावर रामबाण आहे. किं० ८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाव इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचूक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जातो, क्षयचा, डांग्या वगैरेंत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अगदी बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागतें अन्न पचतें किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यात हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटं मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास आनंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेली सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पूर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरीं इंग्रजी औषधें जसें, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, बाऱ्याचीं तेलें मलम, साबु, पोव्हडर, टिंकचर्स, सल्ट्स, इनोज, फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांची व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नादार पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
ज्युबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणारांकडे व मालकाकडे मिळतील.

मुक्काम वाशिम ता० २२–७–८९ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ० सा० न० वि० वि० पावसानें झडी लाविली आहे. आजपर्यंत सुमारें १३—१४ इंच पाऊस पडला असें ह्मणतात. पिकांचा धजाव उत्तम आहे. पर्जन्य पडण्यास प्रारंभ झाल्या पासून आजपर्यंत उत्तम वृष्टी होत आहे. परंतु जन अरोग्यता चांगली नाहीं. महामारीचा क्रम सुरूं आहे. यामुळें लोक चिंताग्रस्त झाले आहेत. ईश्वर कधीं कृपा करील व त्या बाईची स्वारी कधीं अदृश्य होईल तो सुदीन. सध्यां चिंताकुलित होऊन कांहीं सुचेनासें झाल्यामुळें सर्व गांवास उदासीन स्थिति प्राप्त झाली आहे. संकट समयीं मनुष्य किती ही नास्तिक असले तरी त्याला देवच आठवतो. त्याच्या नास्तिक भावाचा लोप होतो. व तोच देव देव करीत फिरूं लागतो. एकूण संकटें येतात तीं मनुष्याला कुमार्गांतून काढून सुमार्गास लावण्या करितां येतात असेंच ह्मटलें पाहिजे. जेव्हां मृत्यूचा तोबा डोकीवर बसत चालला तेव्हां लोकांचे डोळे उघडूं लागले. या गांवीं ब्राह्मण लोकांचा समुदाय बराच आहे. या ब्रह्मवृंदामध्यें वेदशास्त्रसंपन्न प्रल्हाद अण्णा व साधुमार्गगामी जैकृष्णबाबा अशा उभय मूर्ति फार तेजःपुंज आहेत. ज्या गोष्टी मनांत आणतील त्या करण्याची शक्ति उभयतां मध्यें पूर्णपणें आहे. बहुधा सर्व लोक या उभयतांना मनापासून मान देतात असें असतां महामारीरूप जो विपत्तिकाल प्राप्त झाला त्या कालाला टक्कर देऊन मागें हटविण्या करितां कांहीं तरी ईश्वरसेवा करण्याचा मार्ग योजण्याचें जें कर्तव्यकर्म तें करण्याविषयीं उभय मूर्ति कशा पराङ्मुख होतात कोणजाणें!! या गांवीं श्री बाला साहेब व श्री करुणेश्वर हीं जाज्वल्य दैवतें आहेत. सर्व हिंदुधर्मानुयायी लोकांनीं संकट समयीं या देवतांची सेवा ह्मणजे भजन, पुजन, सप्ता अभिषेक वगैरे करून आलेलें संकट टाळावयाचें परंतु सदरहु उभय मूर्ति पैकीं जर कोणी पुढें सरसावेल तर असा स्तुत्य उद्योग सिद्धीस जाण्यास वेळ लागेल असें नाहीं. परंतु परमार्थ कामीं देह जो झिजवील तो खरा साधु. असो. या कामीं ब्रह्मवृंदामध्यें सिथलता आहे हें पाहून पाटील व पांडे यांणीं कंबरा बांधून सर्व गांवांत कांहीं पैसे जमा करून श्री चामुंडा देवीच्या प्रीत्यर्थ आलेल्या विघ्न शमनार्थ कांहीं कालरीनीं गांवांत मिरवणूक काढिली. हेले व बकरे मारून मरीला शिवेच्या बाहेर पोंचविलें. व श्री चामुंडा देवी एका धनगर भक्तांचे अंगांत येऊन मी आतां तृप्त झालें असें सांगितलें व आतां मी येथून जातें असें ही ह्मणाली. आतां पहावें पुढें काय होतें तें. परंतु ही मिरवणूक काढण्याचें कामीं मोठें एक विघ्न आलें होतें तें असें कीं, येथील सिव्हिल सर्जन मि० जोन्स साहेब बहादुर यांणीं असें फर्माविलें होतें कीं, ही मिरवणूक काढूं नये. परंतु हें प्रकरण मे. डे. कमिशनर साहेब बहादुर नबाब यासीनखा यांजकडे गेलें तेव्हां त्यांनीं मोठ्या शहाणपणानें व न्यायानें असा हुकूम केला कीं ही बाब हिंदुधर्माची असल्या मुळें यांत आह्मी हात घालीत नाहीं. हीच गोष्ट मि० जोन्स सा० यांस कळली पाहिजे होती परंतु त्यांचे समजांतून कशी गेली कोणजाणें. एकूण नबाब साहेबांनी मोठा न्याय केला. नाहीं तर काय देवाची सेवा करण्याचे कामीं ही अडथळा येत होता. एकूण पराधीन जिणें व पुस्तकी विद्या ही जी म्हण आहे खरोखर मोठी कठीण आहे.

मे० यासीनखान सा० यांची बदली डे. क. चे कामाची मुदत भरली. मे० मॉरिस सा० ब० येथें ता० २२-७-८९ इ० रोजीं आले आतां त्यांची कारकीर्द कशी काय होते पहावें. नबाब यासीनखान यांनीं सुमारें एक महिना काम केलें. तें उत्तम प्रकारें करून सर्वांना ते प्रिय झाले होते. नेटिव लोक अशीं मोठीं कामें करण्यांस अगदीं योग्य आहे असें म्हणण्यास अगदीं हरकत नाहीं. मात्र त्यांचेवर विश्वास ठेऊन त्यांना कामें दिलीं पाहिजेत. ह्मणजे त्यांची योग्यता कळून येते. नुसतें त्यांना कामें करितां येणार नाहींत असें ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

मिस्तर हशमत अली अस्चाची यांनीं आपलें सामानसुमान विकण्याची तयारी चालविली आहे. कोणी ह्मणतात ते हैद्राबादेकडे जात आहेत. ते पुन्हां परत येणार नाहींत व त्यांचे जागीं हैद्राबादेहून शामराव नांवाचे गृहस्थ यावयाचे आहेत. खरें काय असेल तें असो. परंतु अली सा० वऱ्हाडाला लवकर कंटाळून चिंचेचें सार खाण्याचे मुलखांत का जातात. याचें कांहींच कारण समजत नाहीं. परंतु कोणी अशी गप्प मारतात कीं या अली साहेबाचपानें कांहीं काम झेपत नाहीं. यांचें इंग्रजी ज्ञान कोतें आहे ह्मणजे यांच्यानें इंग्रजींत सुबोध असें प्रॉसिडिंग लिहिवत नाहीं. सबब यांनीं मराठींत लिहीत जावें असा यांना मि. ऑवर्ड साहेब मागील अॅक्टिंग डेप्युटी कमिशनर यांनीं हुकूम दिला आहे. असें ह्मणतात कसें ही धरून चाललें तरी इतकें खास आहे कीं कांहीं तरीं कमीपणा असावा असा तर्क आहे. ज्या वेळीं अस्चाचीची योजना करितात तेव्हां योग्य मनुष्य पाहूनच नेमणूक केल्यास असे प्रकार घडणार नाहींत. मागें अकोल्यास इसाजुनहक ह्मणून कोणी बडेबापके बेटे अस्चाची बनून आले होते. परंतु अखेर त्यांची परिक्षा पास झाली नाहीं. तेव्हां त्यांना नोकरी सोडून जावें लागलें. अस्चाचीचा पुढें अ. कमिशनर व्हावयाचा व पुढें त्यांचे हातून मोठमोठीं कामें व्हावयाचीं तेव्हां अस्चाचीची जागा विद्वान मनुष्यालाच पाहिजे.

ता. १६।१७ रोजीं एक कैदी पळाला. त्याची असी हकीकत सांगतात कीं १०।११ कैदी कामावर घेऊन एक जेलचा शिपाई गेला होता. कामावर गेल्यावर त्या शिपायास झोंप लागल्यामुळें सर्व कैदीही निजले अशा संधीस एकानें पलायन केलें. शिपाई निजून उठल्यावर कैदी घेऊन परत आला. जेलांत घालण्या वेळेस एक कैदी कमी भरला तेव्हां परत त्याचा तपास लागला नाहीं. पुढें समजल्यावर त्याची तपास धूस झाली परंतु त्याचा पत्ता लागला नाहीं. अर्थात या मुली प्रमाणें त्याची चौकशी व तपास सुरू आहे. या बद्दल जेलच्या शिपायावर मुकद्दमा चालला आहे असें ह्मणतात. पुढें पहावें कोणाचें नशीबीं प्रायश्चित्त येतें तें. मात्र इतकें खरें आहे कीं या कामांत मि० त्र्यंबकराव जेलर साहेब यांची चुकी अगर हयगय मुळींच नाहीं. नेहमीं प्रमाणें त्यांणीं आपलें कर्तव्यकर्म बजाविलें. मात्र शिपायाच्या सुस्तीनें असें झालें असा सर्वत्र लोकांचा ग्रह आहे. ईश्वर करो व कोणावर संकट न येवो. कळावें हे विनंती.

आपला
"प्रेमेच्छु"

---

नोटीस.

गजाधर श्रीधर जाहागिरदार राहणार रदाउर तहशील पिपली, जिल्हा अंबाला यास नोटीस देणार इंद्राबाई जवजे मुरलीधर जाहागिरदार राहाणार अडगांव खुर्द जिल्हा अकोला वऱ्हाड. नोटिसीनें असें कळविलें जातें कीं तुम्हीं आमच्या जाहागिरीचे इनामाचें काम अदमासें वर्षे १६ पाहात आहा त्यांत आज आदमासें नऊ वर्षांचा पैसा तुम्ही हिशोबा प्रमाणें बरोबर देत नाहीं. व सन १८८८ इसवी सालचा पैसा कांहींच तुम्हीं दिला नाहीं. याज करितां तुम्हांस ही नोटीस देऊन असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून एक महिन्यांत आमचा सर्व पैसा हिशोबा प्रमाणें बरोबर देऊन निकाल करावा. असें न केल्यास सदरहू रुपये व्याज लाऊन या नोटिशीचे खर्चासुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें सर्व रीतीप्रमाणें काम चालवून भरून घेतलें जाईल म्हणून दिली नोटीस सही ता. २७ माहे जुलई सन १८८९ इ.

सही.

सहीची निशाणी. इंद्राबाई जवजे
मुरलीधर जाहागिरदार यांच्या हातची असे.

---

नोटीस.

रा. रा. मारुती गोपाळ देशपांडे कुळकर्णी राहाणार कसबे कुरणखेड ता. अकोलें यांस. खालीं सही करणार राहाणार कसबे कुरणखेड ता. व जि. अकोलें हल्लीं वस्ती नेरगांव खुर्द परगणें कुरणखेड तालुके अकोलें इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे साक्षात भाउजी ह्मणजे माझे भ्रताराचे वडील बंधु आहांत, आणि आपली वडिलार्जित सर्व मिळकत तुमचे स्वाधीन आहे. माझा नवरा मरण पावले दिवसा पासून मी आपले आप्त वर्गाचे घरीं राहून गुजरान केली. अलीकडेस दोन वर्षांपासून आप्तवर्गाचें घरीं सोय न बनल्यामुळें लोकांचें कर्ज काढून उदरनिर्वाह केला. तरी आपण माझे अन्नवस्त्राची कांहीं सोय केली नाहीं. याजबद्दल मी तुम्हांस बरेंच वेळ ह्मटलें असून आपण माझे गोष्टीवर लक्ष दिलें नाहीं; सबब आतां तुह्मांस असें कळविण्यांत येतें कीं आपली वडिलार्जित समाईक इस्टेट असून तिजवर माझा हक्क हिंदुधर्मशास्त्रा प्रमाणें पोंचत आहे. यास्तव आपण ही नोटिस पावले दिवसां पासून १५ दिवसांचे आंत मजकडेस लोकांचे मागील दोन वर्षांचें चढलेले कर्जाची फेडगी बद्दल रक्कम रुपये १५० एकशें पन्नास व चालू साला करितां रुपये ७५ पंचाहात्तर. एकूण रुपये २२५ असे सव्वा दोनशें रुपये देऊन माझी पावती घ्यावी व पुढें दर वर्षी

किरकोळ अकास.....................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements'
Below 10 lines...2R
per line over10... 4a
Repetition per line 3a.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 29 JULY 1889 | NO. 29

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २९ माहे जूलै सन १८८९ इ० | अंक २९

नमुना (जी)

नादारीच्या ठरावाची सावकारास नोटीस देणें तिचा नमुना.

पंजाब नादारी मुकदमा नंबर १८८९

विद्यमान आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर साहेब कोर्ट जिल्हे बुलडाणें यांचे नादारी कोर्टांत.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं अर्जदार माधव भट्ट बीन दिवाकर भट्ट ब्राह्मण रहाणार कसबे लोणार तालुके मेहेकर जिल्हे बुलडाणें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे. आणि तारीख ९ माहे आगष्ट सन १८८९ इसवी हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नमूद करावीं, ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या जुडिशियल ऑफिसरा पुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टरीं दाखल होतील. कळावें तारीख ८ माहे जून सन १८८९ इसवी.

Atmaram Bhicagi.
नादारी कोर्टाचे जज्ज.

---

नोटीस

निजामउद्दीन वलद ढोलन मिरजा मुसलमान पाटील वस्ती हसनपूर ता० जळगांव यांस गुलाबचंद ईश्वरदास साहू दुकान धानोरें ता० जळगांव यांजकडुन नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कडे खातिबाकी व सालबंदी इतर दुसरे दस्तऐवज वगैरे मिळून ९००० नऊहजार रु० घेणें निघत आहेत बाकीचा हिशोब करीत नाहीं व रुपये ही आदा करीत नाहीं तर ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आमचे दुकानीं येऊन हिशोब करावा. याप्रमाणें न केलें तर रीतीप्रमाणें दावा केला जाईल.त्यातच या नोटिसीचा खर्च ही आकारला जाईल. कळावें ता० २३ माहे जुलै सन १८८९ इ०

(सही)
गुलाबचंद ईश्वरदास मारवडी साहू
दुकान धानोरे ता० जळगांव

---

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

चिखलदरा ता० २१—७—८९

हतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० चार पांच दिवसां पासून पाऊस बंद झाला कीं बुधवारीं वारा एकसारखा जोरानें सुरू होतो. ह्या दिवसांत येथील खरें स्वरूप नजरेस येतें. उन्हाळ्यांत कित्येक अधिकारी हवा खाण्यास येथें येतात व दोन तीन पाऊस जारानें पडले म्हणजे स्वस्थानाप्रत जातात. पावसाळ्यांत नेहमींच्या रहाणाऱ्या सरकारी नोकरांना मात्र अनेक तऱ्हेचीं संकटें भोगावीं लागतात. नशीब बिचाऱ्यांचें. असें समजण्यांत आलें आहे कीं मेळघाटांतील पोलीस लोकांची बदली तीन महिन्यांनीं होत जाईल. असाच हुकूम सर्व खात्यांत झाल्यास गरीब नौकरांना फायदेशीर होईल. येथें दवाखाना आहे. रोगी फार थोडे येतात. दवाखान्याचा वास्तविक उपयोग येथें चार महिने उन्हाळ्यांत चांगला होतो. येथील डाक्टर मि० महंमद अब्दुल रझाक हे लोकप्रिय व दयाळू आहेत. यांना येथें येण्यास सुमारें वर्ष सव्वा वर्ष झालें. अलीकडे यांची प्रकृति थोडीशी नादुरुस्त आहे. यांना येथें येऊन बरेंच दिवस झाले आहेत तरी वरिष्ट अधिकारी अशा ठिकाणाहून लवकरच त्यांची बदली करतील असें आम्ही इच्छितों. येथें तार ऑफिस आहे. हें ऑफिस खरोखर पाहिलें असतां उन्हाळ्यांत चार महिने बरें चालतें. आठ महिने येथें म्हणण्यासारखें काम नाहीं. येथील शाळामास्तरास पोट शुळाची व्यथा लागली आहे. त्यांनें बदली विषयीं रिपोर्टही केले आहेत असें ऐकतो तरी आमचे दयाळू डे. इ. साहेब मिस्तर केशव ब्रम्हगिरी पाळेकर हे लवकरच बिचाऱ्याची सुटका करतील अशी आशा आहे. पत्रकर्तेराव, कृपाकरून छापावेंच नीकाय. कळावें लोभ असावा हें विनंती.

आपला एक
"भिक्षुक."

## गोरक्षक मंडळीस सूचना.

रा. रा वऱ्हडसमाचार कर्ते यांसः—

महाराज, या पत्राचे सदरास जे मी लिहिलें आहे त्या वरून हें पत्र मी कोणास उद्देशून लिहीत आहे हें मी आपणांस मुद्दाम सांगितलें पाहिजे असें नाहीं. आपणांस माझी एवढीच विनंती आहे कीं, आपल्या जगमान्य पत्रांत ह्या लेखास जागा द्यावी. म्हणजे माझें हें पत्र त्यांस पोंचविल्याचें श्रेय आपण घेतल्या प्रमाणें होईल, व तितके अंशीं गोरक्षण केल्याचें पुण्य आपल्या पदरीं बांधून घ्याल यांत तिळप्राय ही शंका नाहीं.

आज दिवशीं असंख्य गायी कां मारल्या जातात या प्रश्नाचा विचार मंडळीनें प्रथम केला पाहिजे. माझ्या दृष्टीनें मला असें दिसतें कीं, आह्मी हिंदु लोक फारच गरीब स्थितीस येऊन पोंचल्यामुळें आमच्यानें गाया पाळवत नाहींत व त्या पाळल्या न गेल्यामुळें बाजारांत येतात व बाजारांत आल्यावर ज्यांस त्यांचा उपयोग करून घेतां येतो ते त्या खरेदी करितात म्हणजे खाटीक लोक खरेदी करतात. व त्या मारून मांसविक्री करितात.

गोमांसविक्रय बंद करितां येईल काय हा दुसरा प्रश्न आहे. आह्मां हिंदूंच्या हातीं राजसत्ता असती तर गोवध करणारास शिक्षा ठरवून प्रथम गोवध आपण बंद केला असता. परंतु आमच्या कर्मदशेनें राजसत्ता आह्मास सोडून परधर्मी लोकांच्या घरांत शिरली आहे. राजसत्तेनें आपलें घर सोडून जर अनाचार चालविला आहे तर इतर बाबतींत आमचे आचार कसें बरें कायम राहतील याचा विचार केला आहे काय? ज्यांच्या हातीं राजसत्ता आहे ते गोवध करणें अनाचार समजत नाहींत. तर गोरक्षणास त्यांची मदत मिळेल अशी आपण काय म्हणून आशा करावी? मला वाटतें राजसत्ताधिकाऱ्यांस या बाबतींत मदत मागणें व ती त्यांकडून मिळेल या आशेवर बसणें म्हणजे रेड्यापासून दूध काढण्याचा प्रयत्न करण्या प्रमाणें आहे. यास्तव मंडळीस माझी पहिली सूचना अशी आहे कीं, गोरक्षणास सरकारची मदतच मुळीं मागूं नये.

आपल्या हिंदुधर्माप्रमाणें गाय ही आपणासर्वांस पूज्य आहे. खरोखर जो हिंदुधर्मानुयायी आहे तो तिचा पूज्यपणा निदान आज दिवशीं तरी मानतो यांत शंका नाहीं. आपल्या हिंदूंत महार ही अगदीं नीच जात आहे. त्या जातीकडे पाहिलें असतां जिवंत गाय मारून तिचें मांस कोणी महार देखील खात नाहीं. गाय जर इतकी आपणांस पूज्य आहे तर त्या पूज्यतेचा तिच्या रक्षणाकडे आपणास उपयोग करून घेणें कठीण नाहीं.

बाजारांत ज्या गायी येतात त्या सर्व गोरक्षक मंडळीनें विकत घेणें व त्या पाळण्याचा खर्च करणें म्हणजे वाऱ्याच्या मोटा बांधून हवा सांठवून ठेवण्याचा उद्योग करण्याप्रमाणें आहे. मला वाटतें बाजारांतील गायी खरेदी करण्याकरितां मंडळीनें पैसा जमविण्यापेक्षां बाजारांत गायी न येतील अशा तजविजीकरितां मंडळीनें कांहीं पैसा जमा करावा व त्या पैशाचा व्यय त्या कामाकडे करावा.

बाजारांत गायी विकरी करितां न येतील अशी तजवीज कोणती करावी हा प्रश्न सहजी उत्पन्न होणार आहे, व त्या बद्दल मला जो उपाय सुचतो तो मंडळीच्या पुढें मी ठेवितों व उपाय मंडळीस पसंत पडले तर त्यांचा अंमल करण्याच्या उद्योगास मंडळीनें एकदम लागावें. तो उपाय हा आहे कीं, पुढें लिहिल्याप्रमाणें शपथेचा कागद हिंदुधर्मानुयायी ज्या ज्या भाषा वापरतात त्या भाषेंत तयार करावा व त्याच्या प्रती मंडळीनें आपल्या मुखत्यारांच्या हातीं देऊन त्यांकडून गांवोगांवचे लोक त्या शपथेच्या कागदावर शपथ घेऊन सह्या करावयास तयार करावें व जे लोक शपथेच्या कागदावर सही करतील त्यांतील बहुतेक लोक गायीच्या बाबदींत आपली शपथ पाळतील या विषयीं मला तर बिलकुल शंका वाटत नाहीं.

शपथेच्या कागदाचा मसुदा.

"मी. अ. ब. राहाणार क. ड. गायत्री शपथ असें करतों कीं, माझ्या कुटुंबांतील गाय हें एक माणूस आहे असें समजून लहान मोठी एक तरी गाय मी पाळीन. कुटुंबांत गाय नाहीं असा दिवस मी राहूं देणार नहीं. गोविक्रय करणें महत् पाप आहे असें समजून गोविक्रय करणार नाहीं. मजपाशीं एकाहून अधिक गायी होतील व माझ्यानें त्या सर्व पाळणार नाहींत तर ज्यास पाळण्याची ताकद आहे अशाच्या मी हवालीं करीन. व तसा कोणी न मिळेल तर त्या गोरक्षक मंडळीच्या हवाली करीन. काहीं विशेष अडचणीमुळें माझ्यानें गाय पाळणें होणार नाहीं तर मंडळीनें माझ्या करितां एक गाय पाळावी व तिच्या खर्चा करितां सालीना ६ रुपये अगर त्याहून ज्यास्त रकम माझ्या शक्तीप्रमाणें मी मंडळीकडे पावती करीन. माझ्या परिचयाचे लोक आहेत त्यांस गाय पाळण्याविषयीं मी उत्तेजन देईन व गाय पाळणार नाहींत त्यांस मी धर्मभ्रष्ट समजेन."

मला आज उपाय सुचला तो मी येथें टांचला आहे. त्या बद्दल मंडळी काय करिते हें पाहून सवडीप्रमाणें आणखी कळवीन.

सोलापुर, ता. १४।७।८९.

वामन गोविंद रानडे, वकील.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती श्रावण शुद्ध १ शके १८११

येथील ए. इंजीनीयर मि. लॅांबसाहेब यांनीं मागील मंगळवारी आमच्या छापखान्यासमोर एक खेद कारक फार्स उडीवला. ह्यां साहेबांस त्या दिवशीं एक बेगारगाडी पाहिजे होती, ती हुडकीत हुडकीत आमच्या चावडीपर्यंत आ साहेबांची गाडी येऊन थडकली. तेथें म्यु. कमेटीचे कांहीं चपराशी लोक बसले होते त्यांपैकीं एक दोघांवर विनाकारण यथेच्छ शिव्यांचा वर्षाव करून दोन चार कोरडे लगावून गाडी न मिळाल्यामुळें जो राग आला होता त्याचें बरेंचसें शांतवन करून घेतलें. पुढें त्या गरीब बिचाऱ्या शिपायानें साहेबांस एक गाडी मिळवून दिली व साहेब गांवा बाहेर चालते झाले. इंजिनीयर खात्यामधील मनुष्य अथवा कामगार यानें म्यु. कमेटीच्या शिपायास कांहीं कारण नसतां एका एकी मारणें व शिविगाळ करणें हा कुठला न्याय? नेटीव लोकांशी व्यवहार करीत असतां ह्या साहेब लोकांचा विद्वता सभ्यता थोरवी इ. गुणांचा कोठें लोप होत असेल तो होवो. किंवा असें तर नसेलना कीं काळा माणूस पाहिल्याबरोबर त्या लोकांचें आंगांत त्यांच्या पूर्वजांची भूतें संचारून (ज्यांस आमचे स्वातंत्र्य हरण करण्या मध्यें त्रास सोसावा लागून प्राणाचे बळी द्यावे लागले) त्यांच्या सभ्यतेस लांछन आणण्या जोगें वर्तन त्यांस करावयास लावतात, असें जर असेल तर भुतें पळवून लावण्याचे आमच्यांत जे उपाय आहेत त्याच पैकीं कांहीं उपयांचा प्रयोग आमच्या साहेब लोकांवर करून पहावा! असो. आ साहेबासारख्या वृथा सचाटीचे व सभ्य म्हणवून घेणाऱ्या साहेब लोकांस आमची एवढीच विनंती आहे कीं त्यांनीं नेटीव लोकांकरितां जरी नव्हे तरी आपली स्वतःची लज्जा राखण्या करितां जरा सभ्यतेचें अनुकरण करण्याचे श्रम घ्यावे व असल्या लोकांचें वर्तन कसें असतें हें पाहण्याकरितां त्यांच्या अधिकारी लोकांनीं डोळ्यांवर बळेंच ओढून घेतलेलें पांघरूण जरा एकीकडे करावें, व जुलमानें गांजलेल्या लोकांचा दुवा घ्यावा.

आतां असें समजतें कीं, ज्या शिपाई लोकांनां मार बसला होता ते लोक म्यु. निसिपाल कमेटी कडे दाद मागण्यास गेले होते परंतु ह्या गोष्टींत आम्हांस हात घालतां येत नाहीं म्हणून त्यांस साफ जबाब मिळाला. वा! आमची नवीन कमेटी आपल्या कामाचा गाडा अशाच धैर्यानें व नेटानें चालविणार वाटतें; आमचा वकुब किती आहे हें पूर्ण पणें जाणूनच साहेब लोकांचे आमच्याशीं अशा तऱ्हेचे बेपरवाईचें वर्तन असतें. आपले अन्नदातेच जर आपली दाद घेत नाहींत तर त्या गरीब बापड्या शिपायांनीं तरी काय करावें; परंतु त्यांनीं धैर्य धरून मे. डेप्युटी कमिशनर साहेबांकडे दाद मागितली. परंतु आपसांत समजूत होऊन साहेबांनीं त्या गरीब लोकांस दहा रुपये देऊन क्षमा मागितली. ह्या कामांत अज्ञानी व गरीब लोकांनीं, जितकें धैर्य दाखविलें तितकें सुद्धां धैर्य आमच्या विद्वान् व स्वतंत्र ह्मणविणाऱ्या लोकांस दाखवितां आलें नाहीं ही मोठी लांछनास्पद गोष्ट नव्हे काय? असो. अशाच भित्रेपणाच्या वर्तनानें कित्येक आंवचारी साहेब लोक मनसोक्ततेनें वागतात व त्या योगानें गरीब निराश्रित लोकांवर विनाकारण जुलूम होतो ही गोष्ट आमच्या अधुनिक विद्वानांनीं विसरतां कामा नये.

## हिंदुस्थानचें दारिद्र्य.

(लिहून आलेला मजकूर)

(२९ वे अंकावरून पुढें चालू.)

इंग्रजलोकांचें पाऊल या देशांत पडण्यापूर्वी आपल्या देशांतील सर्व प्रकारचे धंदे, कसबें व कारागिऱ्या निरनिराळ्या जातीचे लोकांत असत. प्रत्येक जातीला निरनिराळा धंदा लाऊन दिलेला असल्या कारणामुळें हल्लीं ज्याला कांपीटिशन ह्मणजे चढाओढ ह्मणतात तसा कांहीं प्रकार होण्याची गरज नव्हती. परंतु पाश्चिमात्य लोक आमच्या देशांत आल्यापासून आमचे धंदे व आमचीं कसबें हळूं हळूं कशीं कमी होत गेलीं व आतां तर त्यांची कशी दीनावस्था होऊन गेली आहे हें सर्वांस माहीतच आहे. कांहीं वर्षांपूर्वी असा काल होऊन गेला कीं, आमच्या देशांतील कसबी लोकांनीं युरोपांतील इंग्लंड वगैरे देशांतील लोकांच्या कसबासही मागें हटविलें होते व आपल्या कडील मालाचा अतिशय खप झाल्याकारणानें तिकडील कारखाने बंद पडतात कीं काय अशी धास्ती पडून हिंदुस्थानचा माल कोणी विकत घेऊं नये असा कायदा ही इंग्लंडच्या पार्लमेंटानें एके वेळीं केला होता. परंतु त्या लोकांच्या हातीं यांत्रिक शक्तीचें जबर साधन गवसल्यामुळें त्यांनीं आपल्या इकडील कसबांचें कसें मातेरें करून टाकिलें हें आपण सर्व्यां प्रत्यक्ष पहात आहों. आपल्या देशांत हाताचे माग नाहींसे झाले. पूर्वीं ज्या शेकडों प्रकारच्या हात कसबानें सहस्रावधी किंवा लाखो कुटुंबांचे चरितार्थ मोठ्या सुखानें चालत होते ते आज मित्तीस बंद पडले आहेत. इंग्लंडच्या मालापुढें आमच्या इकडील माल किंम्मत व सफाई यांत अगदीं फिका दिसूं लागला व त्यामुळें आमच्या इकडील मालाला मुळींच खप न मिळाल्यामुळें तें उत्पन्न करणारीं हजारों कुटुंबें आज देशोधडीस लागुन अन्न अन्न करीत फिरत आहेत. चढाओढ ह्मणजे काय हे आपल्या लोकांस मुळीं माहीत नाहीं. व असें असुन राक्षसासारख्या प्रचंड शक्तिविशिष्ट राष्ट्रांशीं आज आपल्या लोकांना चढाओढ करण्याचा प्रसंग आला आहे. ही चढाओढ तरी सारख्याच गोष्टींत असावीं तसें ही नाहीं. इंग्रज लोक भांडवल व शास्त्रीय ज्ञान यांतच आपल्याहून वरचढ आहेत असें नाहीं. राज्यकर्ते त्यांचेच भाईबंद असल्या कारणानें फायदा होण्याला ज्या ज्या गोष्टी अवश्य पाहिजे आहेत त्या सर्व आपल्या इच्छे प्रमाणें घडवून आणण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं आहे. इकडे यांत्रीक शक्तीचा उपयोग करूं लागल्या पासून आपल्या इकडील उद्योगाला अडाफाटा आणण्या करितां मॅन्चेस्टर आदी करून तिकडील व्यापाराच्या पीठांचे उद्योग कसे चालले असतात हें आपल्यास माहीतच आहे. कोणी असें म्हटलें आहे कीं इंग्लंडचीं सर्व राज्य सूत्रें वास्तवीक राज्य किंवा पार्लमेंट यांच्या हातांत नाहींत तर त्या देशांत जे मोठ मोठे धनाढ्य व्यापारी आहेत त्यांच्या हातीं आहेत. ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. आज तिकडून येणाऱ्या मालावरील जकात उठविली, उद्यां आपल्या तिकडे जाणाऱ्या मालावर दुप्पट जकात बसविली, परवां इकडील गिरण्यांत मजुरांनीं अमुक तास पर्यंतच काम करावें असा कायदा पास करविला असें उद्योग एकसारखे चाललेच आहेत. ज्यांत एक कवडी ही जकाती बद्दल द्यावी लागत नाहीं अशा आपल्या देशांतील बंदरांत इंग्लंडचा लक्षावधी रुपयांचा माल खुशाल येऊन खपत आहे व आपल्या इकडील मालाला सर्व परीखालीं पहावयास लावित आहे. मला वाटतें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा या गोष्टीशीं जितका निकट संबंध आहे तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीशी नसेल. व्यापार हें देशाच्या संपत्तीचें मुख्य साधन आहे. इंग्लंडला आज येवढी योग्यता आली आहे ती केवळ त्याच्या धाडसी व्यापारानें. तोच व्यापार आमच्या लोकांना फायदेशीर होण्याचीं साधनें परदेशीय लोक बंद करित आहेत मग आमच्या देशानें दरिद्रि न व्हावें तर काय करावें;

तिसरें कारण कराचा बोजा. करांची संख्या वाजविपेक्षां ज्यास्ती वाढणें हें सरकारच्या उधळपट्टीचें फळ होय. खजिन्याला खांच पडली म्हणजे मग ती कशीनाकशी तरी भरून काढलीच पाहिजे. ज्यांनीं ज्यांनी ह्मणून आमच्या सरकारचे प्रतीवर्षीं प्रसिद्ध होणारे जमाखर्चाचे खंड वांचिले असतील त्यांना माहितच असेल कीं अमच्या सरकारच्या खजिन्याला नुसती खांचच पडते असें नाहीं तर कधीं कधीं सर्व खजिना रिकामा पडण्याचाही प्रसंग येतो. अर्थात असा प्रसंग आला ह्मणजे मग साधारण व्यापाऱ्याप्रमाणें दिवाळें तर फुकतां येत नाहीं मग बसवा प्रजेवर पाहिजे तसे कर. आमच्या सरकारच्या खजिन्याला वारंवार जी तूट येते तिचीं अनेक कारणें आहेत. पाहिलें मोठें कारण वर सांगितलेंच आहे कीं राज्य व्यवस्थेसाठीं विना कारण होणारा अतोनात खर्च. वास्तवीक पहातां या कामीं जी उधळपट्टी होत आहे तिच्या निम्मे खर्चांतही सर्व काम होण्यासारखें आहे परंतु मग गोरकाय बाळांनीं पोट भरण्यास जावें कोठें. त्यांच्या पोटापाण्याची कांहीं तरी सोय सरकारला अगोदर केली पाहिजे. दुसरें कारण आमच्या सरकारचा अधासीपणा होय. हिंदुस्थानची एकावर एक राज्यें गटागट गिळून टाकिलीं. त्या बद्दल एकदां अजीर्ण देखील झालें. परंतु सरकारचा खादाडपणा जातो आहे कोठें. ब्रम्ह देश काबीज केला असतां इंग्लंडच्या व्यापाराला तो एक नवीन बाजार मिळेल हं घ्या ब्रह्मदेश. फायदा इंग्लंडचा आणि लढाईला खर्च झाला तो बसला हिंदुस्थानच्या डोक्यावर. सिकीमची तीच अवस्था. वायव्यकडे सरहद्द मजबूत केली पाहिजे हं घ्या अमीराला वश करून पाठवा त्याला दरसाल लाख रुपये दक्षणा. परस्पर काम. इंग्लंडांत आपल्या तिजोरींतून फार्दिंग तरी खर्च करावा लागतो कां? अमीर साहेब तर सध्यां शुद्ध जांवईबुवा होऊन राहिलें आहेत. अलीकडे एक्सचेंज प्रकरण फार माजलें आहे. या एक्सचेंजच्या पाइं आमच्या देशाला वाजवी पेक्षां लाखों रुपये फाजिल पाठवावे लागतात. साहेब लोक इकडून बिचारे कष्ट करून पेनशन घेऊन जातात. तेव्हां तिकडे त्यांना पेनशन पौंडाच्या नाण्यानें दिली पाहिजे. पौंडाची किंमत तर वाढली मग तूट कोणी भरावी? अर्थात हिंदुस्थानानें. या व या सारख्या दुसऱ्या अनेक कारणांनीं अमच्या सरकारच्या खजिन्यांत नेहमीं तूट पडत असते. परंतु आमचे सरकार पूर्वीपासून सराफीच्या कामीं वस्ताद असल्याकारणानें त्याला ही तुट भरून काढण्याला उपायांची ही तुटपडत नाहीं प्रजा चांगली सधन आहे गरीब आहे मग काय घ्या वाटेल तशी लुटून. आजकाय लायसेन्स टॅक्स आला, उद्यां इन्कम टॅक्स आला, परवां मिठावर कर वाढविला. मला वाटतें अशीच अवस्था पुढें चालली तर बसण्यावर कर, उठण्यावर कर, बोलण्यावर कर, लग्नावर कर, मुंजीवर कर, नायका बाळंत झाल्या म्हणजे त्यावर कर असे आणखी किती कर बसतील कोण जाणें! आमच्या सरकारानें एक गोष्ट नेहमीं ध्यानांत ठेविली पाहिजे कीं प्रजेनें राजास कर देणें हे तीचें कर्तव्यकर्म आहे तथापी राजानें आपला हक्क अमलांत आणितांना प्रजेच्या खऱ्या हांताकडे व शक्तीकडे लक्ष्य दिले पाहिजे. स्वराच्या आंगी स्थीतीस्थापकता गुण आहे व तो जवढा ताणावा तेवढा ताणला जातो परंतु या ताणण्याला सीमा आहे. तिच्या पलीकडे जोर केला तर स्वर तेव्हांच तुटून जाईल. त्याचप्रमाणे ही गोष्ट आहे. राजानें बसविलेला कर प्रजेला दिलाच पाहिजे खरा परंतु या कराचें ओझें कांहीं तरी सीमाबद्ध पाहिजे. ही सीमा सध्यां पुरी झाली आहे असें मला वाटतें. आमचे सरकार शाहाणें व राजकार्य धुरंधर आहे तेव्हां तुमच्या आमच्या सारख्यांच्या फासक्या फुसक्या उपदेशानें त्याला काय सांगावयाचें आहे. तथापि प्रत्येक सरकारनें नेहमीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी कीं, प्रजेचें कल्याण व तिची सुप्रसन्न मर्जी हेंच सरकाराला बंदोबस्ताचें मुख्य साधन आहे. हें साधन सरकारच्या हातीं असेल तर रशिया जरी पण रशीयासारख्या अनेक अस्वली जरी आमच्या सरकारच्या आंगावर आल्या तरी त्यांचें कांहीं चालावयाचें नाहीं. प्रजेच्या मनांत सुप्रसन्नता नाहीं. व इकडे सरहद्दी मजबूत केल्या, फौज वाढविली, सरहद्दीच्या राजांस भजर नजराणे देऊन आपले अंकींत करून टाकी तरी काय होणार? या पासून उलटा प्रजेला त्रास मात्र अधीक होणार.

(पुढें चालू.)

The Berar Samachar
MONDY JULY, 29, 1889.

## SIR LEPEL GRIFFIN'S RECENT LECTURE ON NATIVE STATES OF INDIA.

The recent utterances of Sir Lipel are certainly not disconsonant with the policy he had pursued while he worked as an administrator in this country. He is one of those who are both high hand ed and out spoken at one and the same time. It is indeed a great pity that he did not accept the post of the Resident at Hyderabad. He would have tried his utmost to liberate that state from intrigue and corruption--the two worst enemies of Hyderabad. However, here we are not much concerned with Sir Lipel's character as an administrator. Much of what he said recently is well worthy of attention and study. It is indeed a great problem in the science of statcraft whether the weak should be permitted to live in this world if they are not to be half so subservient to the interests of the strong as slaves are to those of their masters. The principle of evolution has established the doctrine of the survival of the fittest; and we see it in our daily observation of men and things that the strong only carry the day whenever there is a conflict between the strong and the weak.

There is another fact which also must be taken into account that strength does not always signify muscular strength only. In other words though might is right still under municipal and international laws Right is almost invariably might.

Sir Lepel's view as regards annexation of Cashmere may be easily classed under the well-known principle of might is right. This was exactly the policy followed by Caesar in his conquests of the world, and has been well illustrated by Anthony Trollope in his life of Caesar.

In modern times, the same policy has been adopted by Russia and other European Powers with regard to their weak neighbours. Inspite of this strong tendency in powerful nations to annihilate their weak neighbours, the principle of Right is Might is asserting its supremacy over and overagain in the policy of nations. The principles of international law are often resorted to for guidance in questions affecting neighbouring nations. It is only under circumstances of extreme necessity that recourse is taken to arms. The whole history of Europe from the overthrow of Emperor Nepoleon is the history of a struggle between the two principles Might is Right and Right is Right. If the tendency of modern nations in Europe is more or less affected in the present by the righteous principle of Right is Might, it bespeaks weakness of moral strength in men who advocate a policy in the affairs of this country directly against treaties and engagements made with several potentates in India. If in a court of justice one were to assert that might is right, he would expose himself to ridicule and ignominy both from the Bench and the Bar. Such, or nearly such, is the position of one who advocates breach of treaties and engagements for the furtherance of selfish motives or for the sake of gaining notoriety for himself in the court of international justice. It is indeed a thing to be greately regretted that so high minded a person as Sir Lepel Griffin should have exposed himself to the ridicule and indignation of the educated and the just. To take a most charitable view of matters, Sir Lepel probably wished to say something about the relation between the Indian Princes and their subjects. That the subjects of these Princes have not the same liberty of speech and of action as the subjects under the British crown have and that they do not enjoy the same kind of privileges as their neighbours the British Indian subjects do, is a fact of undoubted truth. Sir Lepel in his weak mood thought that annexation of provinces such as Cashmeer was the best remedy to improve the subjects under native rule in India. To discover a remedy for improving a state of things which has gone wrong for many days and to preach breaches of treatises and engagements are two distinct things. In the one case Sir Lepel has a locus standi to speak from his experience; while in the other case he is simply out of court.

---

We are sorry to record that we were reluctantly compelled to be eye witness to a very disagreable scene of a Brutal attack made by a big European office upon a poor Native holding a Chaprasee's post under the Akola Municipality. We could not avoid beholding the scene in-as-much as it took place in the very front of our office.

It would appear that Mr. Lobb the Executive Engineer of Akola wanted a "Beegaree" Country Cart and that he had for that purpose informed the Tehasildar. It not having made its appearance in time the gentleman grew impatient and came personally driving in his own carriage. It further appears that near the Iron Bridge he missed his way to the Chowdi, and came by way that branches off to the Berar-Samachar in a Northerly direction. In the front of the office, near the Maszid some Municipal Peons had collected to report their works to the conservancy Inspector as has been their wont. As soon as they saw a European officer, they all got up in due respect to him. It further appears that Mr. Lobb mistook the peons as belonging to the Tehasildar and asked them unlike a gentleman where the Cart is. These poor fellows, not knowing anything of the matter previously, but understanding sufficient that he was in need of a cart found it difficult to supply it And therefore one of them meakly said that they were municipal peons and that to supply a cart was not in their power. This answer made the gentleman to go in a sudden fit of anger and under its influence he horse whipped the poor creature. One of his brother peons coming to rescue the miserable man got his due share also. Mr. Lobb then made the fellow run before his carriage to the Town Bazar still asking him in a brutal voice "where is the cart." The poor fellow had by this time been completely terified and through the influence of this feeling said that he would supply the thing required; at this time he happened, fortunately to observe a cart belonging to Mr. Mirza Abasbeg a municipal member. He pointed it out and told the cartman to get it ready for Mr. Lobb. He refused to do so. Whereupon the gentleman illtreated him also. He however took the same cart and went away.

We have all along termed Mr. Lobbs as a gentleman. But is he not one? At least he ought to be so, for, the very fact, that he occupies a high office in the Administration which none but a thorough gentleman can only be deemed qualified to occupy, is sufficient to dispel the doubt. But what was his conduct on the fatal occasion on the Tuesday last? Was it gentlemanly? Any body having a sober head about him can never induce himself to answer the querry in the affirmative. Moreover this is not the first occasion on which Mr. Lobb is found to attack a poor native. There have been a couple of past instances also. Yet Mr. Lobb is a gentleman, or must be taken as such, if not for any other reasons at least for his being a European, and he belonging to a nation which has a world wide renown of civilization in it. But here we have an unenviable sample of an English gentleman! By this we may not be understood to mean that every European, at least those whom we know in the Berar commission has any of the unenviable qualities in him. There are many who really deserve our perfect esteem for their exemplary popularity and conduct to towards natives. We might here mention a few, such as, Mr. Hare. Major Laughton, Colonel Mackenzie and thought last but not the least Colonel Renick.

The peon so illtreated, to obtain redress, went to the head of his employers and besought him to support him in a criminal action that he wished to bring against Mr. Lobb. This head in the way of a kind support told the unhappy man that the municipality cannot support him because the matter for which a action is wished for, is simply of a private nature. Poor fellow! what can he now do? Must move on his own hooks. Here again, have we not another sample of a Municipal body? constituted under the great boon of Lord Ripon, that a Governor General ever conferred upon India. We have yet to say much about our new municipality and we promise to do so in good time. Suffice it therefore to observe that an unsupported criminal complaint has been presented to the Deputy Commissioner by the agrieved party. Patience, therefore, until the judgment is delivered.

But we had just closed the above observations for the printers, when one of our special messengers comes in to report that the case is compromised. Mr. Lobb having paid 10 Rs. to the peons and also asking apology of the Municipality, fearing that the Municipality was insulted by the attack.

But will this be the last instance of Mr. Lobb's pranks, and will the loss of 10 Rs. and the disreputation in the bargain teach him a salutary lesson to behave in future in a more becoming and gentlemanly manner with natives with whom his work whether private or official may bring him in contact? We hope so.

---

Gross injustice has been felt by many who hold appointments in the ministerial class of officers in the Berar commission by their rightful claims to promotions, having been overlooked in the Judicial scheme that has lately come into force, Buldana District would appear to be very lucky, as if qualified candidates could not be found in other District offices. One loving justice, would ask, why men already drawing 100, 70 and 40 Rs. and who have been every way qualified for promotions should have been intentionally allowed to smart under the injustice of undue preference. The answer would be that favoratism was certainly at play. We hope there has been no misrepresentation and that the Judicial Commissioner will in his usual kind heart, think it proper to review the matter, and try to patch up points wherein injustice is alleged to exist.

---

पोंचः—दत्तपदबोधिनी व श्री दत्तपदांमृत संजिवनी अशी दोन श्री दत्तांच्या पदांची पुस्तकें त्याच्या कर्त्या कडून आह्मास आलीं त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

आपला देवगाव विनायकः—आपलें पत्र पावलें स्थल संकोचास्तव पुढील खेपेस घेऊं.

---

## वऱ्हाड.

क्या० मॉरिस सा० यांची वाशिमास बदली झाल्याप्रमाणें ते तेथील डे० कमिशनरचे कामावर रुजूं होण्या साठीं वाशिमास गेले.

दस्तूर एदलजी बेमंजी अ० क० यांची शिकंदराबादेस असिस्टंट क्यांटोनमेंट मानिस्त्रेटचे जागीं बदली झाली, व तेथील असिस्टंट क्यांटोनमेंट माजिस्त्रेट यांची वऱ्हाडांत बदली झाली असें समजतें.

मि० ड्रोडन सा० कमिशनर हे या आठवड्यांत रजेवर जाणार. कर्नल स्पान्स्की सा० कमिशनरचें काम पाहणार व त्यांचें डे० क० काम पहाण्याकरितां बुलढाण्यास मि० यासीनखा हे वाशिमाहून गेले आहेत.

येथील वकिलीची परीक्षा दरसाल तीन दिवस चालत असते व दररोज प्रश्नाचे दोन कागद देतात. ही व्यवस्था कांहीं उमेदवारांना गैरसोईची वाटत असल्यामुळें त्यांनीं मे. जु० क० सा० यांच्याकडे असा अर्ज पाठविल्याचें कळतें कीं, दररोज प्रश्नाचा फक्त एक कागद देत जावा. या व्यवस्थेनें एकंदर सहा दिवस परीक्षा चालेल.

येत्या दिसेंबर महिन्यांत मुंबईस राष्ट्रीय सभा भरणार आहे त्या संबंधानें वऱ्हाडांतून कोणत्या रीतीनें मदत द्यावी याबद्दल वऱ्हाड स्टॅंडिंग कमिटींत विचार चालूं आहे. वऱ्हाडांतुन यंदा निदान तीन हजार रु. पर्यंत वर्गणी जमा करावी. लागेल असें वाटतें.

कै० वा० भीमराव यांचे मृत्यू नंतर त्यांचे कनिष्ट बंधु मि० सो० शामराव यांस वऱ्हाडांत असिस्टंट नेमलें हें सर्वांस माहीत असेलच. यांची नेमणूक झाल्या दिवसां पासून ते आजपर्यंत शिकंदराबादेसच होते. हल्लीं यांची वाशिमास बदली झाली. व वाशीमचे मि० हषमत अली अब्बाची यांची शिकंदराबादेस बदली झाली.

वऱ्हाडांतील नवीन नेमलेले असि० कमिशनर मि० स्टान्लेमरे यांस गेल्या आठवड्यांत हैदराबादेस महामारीच्या रोगानें देवाज्ञा झाली.

मेसर्स एदलजी संजाना, वासुदेवराव पिसोळकर व गोविंदराज आपा यांस ए० अ० कमिशनर नेमलें. नवीन रेसिडेन्ट मे० फिटस् पाट्रिक साहेब हे हैद्राबादेस येत्या ता० ३ रोजीं येणार.

पुढील महिन्यांच्या १९ वे तारखेपासून येथें सेशनांची मोठी गर्दी आहे एकंदर सहा मुकदमे आहेत. या पैकीं २ अकोलें, २ वाशीम व २ बुलढाणें जिल्ह्यांतील आहेत. या सहापैकीं चार मुकदमे दागिन्यासाठीं खून झालेले आहेत. वाशिमाकडील एक मुकदमा फार भयकर व हृदय भेदक आहे. मौजे कान्हे येथें एका ७–८ वर्षांचे मुलास फक्त ३०–३५ रु. किंमतीच्या दागिन्याच्या लोभासाठीं कोणी दुष्टांनीं दगडानें ठेचून ठार मारलें असें ह्मणतात. या संबंधानें दोन इसमावर मुकदमा चालूं आहे. चौकशी अंतीं काय ठरेल तें पहावें.

इंग्लंडांत स्त्रियांचा प्रसव अतिशय होऊं लागला. अगदीं चेंदा चेंदा होऊं लागल्यामुळें कांहीं विचारी स्त्रियांनीं पती मेला असतां तिजला दुसरा पती करून देण्याची परवानगी न देण्या विषयीं विचार चालविला आहे. इकडे आमच्या पुनरविवाहाचे महरपं लोकांनीं वगैरे पाहून कांहीं सुविचार करावा.

---

## वर्तमानसार.

वृद्ध न होण्याची कळा:– प्रोफेसर ब्राऊन सेगारड नामक एका फ्रेंच गृहस्थानें एक फारच विलक्षण प्रकारचा शोध लाविला आहे. वरील गृहस्थानें बरींच वर्षें शोध व प्रयोग करून असें सिद्ध केलें आहे कीं जे वृद्ध व शरिरानें कृश आहेत त्यांच्या शरिरांत तरण्या व सशक्त जनावरांचे मज्जतंतू ज्या प्रमाणें देवी काढतांना लस घालतात त्या प्रमाणे–घातले असतां त्यांस, तारुण्यावस्थेची पुन्हां शक्ति प्राप्त होते. ह्याचें हें म्हणणें पूर्वीं लोकांस खरें वाटेना. परंतु प्रयोगांती त्यानें शास्त्रवेत्यांची खात्री करून दिली आहे. ह्या प्रकारे ह्या शोधक गृहस्थानें आपणां स्वःतावर प्रयोग करून पाहिले व ह्याचें म्हणणें असें आहे कीं माझ्या आयुष्याची १० वर्षें वाढलीं. अर्थातच त्यास त्यांच्या तारुण्यांतील शक्ति प्राप्त झाली. ह्या नवीन कृतीस "वृद्ध न होण्याची कला" असें त्यानें म्हटलें आहे. ह्या प्रकारचें नवीन व विलक्षण शोधा विषयीं ऐकून कोण कुंठीत होणार नाहीं? दि० बं०

क्राफर्ड प्रकरणाचें शेंपूट–अशी वार्ता ऐकूं येते कीं, ज्या लोकांनीं ( ह्मणजे मामलेदार, कारकून, इनामदार, जमीनदार, जाहागीरदार इत्यादि ) क्राफर्ड साहेबास पैसे पोंचविले आहेत– मग ते कोणत्या कां रूपानें होईनात– त्यांची चौकशी करून त्यांस त्यांच्या मगदुरा प्रमाणें बक्षीस देण्याकरितां लवकरच एक कमिशन बसावयाचें आहे. या कमिशनांत मुख्यत्वें करून ज्यांनीं अपखुषीनें पैसे भरले त्यांची व ज्यांस पैसे भरावे लागले त्यांची चौकशी व्हावयाची आहे असें समजतें. असें ही आणाखी ह्मणतात कीं या कमिशनांस एक पोलिटिकल सेक्रटरी, एक कलेक्टर व एक कमिशनर असे गृहस्थ बसावयाचे आहेत. यांचीं नांवें आतांच आह्मी देऊं इच्छित नाहीं, तथापि थोड्याच दिवसांत तींहीं प्रसिद्ध करूं. हें क्राफर्ड प्रकरण क्राफर्ड साहेबांची जेवढी हयात या देशांत गेली तितके दिवस यापुढें चालेल असा अदमास वाटतो! उगीच बसून मौज पहाण्याचीच ही वेळ आहे ! !

प्रिन्स ऑफ वेल्स यांची चार लाखांची नेमणूक आठ लाख रुपये करावी अशी शिफारस झाल्याचें समजतें.

बहादोस वाऱ्याचा उपद्रव फारच जारी असल्यामुळें सर्व लोक घाबरून गेले आहेत.
पु० वै०

इंग्रज सरकारनीं क्रीट येथें बंदोबस्ताकरितां दोन लढाऊ जहाजें पाठविण्याचा हुकूम केला आहे.

केरोच्या आसपास दरवेशी लोकांची बरीच धामधूम चालली आहे.

पीरपोइटो येथें दोन गाड्यांची टक्कर होऊन कांहीं लोकांना इजा झाली.

काश्मिर येथें गुलमर्ग शहरीं एक टेलिग्राफ ऑफिस स्थापन करण्यांत आलें.

पोर उपजल्या बरोबर त्याच्या आंगास काळे लाहोरी मीठ चोळावें म्हणजे कोणत्या ही प्रकारचे अंगावरचे रोग उद्भवणार नाहींत. आणि मुलाच्या हयातींत त्याला देवी गोंवर व कांजिण्या यावयाच्या नाहींत असें म्हणतात.

बाल्कन पेनिनशुलामध्यें रशियाचें पाऊल प्रतिदिवशीं पुढें पुढें पडत आहे. यामुळें आस्ट्रियाला मोठी भीति उत्पन्न झाली आहे.

क्रिटमध्यें दारु सामान न नेऊं देण्याकरितां ब्रिटिश, आस्ट्रियन व जर्मन लढाऊ जहाजें तेथील बंदरांत ठेविलीं आहेत

क्रीट येथील प्रकरण तंट्यावर जाईल असें कळतें.

लार्ड रे हे व्हाइसराय साहेबांस भेटण्याकरितां येत्या सपटेंबरमध्यें सिमल्यास जातील व लार्ड कानिमारा हे आक्टोबर मध्यें भेटतील. काय शिजत आहे कोण जाणें!!

येथून लंडन ६६२९ मैल लांब आहे असें समजतें.

लार्ड सालिसबरी यांनीं ता. १६ रोजीं लंडनमध्यें भाषण केलें, त्यांत आपण लढाईची तयारी केली पाहिजे असें त्यांनीं सुचविलें.

इराणच्या सरहद्दीजवळ इशाकखानच्य लोकांनीं बंडावा चालविला आहे असें समजतें.

सार्वियामध्यें १८ रशियन ऑफिसर्स तेथील किल्ले वगैरे तपासताहेत असें कळतें.
सु० प०

काश्मीरच्या महाराजांची स्थिति शोचनीय झाल्यामुळें निराश होऊन त्यांनीं व्हाइसराय साहेबांस जें पत्र लिहिलें त्यांतील आशयाची जी खबर हिंदुस्थानांत चोहींकडे प्रसिद्ध झाली तीच विलायतेंत झाली होती. महाराजांनीं व्हाइसराय साहेबांस जी हृदयद्रावक विनंती त्या पत्रांत केली होती ती वरून महाराजांची स्थिति कशी निवारण झाली आहे हें उत्तम व्यक्त होतें. सक्ती झाल्यामुळें महाराजांनीं राज्यकारभार सोडला आपखुषीनें सोडला नाहीं ही गोष्ट आतां जगजाहीर झाली आहे. असें असतां त्याचा पूर्ण खुलासा होण्याकरितां नामदार ब्राडला यांणी अन्डरस्टेट सेक्रेटरी सरजान गोर्स्ट यांस पुष्कळ प्रश्न केले पण त्या प्रश्नांची गोर्स्ट यांणीं कशीं धरसोडीचीं उत्तरें दिलीं हें आमच्या वाचकांस कळण्याकरितां तीं प्रश्नोत्तरें आह्मी येथें देतों:–

सरजान गोर्स्ट– काश्मीर संस्थान खालसा केलें नाहीं किंवा महाराजांचा मोठासा अपमान केला नाहीं. ज्या पत्राबद्दल ब्राडला यांणीं विचारलें त्याबद्दल स्टेटसेक्रटरीस कांहींच कळलें नाहीं. महाराजांनीं आपखुषीनें राज्यकारभार सोडला, सरकारानें महाराजांचा राजीनामा मान्य केला, तरी त्यांच्या निर्वाहासाठीं योग्य इतकी नेमणूक संस्थानच्या उत्पन्नांतून मिळेल. काश्मीरची जी नुकतीच व्यवस्था झाली तीमुळें नेटीव संस्थानिक घाबरून गेले आहेत असें मानण्यास स्टेटसेक्रटरीस कांहीं कारण दिसत नाहीं. नेटिव संस्थानांतील प्रजेबद्दल सार्वभौम सरकारचें जें कर्तव्य आहे त्यास व्यत्यय न येईल तर संस्थानिकांचे हक्क सरकार काळजीपूर्वक पाळणारच. या संबंधाचा पत्रव्यवहार आजच पार्लमेंन्टापुढें ठेवला असतां हिंदुस्थानांतील सरकारी कामगारांच्या कर्तव्यास मोठाच धक्का बसेल असें स्टटसेक्रटरीचें मत आहे.

ब्राडला— आपण आपखुषीनें राज्य सोडलें ही गोष्ट खरी नाहीं असें महाराज ह्मणतात ही गोष्ट स्टेटसेक्रेटरीस माहीत आहे कीं नाहीं, व हाऊस ऑफ कॉमन्स सभेंत या बद्दलशाहा निशा व्हावी असा योग आणाल कीं नाहीं?

सरजान गोर्स्ट— याबद्दल स्टेटसेक्रेटरीस सरकारी बातमी नाहीं, पण आपखुषीनें महाराजांनीं राज्यकारभार सोडला नाहीं हें खरें झाले तरी स्टेटसेक्रेटरीस अचंबा वाटणार नाहीं असें मला खाचित वाटतें. हिंदुस्थान सरकारास महाराजाविषयीं जी माहिती आहे ती आपल्यास असती तर त्याबद्दल आपल्यास हा अचंबा वाटला नसता.

मि० ब्राडला– एकूण यावरून सरकारी नाहीं पण खासगी बातमी स्टेट सेक्रटरीस आहे असें कां समजावयाचें?

सरजान गोर्स्ट– नाहीं. माझ्या भाषणावरून तसा अर्थ काढण्यांत आपण चुकतां.

मि० ब्राडला–तर मग महाराजांनीं आपखुषीनें राज्य कारभार सोडला ही गोष्ट तुम्ही ना कबूल करितां कीं काय?

सरजान गोर्स्ट–स्टेट सेक्रटरीस त्याबद्दल माहिती नाहीं. पण तें खरें ठरलें तरी स्टेट सेक्रेटरीस त्या बद्दल नवल वाटणार नाहीं. ती बातमी खरी ठरली तरी स्टेट सेक्रटरी तिचें बिलकुल महत्त्व मानणार नाहींत.

वरील उत्तरावरून अन्डर स्टेट सेक्रेटरी यांच्या उत्तरांत किती धरसोड व डावपेंच आहे. हें कोणास ही तेव्हांच स्पष्ट दिसेल. गिरण्याच्या कायद्यांत फेरफार करण्यासारख्या सामान्य गोष्टी ही जर स्टेट सेक्रेटरीच्या अगाऊ मंजूरी शिवाय होत नाहींत ही गोष्ट आपणा सर्वांस कळत आहे तर काश्मीर सारखा मोठ्या संस्थानांत एवढी क्रांति स्टेट सेक्रेटरीच्या अगाऊ परवानगी शिवाय कां झाली आहे! ह्या प्रकरणांतल्या बारीक सारीक गोष्टी ही स्टे० से० स कळल्या असतील यांत संशय नाहीं पण आंतल्या काळ्या बेऱ्या गोष्टी आजच उघड केल्या असतां मोठीच ओरड होईल, ती न व्हावी म्हणून राज्यकारस्थानच्या अडचणीचा एक मोठा पेंच घातला तेव्हां ब्राडला यांचें तोंड सहजच बंद झालें. सरजान गोर्स्ट यांच्या भाषणा वरून काश्मीरच्या प्रजेच्या कळकळ्यानें ब्रिटिश सरकारास ही गोष्ट करावी लागली असें दिसतें. काश्मीरच्या महाराजाबद्दल प्रजा इतकी नाखूष कधीं झाली होती व आम्हास ह्या महाराजांच्या जाचांतून सोडवा असा त्या प्रजेनें कधीं अर्ज केला होता; उलट महाराजांचा अधिकार काढल्या मुळें प्रजा अगदीं नाखूष मात्र झाली आहे. महाराजांनीं आपखुषीनें राज्यकारभार सोडला नाहीं ही गोष्ट खरी ठरली तरी स्टेट सेक्रेटरीस अचंबा वाटणार नाहीं या गोर्स्टीच्या म्हणण्याचा अर्थ काय! काश्मीर प्रकरणा मुळें संस्थानिक घाबरले नाहींत हें गोर्स्ट यांणी कशा वरून सांगितलें?

सरहद्दीसाठीं देणगी:— फील्ड आर्टिलरीची एक ब्याटरी, घोडेस्वारांची एक पलटण, पायदळ पलटणाची एक बटालियन भोपाळच्या बेगम साहेबांनीं सरहद्द रक्षणासाठीं देऊं केली आहे.

दगडी कोळसा:— निजाम हद्दींतील 'सिंगाराणी' या दगडी कोळशाच्या खाणींतील ५०००० टन कोळसा दरसाल घेण्याचें साठें जी. आय. पी. रेल्वेनें कबूल केलें आहे.

हुंडणावळीचा तोटा– चालू सरकारी वर्षांतील एप्रिल व मे या दोन महिन्यांत हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीनीं ४,१४,४९००० रुपये हिंदुस्थानच्या खजिन्यांतून उचलले. त्याच्या हुंडणावळीसाठीं ११,२९,००० रुपये हिंदुस्थानास चट्टा बसला. अशा तोट्यानें हिंदुस्थानचा कसा निभाव लागणार!

खरें प्रजा प्रेम— जम्मू येथील राहणार डोग्रा रजपूत नांवाचा एक प्रजाजन आहे. महाराजांवर महाराजांची सगळी प्रजा अतिशय प्रेम करिते, तें तिनें करूं नये असें कांहीं खटपट नव्या कौन्सिलनें चालविली असें ह्मणतात. डोग्रा याजवर तसा जुलूम चालविला तेव्हां तो ह्मणाला "आमच्या महाराजांनीं आह्मास कुटलें तरी फिकीर नाहीं, पण कौन्सिलानें आमच्यावर सोन्याचा पाऊस पाडला तरी आह्मास नको" असें ज्या प्रजेचें महाराजांवर प्रेम तें राज्य यथान्याय चालविलें नाहीं ह्मणून महाराजांच्या हातचें राज्य काढलें असें ह्मणतात. बाहवारे वाहव न्याय !!!

जलमय– सक्कर नजीक लारखाना आणि नवदरा याच्या मधील खेडी सिंधुनदीला महापुर आल्यामुळें जलमय होऊन गेलीं आहेत.
शु० सू०

---

नोटीस.

भगवान वल्लद जानजी कोठाळे व सोनाजी वल्लद राणु दांडडे राहणार अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुमचे मजला देणें होते त्याचे फेडीबद्दल सन १८७९ सालांत दस्तऐवज करून शेतें ताब्यांत दिलीं होतीं. त्याप्रमाणें तह्मी उपभोग घेऊन कराशिवाय साहावर्षें शेताचें पीक जास्त खाल्यामुळें तुमचें कर्जाची अदाई होऊन माझीच तुमचेकडे बाकी निघत होती ती मजला द्यावी लागेल. व दस्तऐवज कायद्याबाहेर गेला ह्यासाठीं कपटानें तह्मी चालाखी करून मजला कोणास भेटू न देतां आपले ताब्यांत ठेऊन मजपासून तुम्ही भुलतापीनें रु० २०० चे पटखत ता० २५ जून सन १८८९ रोजीं करून घेऊन त्याच दिवशीं नोंदून घेतलें. मी अडाणी मनुष्य मजला त्या दस्तऐवजाचा अर्थ समजला असतां तर वरील दस्तऐवज पुरा झाला नसता. करितां ह्या नोटीशीनें कळवितो कीं तुम्ही सदरहू दस्तऐवज रद्द करून माझी तुमचेकडे बाकी निघत आहेत, ती हिशेब अन्वये खात्री करून आठ दिवसाचे आत निकाल करून पावती घेऊन जावी. याप्रमाणें करण्यास चुकाल तर मजला कायदेशीर दावाकरण्यासाठीं जो खर्च लागेल त्याबद्दल नोटिसीचे खर्चासह तुम्ही जबाबदार रहाल कळावें ता० २४।७।१८८९ इ०

सही
बाबुजी वल्लद मकमजी शेंडे राहणार
शहर अकोट निशाणी खुद्द
हातची असे.

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.